संगीत

सुविचारविजय

नाटक.

सन १९०७.

संगीत

सुविचारविजय.

संगीत

सुविचारविजय

नाटक.

सिताराम गणेश देवधर, बी. ए.

यांनीं रचिलें व प्रसिद्ध केलें.

पुणें येथें

हरि नारायण गोखले यांनीं आर्यभूषण

छापखान्यांत छापिलें.

१९०७.

किंमत ८ आणे.

हें

संगीत

सुविचारविजय नाटक

आर्तत्राणपरायण अशा सर्व स्त्रीपुरुषांस

अत्यंत प्रेमादरपूर्वक

ग्रंथकर्त्यानें

अर्पण केलें आहे.

प्रस्तावना.

नाटकाची प्रस्तावना त्याच्या आमुखांतच ग्रथित करण्याचा पूर्वकवींचा संप्रदाय आहे. तोच याही नाटकांत अनुसरला असल्यामुळें प्रस्तुत नाटकाच्या उद्दिष्टहेतूवगैरेसंबंधानें येथें विशेष कांहीं लिहिण्यासारखें राहिलें नाहीं. सामाजिक विषयाच्या बाबतींत लोकमत जागृत करण्यास संगीत नाटकाचा उपयोग करतां येण्यासारखा आहे, हेंही रा० देवल यांच्या लोकप्रिय शारदा नाटकावरून सिद्ध झालेलें आहे. आतां प्रस्तुत नाटक व शारदा नाटक यांतील प्रतिपाद्य विषयांसंबंधानें लोकमताच्या स्थितींत बरेंच अंतर आहे, हें खरें; तथापि विचार, उच्चार, व आचार, या त्रयींपैकीं आचारकाल प्राप्त होण्यास जरी आणखी कांहीं दिवस वाट पहावी लागली, तरी उच्चारकालास यापूर्वींच आरंभ झालेला आहे. ३०–४० वर्षांपूर्वीं ' पुनर्विवाह ' हा शब्द उच्चारतांच जसा चोहींकडून ' अब्रह्मण्यम् ! ' ' अब्रह्मण्यम् ! ' असा ध्वनी निघत असे, तसा तो आतां निघत नाहीं. निदान बालविधवांच्या कष्टमय स्थितीपुरती तरी समाजांत सहानुभूती उत्पन्न झाली असून, ती दूर होण्याची कांहीं तोड निघेल तर बरें, असे उद्गार जुन्यांस चिकटून रहाणाऱ्या वृद्ध स्त्रीपुरुषांच्याही तोंडून निघूं लागले आहेत. या मतांतरास, बालविधवांच्या संख्येंत प्लेगमुळें एकसारखी पडत असलेली भयंकर भर कांहीं अंशानें कारण झाली आहे यांत संशय नाहीं; तथापि शिक्षणप्रसारामुळें समाजांत हल्लीं जी जागृती होऊं लागली आहे, तिचेंही त्याला बरेंच साह्य झालें आहे. परदोषाच्या राईचा पर्वत करून, त्यास मुख्यतः कारण असणाऱ्या अक्षम्य स्वकीय दोषांकडे डोळेझांक करण्याची मनुष्यस्वभावाची नित्याची प्रवृत्ती या प्रस्तुतच्या जागृतींत ह्मणजे दिसून येत नाहीं, असें नाहीं. परंतु ' राज्यव्यवस्थेंत सरकारानें काळा–गोरा अशी भेदबुद्धी कां ठेवावी ? ' अशी पृच्छा करणारांच्या मनांत, ' आपणही सामाजिक व्यवस्थेंत पुरुषाला एक न्याय आणि स्त्रीला दुसरा न्याय लावतों हें चांगलें नाहीं, ' हा विचार–उशिरानें कां होईना–पण

प्रादुर्भूत झाल्यावांचून रहात नाहीं. राष्ट्रोन्नतीचे विचार बाल्यावस्थेंत असतांना तदर्थ होणारे प्रयत्न जरी एकदेशीय असले, तरी थोड्याच अवधीत लोकांना आपली चूक कळून येऊन त्यांचे प्रयत्न हळूहळू सर्व दिशांनीं होऊं लागतात. " धार्मिक, सामाजिक, औद्योगिक, राजकीय, या शाखा परस्परांपासून अलग करूं पहाणें ह्मणजे राष्ट्ररूपी विराट शरिराचे अवयव वेगळे करूं पहाण्यासारखें आहे; या सर्व बाबी परस्परावलंबी आहेत, व ह्मणून त्या सर्वांचा विचार एकसमयावच्छेदेंकरूनच झाला पाहिजे; राजकीय गोष्टींत अधिकारी वर्गानें लोकमताच्या तंत्रानें वागणें जसें अगत्याचें आहे, तसेंच धर्माच्या बाबतींत धर्मगुरूंनींही लोकमतास मान देणें अवश्य आहे; तो त्यांनीं दिला नाहीं, तर त्यांचें धर्मगुरुत्वच नष्ट होईल; ही गोष्ट लोकांनीं धर्मगुरूंच्या प्रत्ययास आणून दिली पाहिजे; " इत्यादि विचार, होतां होईतों लोकांच्या रूढ समजुतीस धक्का लागूं देऊं नये, असें इच्छिणाऱ्या लोकाग्रणींसही प्रसंग साधून स्पष्टपणें लोकांपुढें मांडावे लागतात; आणि लोकांनाही ते हळूहळू ग्राह्य वाटूं लागतात. या संक्रमणावस्थेंत सध्यां आम्ही आहोंत, तेव्हां अशा स्थितींत माझ्या मूक, अनाथ, देशभगिनींच्या वतीनें यथाशक्ती तयार केलेल्या या माझ्या अर्जाचा मला मुख्य न्यायाधिशाच्या स्थानीं असणारा जो हिंदु स्त्रीपुरुषसमाज त्याजकडून अनुकूल विचार झाल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी मला आशा आहे. ती अस्थानीं नाहीं, हें दाखवण्याची समाजास सुबुद्धी होवो, व हिंदुसमाजावरील हा पक्षपातकलंक धुवून निघो, असें चिंतून ही प्रस्तावना पुरी करितों.

सातारा, ता. २५ दिसेंबर १९०७.

सिताराम गणेश देवधर.

———

नाटकांतील पात्रें.

हरभट– एक धनलोभी बाप.
नानासाहेब– एक वृद्ध विधुर.
रामशास्त्री– लग्न जुळवणारा मध्यस्थ.
पुरुषोत्तम– रामशास्त्र्यांचा प्रगमनशील मुलगा.
दामोदरपंत– नानासाहेबांचा कारकून.
पिलंभट– एक भिक्षुक.
गोपाळराव– एक सुधारणेच्छु गृहस्थ.
गणपती– सरस्वतीचा नवरा.
स्वच्छंदराव– एक स्वेच्छाचारी गृहस्थ.
दुटप्पीराव– स्वच्छंदरावांचे एक स्नेही.
रामदासी– त्रिवेणीला फशी पाडणारा एक ब्रह्मचारी रामदासी.
बिंदुमाधवशास्त्री– श्रीशंकराचार्यांकडे अर्ज पाठविण्याच्या कामीं पुढाकार घेणारे एक लोकमान्य शास्त्री.
चिंतामणराव, वामनराव, गंगाधरपंत, बचंभट, वगैरे ब्रह्मवृंदाच्या सभेचे सभासद.
जोतिबा– नानासाहेबांचा गडी.
गणबा– नानासाहेबांच्या गतभर्तृका मुलीच्या सासरचा गडी.
एक तुरुंगावरील शिपाई.
सुशीला– हरभटाची उपवर कन्या.
त्रिवेणी– सुशिलेची वडील गतभर्तृका वहीण.
राधाबाई– हरभटाची बायको.
सत्यभामा– नानासाहेबांच्या गतभर्तृका मुलीची सासू.
यशोदा, रमा– सत्यभामेच्या शेजारणी.
सरस्वती– सत्यभामेची न्हाण आलेली सून.
गंगाजी, राधाजी– उठून गेलेल्या दोन गतभर्तृका बाहिणी.
सगुणा– गोपाळरावांची गतभर्तृका वहीण.
कांहीं विधवा मुली.

शुद्धीपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध.
४	१५	त्यातें	त्यांतें
४	२६	तयातें	तयांतें
५	८	जरी	जरि
१०	२	सत्यवदा	सत्य वदा
१७	७	का	कां
२५	२६	न लग्न	नच लग्न
२७	२७	मातें	माते
३३	७	कां	का
३४	५	कुमारी स्थिती	कुमारीस्थिती
४३	१७	धोपटे	धोपाटे
४४	२४	विधवा परि	विधवापरी
४४	२८	कळुनियां	कळुनिया
४७	२१	'पडल्या' हा शब्द गाळावा	
६५	१५-१६	द्रवुनियां	द्रवुनिया
६६	६	अभिमतजनपदीं	अभिमतजनपदिं
६७	१	तुझीही	तुझी ही
६८	२	आज !	आज
७२	१८	व्याभिचारो	व्यभीचारो
८२	१५	मि	मी
८३	२३	त्रिवेणी–	त्रिवेणी–(उभी राहून)
१०३	२५	जनांच्या	जनाच्या
१०४	९	याजला	बांजला
११	१०	मुली–	मुली (पुढें येऊन)
१०६	२३	न्यायनीतीचा	न्यायनीतिचा
१०६	२४	तत्राणा	तत्त्राणा

पद-(फटक्याच्या चालीवर)

होइल कैचें सुखधामाचें । अपणापुढती द्वार खुलें । अप०।
कर्तव्यामाधिं रत त्याची ही । कर्त० । चिंता सारी दूरि पळे॥ध्रु०॥

अज्ञानाचें पटल पसरलें दुःखहि किति या जगिं भरलें ।
अणुभर तरि तें दूर कराया मनःपुरःसर जरि झटलें ।
तरिच बापहो ! नरजन्माला आल्याचें सार्थक झालें ।

हें कर्तव्यचि इहपरलोकीं। हें० । होइलँ अपणा खचित भलें ॥१॥

संगीत

सुविचारविजय.

अंक १ ला.

(सूत्रधार कांहीं नटांसह मंगलाचरण करीत असलेला दृष्टीस पडतो.)

पद– (राग भूप, ताल त्रिताल)

तोचि मनुजजन्माला। आला। तोचि खचित कृतकार्य जहाला।ध्रु.
रंजुनि गांजुनि जो का गेला । आपंगीता नाहिं जयाला ।
ऐशा दीना ह्मणवुनि अपुला । प्रेमें धरि जो हृदयिं तयाला॥१॥
साधु ओळखा त्या सुजनाला । जाणा देवहि तेथचि वसला ।
तुका ह्मणे किति सांगुं तुह्माला। भगवंताचा तो जगिं अवतरला॥२
यास्तव ऐशा सत्पुरुषाला । कार्यारंभीं करुं नमनाला ।
तत्कृतिचिंतन वळवो मतिला । दुःख जगींचें दुरवायाला ॥३॥

पद–(राग काफी, ताल दीपचंदी)

देवो शिव तो चिन्मयरूपी हृदयाधीश तुह्माला ।
प्रसन्न करितां नेइ नरा जो नारायणपदवीला ॥ ध्रु० ॥
चिन्मय हृदयिं वसे, परि परिणति यत्नाविण न तयाला ।
परिणत होतां, जात मतीची परवशता विलयाला ॥ १ ॥
स्वातंत्र्याच्या स्वादाचा मग घडुनी अनुभव मतिला ।
पूत मना जें, तें अचराया येई धैर्य नराला ॥ २ ॥
द्रवुनि हृदय कळवळतें ऐकुनि आर्ताच्या हाकेला ।
धावुनि जाई तत्साह्या नर, विगणुनि विघ्नशताला ॥ ३॥देवो०

(नट जातात.)

सूत्रधार–(पुढें येऊन) आपल्या आगमनानं मजवर अनुग्रह करणारे सन्मान्य प्रेक्षकहो ! आह्मी आज ज्या ' सुविचारविजय ' नामक नाटकाचा आपणांपुढें प्रयोग करून दाखवणार आहों, त्याच्या कर्त्याची आपणास अशी विज्ञप्ति आहे कीं:—

दिंडी.

रचुनि नाटक जनिं कीर्ति करुनि घ्यावी ।
करुनि रंजन जनमनें तोषवावीं ॥
धरुनि हेतू हा यत्न असे केला ।
स्थान द्यावें मनिं या न कल्पनेला ॥ १ ॥

यावर आपण साहजिकच अशी पृच्छा कराल कीं:–

साकी.

काय हेतु मनिं योजुनि मग ही नाटकरचना केली ।
विस्तारें तें विदित कराया पहा ! प्रिया ही आली ।
पुढती ये भार्ये । अपुल्या कार्या करि आर्ये ॥ १ ॥

नटी–(प्रवेश करून) पद–('व्यर्थ अम्ही अबला०' या चालीवर).

वचन दिलें परि तें । प्रसंगीं । कठिण मला गमतें ॥ ध्रु० ॥
काय मला जन ह्मणेल ह्मणुनी कंपित तनु होते । पहाही ।
कंपित० ॥ १ ॥ वचन० । प्रसंगीं । कठिण० ॥
धैर्य गळे मम निश्चय वितळे काय करूं यातें । सुचेना ।
काय० ॥ २ ॥ वचन० । प्रसंगीं । कठिण० ॥

सूत्र०– सखे, हें तुझं भाषण ऐकून जरी मला खेद होतो, तथापि त्याचं मला आश्चर्य वाटत नाहीं मोठमोठे धीर गंभीर ह्मणविणारे विद्वानही 'वचने किं दरिद्रता' या न्यायानं आधीं गोडगोड आश्वासनं देऊन, प्रसंगीं जर वचनपराङ्मुख होतांना नेहमीं दृष्टीस पडतात, तर स्त्रीस्वभावाला साहजिक जी कातरता, तिनं तुला असं वदवावं हें साहजिकच आहे; अथवा तुझ्या या आचरणानं असल्या तोंडशूरांची कृती तूं जणूं अभिनीतच करून दाखवलीस ह्मणायची ! पण सखे, या लौकिकाच्या भरीं भरून विचाराला कसं पारखं व्हावं लागतं याचा तूं विचार केला नाहींस. श्रीसमर्थ रामदासस्वामी ह्मणतात, 'काय करूं मज लागला लौकीक । तेणें हा विवेक दूरी जाय ॥ राखवेना मन बहुता जनांचें । आणि सज्जनाचें वर्म चुके' ॥ तेव्हां दुर्जनांचं मन राखणं श्रेयस्कर कीं सज्जनाचं वर्म न चुकवणं

श्रेयस्कर, याचा तूंच विचार कर. साधु तुकाराममहाराज यांचाही उपदेश ऐक. ते सांगतात कीं, 'लोक जैसा ओक। धरितां धरवेना'। माणसानं आपल्याकडून कितीही पराकाष्ठा केली, तथापि 'मृदंगाला दोहींकडून थाप' ह्मणतात, त्याप्रमाणं लोक त्याला कशींना कशीं नावं हीं ठेवणारच. श्रीरामचंद्रालाही जर हा लोकापवाद टाळतां आला नाहीं, तर इतरांची कथा काय? तात्पर्य, विचाराला संमत दिसेल, तें करावं, हाच उपदेश एकंदरींत पथ्यकर होय. शिवाय सखे, तूं असं पहा कीं, जनहितासाठीं ज्यांनीं नाना कष्ट सोसले, कारागृहवास पतकरला, इतकंच नव्हे, तर प्रसंगीं सर्वांहून प्रिय अशा प्राणाकडंही पाहिलं नाहीं, असे नरश्रेष्ठ आपणास प्रत्यक्ष अथवा इतिहासगोचर असतां, यःकश्चित् कुजननिंदेला भिऊन आपण आपल्या कर्तव्याला अंतरावं काय? छे छे!:—

साकी.

मागें घेशी भिउनि लौकिका योग्य न हें सखये गे।
विगतपतीच्या विपदा कैशा लयास जातिल सांगे।
करि तूं सुविचारा। सोडी भीति निराधारा॥ १॥

नटी– पद्– ('दूर मि झालें या अंकाच्या०' या चालीवर.)
भाषण तव परिसुनिया सखया विलया भय गेलें।
वचन दिलेलें कार्य कराया। धैर्य मला आलें॥ १॥
करुनि विलंब मिं सभ्यांना या गमतें रोषविलें।
करुत क्षमा मज, करितें सत्वरि कर्तव्य मि अपुलें॥

सन्मान्य सभाजनहो:—

पद–('वैशाखमास वासंतिक०' या चालीवर)
विविध ताप विगतपती युवति भोगिती।
अशरण त्या दीन गाइ, दुजि न त्यां गती॥ ध्रु०॥
कवटाळिति रूढिस जन, घात करि जरी।
सुमति सती मूढमती ढकलिती दुरी।
नारिनरा न्याय पहा भिन्न लाविती॥ १॥ विविध०॥
विधुर नवरदेव सजति जरठ असुनिया।

कन्यांचे देति बळी जनकही तया ।
बहिष्कार परि न कुणी त्यांसि घालिती ॥२॥ विविध० ॥
परि बाला पतिहीना लग्न करूं ह्मणे ।
'पातीति पतिः' करुनि शास्त्रि माजविति रणें ।
मूढपणें झिडकारिति शास्त्रसंमती ॥ ३ ॥ विविध० ॥

सूत्र०—सखे, तूं वर्णिलेली ही स्थिती अक्षरशः खरी आहे, यांत संशय नाहीं !

नटी— तरी पण एवढ्यानं ह्मणजे विधवांच्या दुःखाची कहाणी संपते, असं नाहीं. दुःखावर डाग ह्मणतात त्याप्रमाणं आणखी त्यांची कसकशी विटंबना होते पहा !:—

पद-(' सुटला पितृदिशेचा० ' या चालीवर)

पापें पूर्वजन्मिं ज्या करिती। त्या या जन्मीं विधवा होती ।
ह्मणुनी तें निमुटपणें भोगावें ह्मणती ।
न्याय न हा कोणी विधुरा लागू करिती ॥ १ ॥
विलया न्याया विषयप्रीती । त्यातें बालवयांतहि मुंडिती ।
नेमव्रतें अनेक दुःसह लावुनि देती ।
विधुरांते न कधीं परि तीं कोणी कथिती ॥ २ ॥

सूत्र०—पण वैराग्याला अनुकूल अशी जोंपर्यंत मनाची स्थिती झाली नाहीं, तोंपर्यंत या जुलमानं दिलेल्या संन्यासदीक्षेचा उपयोग व्हावा तरी कसा ?

नटी—आणि तो होतही पण नाहीं. विधवेला विद्रूप केली, कीं सारा घोर मिटला, ह्मणून लोक जरी आपल्या मनाची कशीबशी समजूत घालीत असतात, तथापिः—

पद—(चाल सदर.)

प्रयत्न परि हे विफलचि होती । विषयें मोहुनि फसती युवती ।
फसवीती कितिक तयातें विपथीं नेती ।
अधमपणें संकटकालीं सोडुनि जाती ॥ ३ ॥
कुणि मग ठाव वापिचा बघती। बालकहत्या कुणि आचरिती ।
कुणि विकिती शरिरा न करी जनता खंती ।
नित्य जरी घडते यापरि घोर अनीती ॥ ४॥

सूत्र०–हे असले अनर्थ प्रत्यहीं घडत असून आमची तिकडं डोळेझांक व्हावी, हें किती तरी निराशाजनक आहे!

नटी–तें कांहीं खोटं नाहीं. तरी पण या नाटकाच्या कर्त्याला असं वाटलं, कीं रूढीनं अंध करून टाकल्यामुळं या अत्यंत उद्वेग-कारी स्थितीकडं लोकांची दृष्टी जरी जाईनाशी झाली आहे; तथापिः–

पद–(राग पिलू, ताल धुमाळी.)

फिरुनि फिरुनि परि नाटकव्याजें हृदयद्रावी स्थिती।
दाविली जरी ही सुजनांप्रती।
न्यायनीतिच्या चंद्राचा हा ग्रास दिसुनि निश्चिती।
तयांच्या मनिं होइल जागृती॥
ह्मणुनि सरस्वतिगणेशतनयें वळवाया जनमती।
रचियली यथामती ही कृती॥
(चाल) ती द्रवविल अपणा धरुनि आस ही मनीं।
मी न्यायबुद्धिवरि अपुल्या विश्वासुनी।
प्रार्थितें आपणापुढति पदर पसरुनी।
यावी पुनरपि सनाथ व्हाया अनाथ बालांप्रती।
सदयहो! न्याय स्मरुनि संमती॥ १॥

(पडद्या पलीकडे)

हा दुष्टे! निर्लज्जे!:—

प्रबंध–('सारिकेगे चंद्रिकेचें० या चालीवर') ताल तेवरा.

स्त्रीस ह्मणती मुख्य भूषण सकल जन जीतें।
सोडिशी ती लाज कैशी धरिशि धाष्टर्यातें।
ह्मणसि विधवालागि संमति यावि लग्नातें।
कैशि बेचाळीस पूर्वज नेशि नरकातें॥ १॥

नटी–(दचकून) प्रिया! माझ्या भाषणानं दया न येतां उलट क्रोधाविष्ट होणारा हा मानवाधम कोण बरं? याचे हे शब्द ऐकून माझ्या उरांत तर बाई धडकीच भरली!

सूत्र०– सखे, तुझी विनंती ऐकली न ऐकली, तोंच तिला सर्वांची मान्यता मिळेल, असं तुला वाटलं तरी कसं? आणि असल्या

शिव्याशापांनीं तूं जर अशी घाबरून जायला लागलीस, तर तूं माझं साह्य करणार तरी कशी ? आपण हातीं घेतलेल्या कार्याच्या सिद्धीला सर्वांच्या आधीं लक्षांत ठेवायची गोष्ट ह्मटली ह्मणजे:-

पद- (' व्हावा थोर तुं० ' या चालीवर)

रूढीतट भेदायाला । अधीर न वीर कधीं शकला ।। धृ० ।।
फिरुनि फिरुनि सखि करुनिहि मारा यत्न विफल जरि जहाला।
धैर्य न खचतां पुनरपि लढतो तो पावे विजयाला ।।रूढी०।। १

शिवाय असल्या या शिव्याशापांनीं भेदरून जाणं योग्य नाहीं, इतकंच नाहीं, तर उलट:—

दिंडी.

शिव्याशाप न हे पुष्पवृष्टि पाही ।
कार्यसिद्धीची प्रथम पायरी ही ।।
आधिं कडु जें तें गोड अंतिं होई ।
दिसत अनुभव हा नित्य ठायिं ठायीं ।। १ ।।

असो, सध्या तर तुला भिण्याचं मुळींच कारण नाहीं. आतां नुकतीच जी क्रोधवाणी तूं श्रवण केलीस, ती कुणाची, हें तूं घाबरून गेल्यामुळं तुला ओळखलं नाहीं. अग, हा तर लोभी हरभटाची भूमिका घेणारा माझा ज्येष्ठ भ्राता, तुझ्या भाषणानं क्रुद्ध झाल्याचा आविर्भाव करून, आपल्या प्रवेशाची संधी साधीत आहे. करितां इथं उभं राहून याच्या तोंडी लागत बसण्यापेक्षां आपण येथून जावं हें बरं.

(दोघे जातात. ही पुढील कथेची प्रस्तावना झाली. नंतर 'हा दुष्ट !' इत्यादि पूर्वोक्त ह्मणत क्रुद्ध हरभट प्रवेश करितो.)

हरभट—अरे ही वेसवा तर येथून गेली ! काय बेश्रम तरी बायको ! मनाची नाहीं तर नाहीं, पण जनाची तरी हिला लाज हवी होती कीं नाहीं ! आपण कोण, करतों काय, लोक आपल्याला काय ह्मणतील, याची थोडी तरी क्षिती बाळगायची होती ! छे ! या इंग्रजी विद्येनं आणि इंग्रजी कायद्यानं माणसाचा अगदीं ताळच सुटून गेला ! हीच पेशवाई असती , तर आह्मींच पाहिले असते यांचे तमाशे ! जिभाच कापून टाकल्या असत्या गुलामांच्या !

पुरुषोत्तम–(प्रवेश करून) कां **हरभटजी**, पेशवाई असती तर कुणाचे तमाशे पाहिले असते ? आणि कुणाच्या जिभा कापून टाकल्या असत्या ?

हरभट–तुमचे तमाशे पाहिले असते तुमचे, समजलात **पुरुषोत्तमपंत** ! अरे याला अजून पुरतं मिसूहि फुटलं नसेल, आणि मोठ्या आढ्यतेनं मला विचारतो, ' कुणाचे तमाशे पाहिले असते ' ह्मणून ! मला ठाऊक आहे, तूं त्या काय कालीज का काळीज ह्मणतात त्यांत शिकत होतास. तेव्हां तुला तरी आपल्या बापआजांची चालरीत कोठून लागणार ? दुसरे नुसते तोंडानंच बोलतात, पण तूं तर प्रसंग पडल्यास स्वतांच पुनर्विवाह लावायला चुकायचा नाहींस.

पुरु०–अस्सं ! अस्सं ! आतां समजलं ! एकूण पुनर्विवाहास प्रतिबंध नसावा, असं ह्मणणाऱ्या मंडळीवर ताव झडतो आहे हा आपला ! पण मी विचारतोंः–

पद–(' शारदे दासकामदे० ' या चालीवर)

जरि जरा । वाकवी नरा । तरिहि नोवरा । फिरुनि व्हा ह्मणतां ।
परि विधवा सधवा व्हावी ह्मणतां जळतां ॥ १ ॥
हा फुका । पक्षपात का । मज न ठाउका । गूढ तुह्मि उकला ।
हें आधीं, मग या सुखें शिव्याशापाला ॥ २ ॥

अहो ' अंगं गलितं पलितं मुंडं । दशनविहीनं जातं तुंडं । वृद्धो याति गृहीत्वा दंडं ' अशी स्थिती होऊन ज्याच्या अर्ध्या गोवऱ्या आधींच गंगेवर गेल्या आहेत, अशा थेरड्यांनींही, एकदांच नव्हे तर वाटेल तितक्यांदा पुनर्विवाह करण्यास तुमची हरकत नसावी, आणि जिला नवरा ह्मणजे काय, हेंही पुरतं समजत नाहीं, अशा अल्लड मुग्ध पोरीला तुम्ही जन्माची विधवा करून ठेवावी, हा काय न्याय झाला ?

हर०–अहो इंग्रजी विद्वान् न्याय आणि अन्याय काय तो आपल्यालाच कळतो, आणि ज्यांनीं हीं सारीं शास्त्रं करून ठेवलीं, ते ऋषी केवळ मूर्ख होते असं का तुह्मी समजतां ? ते तर त्रिकालज्ञानी

होते. पण 'पुरुष ते पुरुष आणि स्त्रिया त्या स्त्रिया' हें त्यांच्याप्रमाणं तुह्मांला कळेल तेव्हां ना?

पुरु०—अहो, त्या प्राचीन पुण्यकर्मींची तुह्मी अशी व्यर्थ नालस्ती कां करितां? त्यांनीं तर स्त्रीपुरुषांत हा निष्कारण भेद कधींच राखला नव्हता. त्यांच्याप्रमाणं तुह्मालाच हें वास्तवीक कळायला पाहिजे कीः—

दिंडी

भेद शरिरीं जरि स्वल्प असे केला।
सृष्टि पुरुषाहुनि भिन्न गणि न स्त्रीला।
देहधर्मांपरि धर्मही मनाचे।
असति एकचि नरनारिमधीं साचे॥ १॥

सृष्टपदार्थांचा स्त्रीपुरुषांवर कधीं विपरीत परिणाम घडतो काय? पर्जन्य पुरुषांना तेवढा भिजवितो, आणि स्त्रियांना कोरड्या ठेवतो, असं तुह्मी कधीं पाहिलं आहे काय? प्रखर सूर्यतापानं तापलेली भूमी पुरुषांच्या पायांना तेवढे चटके देते, आणि स्त्रियांना ती चंद्रकिरणांप्रमाणं शीतल भासते, असं कधीं झालं आहे काय? जें अन्न पुरुषांना पुष्टी आणतं, तें स्त्रियांना कधीं रोड करतं काय? ज्या रोगावर जें औषध पुरुषांना गुणकारी होतं, त्याच रोगावर तेंच औषध दिल्यानं स्त्रियांचा आजार दुणावलेला कोणाच्या दृष्टीस पडला आहे काय? आवडनावड, आशानिराशा, सुखदुःख, इत्यादिकांचा पुरुषांवर जसा अनुकूल प्रतिकूल परिणाम घडतो, तसाच तो स्त्रियांवरही घडत नाहीं काय? आणि तो घडतो, हें जर खरं आहे, तर तुह्मी स्त्रीला एक न्याय आणि पुरुषाला दुसरा, असं कां करावं?

हर०—अरे म्हणून का बायकांना पुनर्विवाह करूं द्यावा कीं काय? तुला कदाचित् त्यांत पुण्यप्राप्ती दिसत असेल, पण आम्हाला कांहीं धर्माधर्माचा विचार पाहिला पाहिजेना?

पुरु०—स्त्रियांनीं फिरून लग्न करणं म्हणजे मोठी पुण्यप्राप्ती आहे, असं माझंही पण म्हणणं नाहीं. तथापि पुरुषांनींही एक बायको मेली कीं दुसरी, दुसरी मेली कीं तिसरी, असं करीत राहणं ह्मणजेही कांहीं परमार्थसाधन नव्हे. यापेक्षां दोघांनींही आपलं आयुष्य

परोपकार कृत्यांत खर्च केलं तर त्यांचा तो कित्ता इतरांना अनुकरणीयच होईल, यांत संशय नाहीं. इतकंच नव्हे, तर स्त्रीपुरुषांनीं सदैव ब्रह्मचारी राहून आपल्याला जनहिताला वाहून घेतलं, तर तेंही सध्याच्या स्थितींत इष्टच होणार आहे. आणि या दृष्टीनं पहातां, ' वसुधैव कुटुंबकं ' ही वृत्ती ज्यांच्या हृदयांत बाणून गेली आहे, असे विधूर काय अथवा विधवा काय, ब्रह्मचारी काय अथवा कुमारिका काय , या सर्वांची, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टवीती उपकारें ' या कोटींतच गणना होऊन, केव्हांही झालं तरी ते सर्व जगाला वंदनीयच होऊन रहातील, यांत संशय नाहीं. परंतु श्रेष्ठ मनोवृत्तींनीं प्रेरित होऊन, स्वेच्छेनं स्वीकारलेलं वैराग्य प्रशंसनीय असलं, ह्मणून सर्वच तरुण विधुरांना अथवा विधवांना तें जुलमानं घ्यायला लावणं, हा केवळ अविचार होय. आणि त्यांतही विधवापुरती मात्र अशी सक्ती करून आसन्नमरण अशाही विधुराला फिरून खुशाल लग्न करूं देणं, ह्मणजे त्या अविचारांत आणखी अन्यायाची भर घालणं नव्हे काय ?

हर०– अरे ! पण विधवांप्रमाणं विधुरांनाही लग्न करूं दिलं नहीं, तर वंशखंडन होईलना ? त्याची काय वाट ?

पुरु०– पण विधुर जे फिरून लग्न करतात, ते वंशखंडन होऊं नये ह्मणूनच जर करतात, तर मग ज्यांना मुलं आहेत अशा विधुरांनीं फिरून लग्न करण्याचं अर्थातच कारण नाहीं ?

हर०– वहावाहो शहाणे ! खूप अक्कलवंत दिसतां ! अरे मी नुसतं वंशखंडनाबद्दल बोललों, तेवढंच धरून बसून माझ्याच तंगड्या माझ्याच गळ्यांत घालायला पहातोस होय ? अरं मुलं असलीं, तरी स्त्रीवांचून अग्निहोत्राला अधिकार नाहीं, हें नाहींका तुला ठाऊक ? पण तुला खरंच तें कुठून माहीत असणार ! कधीं संध्येचा जर आधीं उच्चार होत असेल, तर पुढं मग अग्निहोत्राचं नांव !

पुरु०– हें पहा हरभटजी, मी जरी कधीं संध्येचा उच्चार करीत नसलों, तरी आधीं मला हें सांगा, कीं फिरून लग्न करणारे सगळे विधुर अग्निहोत्राकरतांच तें करतात नाहीं ? अहो:–

पद्– (' भज भज भवजलधि० ' या चालीवर).

स्मरुनि मना सत्यवदा । लपंडाव कांहो ॥ ध्रु० ॥
अग्निहोत्रपुण्यप्राप्ति । वंशखंडनाचि भीति ॥
करुनि पुढें सत्य स्थिती । लपवूं नकाहो ॥१॥ स्मरुनि०॥
विषयेच्छा प्रबल फार । विधुरा हो दुर्निवार ॥
हेंचि असे मुख्य सार । छपवूं नकाहो ॥ २ ॥ स्मरुनि० ॥

सारांश, सत्य गोष्ट लपवण्याचा कितीही प्रयत्न केला, तथापि ती बाहेर पडणारच. कुठं वंशखंडनच होऊं नये, अग्निहोत्रालाच अधिकार पाहिजे, या सगळ्या खरा प्रकार लपवण्याच्या युक्त्या आहेत. तुह्मी त्याला वाटेल तीं नांवं द्या, परंतु त्या सर्वांच्या मुळाशीं नैसर्गिक विषयवासना तृप्त करण्याची इच्छाच प्रधान असते, हें कोणासही नाकारतां यायचं नाहीं. आणि अशा प्रकारें आपली मनीषा तृप्त करण्यासाठीं वाटेल तशा युक्त्या लढविणाऱ्या स्वार्थी पुरुषांनीं, स्त्रीपुनर्विवाहाचं कुणी नुसतं नांव काढलं, कीं अगदीं तेरीमेरीवर यावं, याला काय ह्मणावं ? असो; या बाबतींत ' भवति न भवति ' करींत बसण्यापासून कार्यनिष्पत्ती थोडीच होणार आहे ! तरी पण आणखी एकच गोष्ट विचारतों, त्याचं तेवढं उत्तर द्या ह्मणजे झालं. मी म्हणतों कीं:—

श्लोक– (पृथिवीवृत्त.)

' कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली ।
पुरःसर गदांसवें झगडतां तनू भागली ॥ '
अशापरि जरी पुढें यमचमू उभी ठाकली ।
तरी फिरुनि व्यावया सजति बालिकांचे बळी ॥

असे हे सर्व नरपशू अग्निहोत्राचं पुण्य गांठीं बांधण्याकरतांच हपापलेले असतील, परंतु अशांना आपल्या पोरी देणारे बाप कोणतं पुण्य संपादन करतात बरं ? यालाहीं कांहीं शास्त्राधार असेलच !

हर०– अरे हो, यालाही आहे शास्त्राधार. मोठा शहाणा आला आहे मला विचारायला ! मूर्खशिरोमणी नाहीं तर ! तुमच्यासारख्या भ्रष्टांच्या तोंडीं लागतो कोण ? पाद्री तुह्मी ! चल माझ्यासमोरून

चालताहो! फार फाजीलपणा करशील तर खबरदार! हलकट कुठला!

पुरु०– अहो तुह्मी मला एक सोडून शिव्यांची जरी लाखोली वाहिलीत, तरी त्याची मी पर्वा करीत नाहीं. त्रिवेणीच्या गळ्याला फांस लावून तिच्या संसाराची तर तुह्मी आधींच वाट लावून टाकली आहे. तोच प्रकार सुशीलेचाही होऊं नये, ह्मणून केवळ इशाऱ्या-दाखल मी तो प्रश्न तुह्माला विचारला.

हर०– अरे जा! मोठा आला आहे शहाणा मला इशारा द्या-यला! माझ्या पोरींची तुला काय पंचाईत! हो हो, सुशीलेलाही मी म्हाताऱ्यालाच देणार! तुझ्या काय बापाचे दोन चव्वल खर्च होतात त्यांत?

पुरु०– नकाहो हरभटजी असा पोटच्या पोरीचा घात करूं! अहो, काट्यांवर वस्त्र घालून तें फाटतं कां ह्मणून ओढून पहाण्यांत काय अर्थ आहे? अहो तिचे तुह्मी जन्मदाते असून आपल्याच हातानं तिचा असा गळा कसा दाबतांहो!

हर०– हां जीभ आटप. लहान तोंडीं मोठा घांस ह्मणजे? बोल-ण्याला कांहीं मर्यादा पाहिजे कीं नाहीं! पाजी!

पुरु०– पद–(' नाहीं सुभद्रा या वार्तेला० ' या चालीवर.)

मर्यादेला आग लागु दे जी लपवी सत्या।
वाचा फुटुनी हिंस्रपशूही निंदिल या कृत्या॥ ध्रु०॥
निज कन्येला जरठ वराला कांहो बळि देतां।
बहुल्यावरतिच कुमारिकेला कशि विधवा करितां।
शतपट याहुनि बरवी वाटे मज कन्याहत्या॥१॥ मर्या०॥

खरं ह्मटलं तर आपलं पहिलं पाप निस्तरण्याकरितां तुह्मी त्रिवेणीचं फिरून लग्न करावं, तें सोडून—

हर०– (त्यास मध्येंच थांबवून) पुरे पुरे! आपली अक्कल फार वहायला लागली. तुझे हे तांबडे डोळेच सांगतात कीं तूं शुद्धीवर नाहींस ह्मणून. आतां हे तारे तोडण्याचं बंद करा आणि आपला रस्ता सुधारा?

पुरु०–हा मी चाललों! पण जातां जातां इतकंच बजावून ठेवतों कीं, मी सांगतों तें ऐका, नाहीं तर पुढं पस्ताव्यांत पडावं लागेल!

हर०—बरं बरं लागू दे पडावं पस्तावयांत. एकदाचं काळं करा ह्मणजे मिळवली !

पुरु०—(जातां जातां आपल्याशीं) हा थेरडा पेशवाई असती तर विधवाविवाहाला हरकत नसावी ह्मणणारांचे तमाशे पहाणार ! आणि सोन्यासारखी एक मुलगी द्रव्यलोभानं आधींच विधवा करून ठेवली असून दुसरीचीही तीच गती करूं पहाणाऱ्या या नरपशूचे तमाशे कोणी पहावे ! हर ! हर ! ! काय आमच्या लोकांची शोचनीय स्थिती होऊन गेली आहे !

पद—(' जठरानल शमवाया' या चालीवर)

प्रेम न धर्मावरि कोणाचें । सर्वहि बंदे दास रुढीचे ॥ ध्रु० ॥
भुलुनि धनाला निजकन्येला । जाणुनि बुजुनी वैधव्याला ॥
देइ जनक तरि त्या अधमाला । आणि न मनिं कुणि दंडायाचें॥१
परि ती बाला लग्न फिरोनी । करितां सर्वहि मी मी करुनी ।
अबलेवरि त्या शस्त्र धरोनी । दाविति भेकड शौर्य अंगिचें॥२॥

असो, आहे तें ठीकच आहे. (जातो.)

हर०—(आपल्याशीं) काय बेटीं अलीकडचीं टारगीं पोरं ! मला आपला बेधडक ह्मणतो कीं, त्रिवेणीचा पुनर्विवाह लावा ह्मणून ! तें याला वाटतं पुण्य ! आणि मी तिला म्हाताऱ्याला दिली यांत दिसतं याला पाप ! पण मी तिचं काय वाइट केलं होतं ? चांगलं खायला होतं, प्यायला होतं, दागदागिने होते, सर्व कांहीं होतं. तिच्या नशिबीं नाहीं, त्याला मी काय करावं ? आणखी जे अगदीं तरण्याला देतात, त्यांच्या नाहीं का पोरी होत विधवा, आणि ह्मातारे असले, तरी ते नाहीं का ८०–८० आणि ९०–९० वर्ष वांचत ? त्यांचा नाहीं का होत संसार ? त्यांना नाहीं का होत मुलंबाळं ? हें सगळं नशिबावर आहे. सुशीलेला झालं तरी हीच गोष्ट लागू. बरं, मी एक तिला ह्मताऱ्याला नाहीं दिली, ह्मणून म्हाताऱ्यांचीं लग्नं व्हायचीं थोडींच राहताहेत ! मी नाहीं माझा काका दुसरा ! तेव्हां त्याला खुशाल तुंबडी भरूं देऊन, मी तेवढं कानांत तुळशीपत्र घालून बसावं, हा कोणत्या मुलखांतला न्याय ? तें कांहीं

नव्हे; दुसऱ्याला उपदेश करायचा झाला, कीं सगळे साधू बनतात पण कृती पाहिली कीं सगळ्यांची एकच. हाच पुरुषा उद्यां एखादा कामगार होऊंद्या, ह्मणजे पहा कसं खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करून, पैसे उकळायला लागेल तो! पैसे मिळवायचे ह्मणजे ते असेच मिळवायला पाहिजेत! पण मला आधीं या भलत्याच वादांत पडायला सांगितलं होतं कुणी? मी मूळ घरून निघालों रामशास्त्र्यां-कडं जायला. तें सोडून या बाटग्याच्या तोंडीं लागत बसलों, हीच चूक झाली. ते नाहींत अजून या आपल्या मुलाप्रमाणं साधू बनले. तेव्हां कसंही करून त्यांच्या हातून तें नानासाहेब पांडुरंग्यांचं स्थळ तेवढं काबीज केलं पाहिजे. विलंब झाल्यानं कदाचित् हातची शिकार जायची. करतां आतां ताबडतोब त्यांची गांठ घ्यावी, हें बरं. (जातो.)

प्रवेश २ रा.

(नानासाहेब आपल्या ओसरीवर सचिंत बसले आहेत.)

नाना०– पद– (' वारी संकट हरि० ' या चालीवर.)

मन हें शंकाकुल होउनि जाई । निश्चय नच होई ॥ ध्रु०॥
वाटे वृद्धाची भार्या काठी । तिजविण नड मोठी ।
ह्मणती व्याधिच ती दुसरी पाठीं । भीति न ही खोटी ।
द्विधा होउनी यापरि मति ही । मज न सुचे कांहीं॥१॥ मन०॥

काय करावं! मनाचा कसा तो निश्चयच होत नाहीं! एकदां वाटतं काय होईल तें होवो, पण आपलं लग्न करावं हें चागलं. कारण एक बायको नाहीं, म्हणजे दुसरीं सर्व सुखं असून नसल्यासारखींच ह्मणायचीं. याचा अनुभव मागेंही एकदां आला आहे, आणि आजही येत आहे; आणि त्यांतही हा स्त्रीवियोग आतां तर मला भारीच दुःसह होऊं लागला आहे. तेव्हां अशा स्थितींत बायकोशिवाय निभावं कसं? इंद्रियद-मनाच्या गोष्टी बोलायला अगदीं सोप्या, पण करायला फार कठीण! फिरून वाटतं, हो हें सारं खरं, पण मी होत चाललों ह्मातारा, आणि बायको असणार अगदीं अल्लड वयाची! तेव्हां हा मेळ बमावा कसा?

(किंचित् विचार करून) पण असं नव्हे, सगळ्याच स्त्रिया का पापानं हात धुणाऱ्या असतात? त्यांनाही लोकलाज, कृतज्ञता हीं नसतात का? एखाद्या गरिबाची मुलगी पाहिली, तिला चांगले दागदागिने घातले, तिच्या सर्व हौशी पुरवल्या, ह्मणजे तिचं साहजिकच मजवर प्रेम बसलं पाहिजे. शिवाय दुसऱ्या लग्नाचे वेळीं तरी मी अगदीं तरणाबांड थोडाच होतों. मग तेव्हां जें घडलं नाहीं, तें आतांच तेवढं घडून येईल, ही भीती अगदीं निराधार नाहीं काय? अर्थात् निराधार आहे. एकंदरींत संशयासारखा दुसरा अंधपणा नाहीं, हें खचित. या नसत्या संशयाच्या भोंवऱ्यांत सांपडून मी इतके दिवस उगाच व्यर्थ घालविले. असो, आतां तरी विलंब न करतां एकदम पुढच्या तयारीस लागावं हा उत्तम पक्ष.

गोपाळराव–(प्रवेश करून) कां नानासाहेब, तयारी कशाची करतां? संन्यास घेण्याची कीं काय?

नाना०–(आपल्याशीं) मी करतों आहें फिरून लग्न करण्याचा बेत! आणि हे विचारतात कीं संन्यास घेतां कीं काय ह्मणून! एकूण माझ्या निश्चयाला वेळ तरी चांगली लागलेली दिसत नाहीं.

गोपाळ०–कांहो असे घोंटाळल्यासारखे दिसतां?

नाना०-नाहीं, पण बसाल तर खरे आधीं. तुमचा प्रश्न ऐकून मी जरासा घोटाळलों खरा, पण त्याचं कारण इतकंच कीं, तुह्माला यापूर्वी माझ्याशीं विनोद करतांना मीं कधीं पाहिलं नव्हतं.

गोपाळ०–आणि आतांही पण मी विनोद नाहीं केला. मीं असं ऐकलं कीं, कित्येक मंडळी तुह्माला फिरून लग्न करण्याची गळ घालीत आहेत, पण आपल्याला तें पसंत नाहीं. आणि त्यासंबंधानंच मी आतां मुद्दाम तुमच्याकडं आलों होतों. तों 'विलंब न करतां पुढच्या तयारीस लागावं हा उत्तम पक्ष' हे तुमचे शब्द माझ्या कानीं पडले, तेव्हां मीं साहजिकच विचारलं कीं संन्यास घेतां कीं काय ह्मणून.

नाना०– छे छे! तयारीला लागणार तो संन्यास घेण्याच्या नव्हे; तें तर त्याच्या अगदीं उलट आहे.

गोपाळ०– म्हणजे फिरून लग्न करणार म्हणतां तर?

नाना०– हो, पण त्याला हरकत कशाची ?

गोपाळ०– हरकत तुमचं उतार वय आणि प्रकृतिमान यांची. दुसरी कशाची ?

नाना०–अहो तें मलाही कळतं, पण बायकोशिवाय चालावं कसं ?

गोपाळ०– थोडं मन आवरून धरावं हाच त्याला उपाय.

नाना०– अहो हें सांगायला येतं, करायला येत नाहीं. ' परदुःख शीतल ' म्हणतात, तें खोटं नाहीं. अहो, आज महिनाभर मी कसे दिवस कंठित आहें, तुम्हाला काय सांगूं:—

श्लोक (कामदावृत्त.)

तळमळे जसा जीवनाविणें । मीन त्यापरी मी स्त्रियेविणें ।
आवरा मना ह्मणुनि सांगतां । कठिण तें किती हें न जाणतां १

गोपाळ०– अहो, पण मी विचारतों कीं :—

पद– (' रामकरिं जरि नृपपद० ' या चालीवर)

दुःसह विधुरदशा ही ह्मणतां । सह्य कसें वैधव्या गणितां ।
घरिं कन्या जरि झुरते पहातां । कींव कशी नाहीं ॥ १ ॥
जरि कळ थोडि तुम्हा सोसेना । वृद्धपणींही मन अवरेना ।
सांगा मज मग तें तरुणींना । अवरावें कैसें ॥ २ ॥

अहो, तुमची बायको मरून पुरता महिनाही झाला नाहीं, तोंच तुह्मी बाशिंग बांधायला पहातां, आणि तुमच्या गोदावरीचा सासर तिला फिरून संसारांत घालायला तयार झाला असतां, तुह्मी त्याला खो घालून, पोरीला घरीं आणून, तिला निर्दयपणें सोवळी केलीत; आणि मलाच उलट ' परदुःख शीतल ह्मणतात तें खोटं नाहीं, ' ह्मणून टोमणा मारतां, तेव्हां तुम्हाला काय ह्मणावं ?

नाना०–गोपाळराव उगाच असा दुःखावर डाग देण्यांत काय अर्थ आहे ? माझ्या पोरीबद्दल मला का वाईट वाटत नाहीं ह्मणतां? पण करायचं काय ? शास्त्रानं निदान अशा लहान पोरीपुरती तरी सवड ठेवली असती, तर चांगलं झालं असतं, असं कितीदा तरी माझ्या मनाला वाटलं असेल; पण उपाय काय ? शास्त्र त्याच्या विरुद्ध पडलं, त्याला काय करणार ? तेव्हां गोदावरीच्या पुनर्विवा-

झाला मला संमति देतां येईना यांत माझा दोष काय ? दुसरं तिला मी घरीं आणून सोवळी केली, तीही मोठ्या आनंदानं थोडीच केली ! पण करूं काय ? त्या हेरंबपंतांची हकीकत आहेच तुह्माला ठाऊक. आपल्या बायकोच्या वेड्या मायेला महत्व देऊन, त्यांनीं आपल्या पोरीला तशीच राहूं दिली, त्याचा काय परिणाम झाला ? तिचं वाकड्या मार्गांत पाऊल पडून शेवटीं उठून जाण्या-पर्यंत मजल आली हाच ना ! तेव्हां तसं होऊं नये म्हणून जपणं याला तुह्मी निर्दयपणाच ह्मणतां कीं काय ?

गोपाळ०– अहो पुनर्विवाह शास्त्रसंमत नाहीं, ही तुमची समजूत आधीं चुकीची आहे. दुसरं, मनाची तयारी झाली असल्या-शिवाय नुसतं मुंडन केल्यानं माणसाची विषयवासना नष्ट होते असं मानणं, हेंही अनुभवाला धरून नाहीं. ती नष्ट होणं न होणं हें ज्याच्या त्याच्या वयावर, संगतीवर, शिक्षणावर व मनोनिग्रहावर अवलंबून आहे.

नाना०– बरं तें असू द्या. पण ओघालाच आलं ह्मणून विचा-रतों, त्याचा राग मात्र येऊं देऊं नका. पुनर्विवाह जर तुह्माला अशास्त्र वाटत नाहीं, तर तुह्मी आपल्या बहिणीचा हो कसा नाहीं केलात फिरून विवाह ? कां मूल झाल्यावर तो करूं नये असं तुमचं मत आहे ? का या गोष्टी आपल्या दुसऱ्याला सांगण्यापुरत्याच ?

गोपाळ०– तें मूल असण्यावर नाहीं, अथवा नसण्यावर नाहीं. तें कशावर आहे हें मी मघाशीं सांगितलंच तुह्माला. आतां सगुणे-विषयीं ह्मणाल तर, तिचा नवरा मरून वर्षसहा महिने होऊन गेल्या-वर प्रसंग पाहून एक दोनदां मीं ती गोष्ट काढून पाहिलीही; पण प्रत्येक वेळीं तिचं आपलं उत्तर एक, कीं ‘ एकदां मोडलेली घडी फिरून पहिल्यासारखी बसणं बहुतेक दुरापास्तच, आणि माझी फिरून संसारांत पडण्याची इच्छाही नाहीं. ’ तेव्हां साहाजिकच मला तो विचार सोडून द्यावा लागला. कारण, विधवा झटली कीं तिची इच्छा असो वा नसो, तिनं आपलं फिरून लग्न केलंच पाहिजे, असं माझंही ह्मणणं नाहीं, अथवा दुसऱ्याही कुणाचं ह्मणणं नाहीं. पण

तुमच्या संबंधानं पहातां, तुम्ही सर्व गोष्टींचा नीट विचार कराल तर, तुम्हाला मी सांगतों हाच एकंदरींत राजमार्ग होय, असं दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

नाना०–पण आधीं सांगाल तर खरं तुमचं काय ह्मणणं आहे तें.

गोपाळ०–त्यांत गूढ थोडंच आहे. मी इतकंच ह्मणतों कीं,:—

पद–('कैसा जोग कमाया वे' या चालीवर.)

राजमार्ग का सोडोनी । जातां तुह्मि या अडरानीं ॥ ध्रु० ॥
दुःखपराचें आणुनिया मनिं स्वानुभवावरुनी ।
घात करुं नका कुमारिचा निज वृद्धपणीं वरुनी ॥
निज कन्येला संसारामधिं आधीं घालोनी ।
समदुःखीशी पाहुनि नारी घ्या गृहिणी करुनी ॥

नाना०–वः खासा राजमार्ग सुचवलात बोवा! काय ह्मणतां आधीं लावूं आपल्या मुलीचा पुनर्विवाह आणि मग करूं एखाद्या पोक्तशा विधवेला आपली गृहिणी! वः शाबास आहे तुमची. पण ह्मातारपणीं लग्न करूं नये ह्मणून साऱ्या जगाला उपदेश करणारे जे कित्येक नीतीचे पुतळे एखादं अंगवस्त्र ठेवून देऊन आपलं काम बिनबोभाट उरकून घेतात, त्यांतला मी नाहीं. लग्न करण्यांत विषयवासनातृप्तीचा हेतु तर आहेच; पण त्याबरोबरच गृहस्थाश्रमाचे धर्म साधतां यावे, हाही एक उद्देश आहे. आणि तो तर विधवेला गृहिणी करून साध्य होणं मुळींच शक्य नाहीं. कारणः–

पद–(नीरभ्र शुभ्र नक्षत्र तुल्यही. या चालीवर).

निर्माल्य पुष्प होतसे अयोग्यचि जैसें पूजेला । जैसें० ।
तैशी विधवा अपात्र गणिली धर्माचरणाला ॥ १ ॥

गोपाळ०–पण मग मी विचारतों कीं:–

पद– (चाल सदर.)

एकदां विवाहित असा विधुरही निर्माल्य न कां तो । निर्मा०
तोच तेवढा धर्माचरणा योग्य कसा ठरतो ॥ १ ॥

नाना०–त्याचं उत्तर इतकंच कीं:–

पद– (चाल सदर)

विधवांस सडकिं मातिचीं मानिलीं तेवि न विधुराला । तेवि०।
गणितीं शास्त्रें, ह्मणतीं भांडें तांब्याचें त्याला ॥ १ ॥

गोपाळ०– अहो ! पद– (चाल सदर)

मतलबी पुरुष हीं अशीं रचुनिया शास्त्रें नारींना । शास्त्रें० ।
ठकवित आले, परि न अतां कुणि घालि भीक त्यांना ॥१॥
बदलला मनू जाणुनी हितवचा माझ्या अवधारा । माझ्या० ।
विधवा सडकिं न शास्त्रें सडकीं हीं आतां विसरा ॥ २ ॥

नानासाहेब ! हीं सनातन शास्त्रें नव्हेत, हीं रूढीच्या गुलामांनीं अथवा निवळ स्वार्थसाधु पुरुषांनीं रचलेलीं थोतांडें आहेत. यांचा काल आतां राहिला नाहीं. उद्यां तुमच्या पोरीच तुमच्या डोळ्यांदेखत त्यांच्यावर हरताळ फासल्याशिवाय रहाणार नाहींत. तसं होऊन आपली शोभा करून घेण्यापेक्षां आपणच त्यांना काट मारून आपला बोज राखावा, यांतच शहाणपण आहे. आणि ह्मणून मी फिरून विचारतों कीं, आपली नात शोभेल अशा एखाद्या कुमारिकेशीं लग्न करून ज्या बालविधवांची तुह्माला कींव येते म्हणतां, त्यांच्यांतच आणखी एकीची कदाचित भर घालण्यास कारण होण्यापेक्षां, मी सांगतों हाच मार्ग खरोखर सरळ व विचाराचा आहे, असं अजूनही तुम्हाला वाटत नाहीं काय ?

नाना०--अहो ! पण तशी रूढी नाहींना ?

गोपाळ०– अहो रूढी नसली तर ती पाडली पाहिजे. तुम्हाला धर्म हवा कीं रूढी हवी ? धर्म हवा असेल तर मी म्हणतों कीं:—

पद– (अष्टमूर्ति परमेश० या चालीवर)

सुविचाराची कास धरा जरि आवड धर्माची ।
त्यजितां त्यातें होते माती इहपर सौख्याची ॥ ध्रु० ॥
माजवितां कां प्रस्थ रुढीचें कां भजतां तिजसी ।
आचरितां कां धर्म ह्मणुनिया उघड अधर्मासी ।
गतानुगतिकत्वें कां होतां विमुख विचारासी ।
मनुज ह्मणवितां कशि कृति करितां अशि मतिहीनाची।१ सुवि०।

बुद्धि लाधली असुनि अमोलिक निद्रावश व्हावी ।
याहुनि दुसरी जीवन्नरकास्थिति नच जाणावी ।
ह्मणुनि बुद्धिला जागृत करुनी युक्ति तिची घ्यावी ।
प्रपंचींच ती देइल मनुजा चव परमार्थाची ॥२॥सुवि०॥

नाना०– अहो हें सगळं खरं, पण लोक वाळींत टाकतील त्याची काय वाट ?

गोपाळ०– दोन दिवस सोसावा निमूट थोडासा त्रास. त्याला दुसरं काय करायचं ?

नाना०– वः खाशी तोड ! पण जे साधु बनले असतील, ते सोसतील निमूट लोकांचा छळ ! मी कांहीं अजून तसा साधू नाहीं बनलों. मला तर तुह्मी अगदींच व्यवहारशून्य दिसतां ! अहोः–

पद– (' शशिकुलभूषण० ' या चालीवर)

कुमारी चालत घरिं येते । कवण मग वरितो विधवेतें ॥ ध्रु० ॥
शास्त्र वा रूढि न ज्या मानी । जयातें जनता अवमानी ।
तयाचे जे कां अभिमानी । विचारि न त्यातें मी मानी ।
साधुत परहित, दुःख भोगुनी, वेडे असती ते ।
माझें हित परि मज कळतें ॥ १ ॥ कुमारी० ॥

आयती कुमारिका मिळत असून ह्मणे विधवेशीं लग्न लावा, आणि उष्टं खायचं तें खाऊन उलट आणखी बहिष्कृत व्हा ! चांगला रोजगार ! तो तुमचा तुम्हालाच लखलाभ असो !

गोपाळ०–ठीक आहे. आतां या बाबतींत तुमच्याशीं आणखी वाद घालीत बसून तुमचा निश्चय फिरवितां येईल असं दिसत नाहीं आणि त्यांत आश्चर्यही नाहीं. तुह्मीच कायते आपल्या मुलीच्या दुःखाची पर्वा न करतां एखाद्या बालकुमारीचा बळी घेण्यास सिद्ध झालां अहां, असं नाहीं. जिकडं पहावं तिकडं नेहमीं असंच दृष्टीस पडतं कीं:—

पद–(' ईश चिंता निवारील० ' या अथवा झंप्याच्या चालीवर)

दुःखि कष्टी जरी असति सदनीं ।
भगिनि कन्या स्नुषा विगतपति होउनी ॥ ध्रु० ॥

पत्नि मरतां तरी सजुनि नवरे। बंधु वा तात वा श्वशुर सारे।
स्वसुख साधावया होति हवरे। अन्य दुःखें द्रवे स्वार्थिजन कोठुनी।

आणि केवळ सामान्य जनच असं करतात असंही नाहीं. लोकांत नीतिज्ञानाचा प्रसार करण्याचा ज्यांनीं पेशा उचललेला, असे मोठ-मोठे पदवीधर, पेन्शनीला आले असून :–

पद–(' रुचती कां तीर्थयात्रा० ' या चालीवर.)

विक्रेते कन्यकांचे जगिं असती कैक या।
जाणुनिया पापशंका अंतरिची त्यजुनिया॥
शोभे जी नात ऐशा बालेला वरुनिया।
शहाणेही सज्ज होती वैधव्या द्यावया॥ १॥

पण एका अर्थी ते असं करतात यांत त्यांचाही दोष नाहीं. कारणः–

पद–(' मुला सांग नृपतीस संदेश० ' या चालीवर)

सुखाच्या कुणी जीव दुःखांत नेला। परार्था साधुनी कोण धाला॥ ध्रु०॥ कोण विधवा वरीं। सहज मिळते जरी। कुमारी नोवरी। वृद्ध पतिला॥ दावुनीया दया। बहिष्कृत व्हावया। भाग तें नसुनिया। कोण सजला॥१॥ तीस वर्षांवरी। वरिल कुणि नोवरी। वीस वर्षें पुरीं। नसति जीला॥ दंड्य व्हावा जनीं। पतित अति मानुनी। हाच त्या लाखुनी। मार्ग उरला॥ २॥

तेव्हां घेतों आतां आपला निरोप. कमीअधिक शब्दाबद्दल माफी असावी. (जातो.)

नाना०-यांच्या स्पष्टवक्तेपणावरून लोकांनीं यांना ' गोपाळराव फटकळ ' असं टोपण नांव दिलं आहे खरं, पण यांचं बोलणं एकंदरींत सयुक्तिक आहे, यांत संशय नाहीं. (इतक्यांत दामोदरपंत व पिलंभट येतात. दामोदरपंत गादीवर बसून दफ्तर सोडूं लागतात.) या भटजी ! बसा.

पिलंभट–बसतों, पण हे दामोदरपंत ह्मणतात तें खरं कां, हें आधीं मला सांगा.

नाना०–काय, दामोदरपंत काय म्हणतात ?

दामो०–त्यांत चोरी थोडीच आहे स्पष्ट सांगायला! मी पिलं-भटांना ह्मणत होतों कीं 'दैव देतं आणि कर्म नेतं' म्हणतात, तशांतला प्रकार चालवला आहे आपण. बायको मरावी ह्मणून कुणी नवस करीत नसतो, हें मलाही कबूल आहे. पण ती मरून, फिरून चांगल्या सुंदर तरुणीच्या समागमाचा आयता योग आला असून तो दवडणं, ह्मणजे आपल्याला राग येवो वा लोभ येवो, मला तर तें 'गंगा आली अळशावरी। अळशी देखुनी पळे दुरी' अशांतलं दिसतं.

पिलं०–मी तरी तेंच म्हणतों. देवानं दिलं असून मग दुःख कां भोगावं? शिवाय त्यांत स्वार्थच्या स्वार्थ आणि परमार्थच्या परमार्थ. आपलंही लग्न झालं आणि दुसऱ्याचाही आयता फायदा. आम्ही आतां लग्न करून त्याचं सुख भोगूं म्हटलं, तर कुठं आहे आमच्या नाशिबीं? तेव्हां यांच्यासारख्यांचं लग्न तेंच आमचं लग्न, त्यावरच आमची सारी उडी! आमचं काय, चार दिवस तूपपोळी झोडली, मजा मारली झालं! त्यांतच आमचा आनंद! तोच आमचा सुखसोहोळा!

दामो०–आणि त्यांत दुसराही विचार केला पाहिजेना? यांच्या वयाला अजून साठही वर्षं पुरीं झालीं नाहींत, तेव्हां बायकोवांचून दिवस निघावेत कसे? ज्यांना मुळीं विषयाची गोडी कळलीच नाहीं, त्यांची गोष्ट वेगळी. पण ती कळल्यावर मग मन स्वाधीन रहावं कसं? आतां याला दुसरे मार्ग नाहींत, असं मी ह्मणत नाहीं; पण हें पहा, अस्सल तें अस्सल, आणि नक्कल तें नक्कल! त्याची गोडी वेगळी, आणि याची वेगळी!

नाना०–तुह्मी म्हणतां तें मलाही दिसत नाहीं असं नाहीं. पण लौकिकाची भीती आहेना? सुतकांत आणि लग्नांत कांहीं महिने राहिले, पण दिवस तर लोटले पाहिजेतना? नाहीं तर लोक काय ह्मणतील?

दामो०–लोक कांहीं ह्मणत नाहींत. आपला स्वभाव पडला शंकेखोर, ह्मणून या नसत्या कल्पनांना आपण जागा देतां. अहो, दुसरे तर बायको आजारी पडून तिची आशा सुटण्याचा सुमार

दिसूं लागला कीं, तेव्हांपासूनच असतात स्थळं पाहण्याच्या खटपटींत ! भर सुतकांत तिथिनिश्चय केल्याचीं फार नाहीं, तरी निदान दहा उदाहरणं मी स्वतां सांगू शकेन.

पिलं०–तुह्मी ह्मणतां तेंच खरं दामोदरपंत, यांचा स्वभावच मूळ भित्रा. बरं मी ह्मणतों, पाहिलीं असती थोडीशी वाट. पण आतां लवकरच सिंहस्थ लागणार. मग गेलीं कीं नाहीं तब्बल दोन वर्षांवर गोष्ट ! आतां आजच लग्न केलं, ह्मणून लागलीच बायको तयार होत नाहीं खरी, पण जराशी मोठी मुलगी पाहिली, ह्मणजे चारसहा महिन्यांत कामीं पडायला कांहीं हरकत नाहीं.

नाना०–खरं ह्मणाल, तर ही सिंहस्थाची अडचण मुळीं माझ्या लक्षांतच आली नव्हती, आणि ती विचारांत घेतां मलाही आतां वाटतं कीं, हें सध्याच जमून आलं तर बरं, पण तें यावं कसं ?

दामो०–त्याची पंचाईत नको आपल्याला. अहो दाम करी काम. पैसा असल्यावर एखादी रंभा नाहीं येणार खालीं ?

(इतक्यांत रामशास्त्री येतात. त्यांस पाहून.)

नाना०–यावं शास्त्रीबोवा, तुह्मी अगदीं वेळेवर आलां. तुमचा विचार म्हणजे शास्त्राज्ञातुल्य आह्माला. ही मंडळी ह्मणतात कीं, आतां लवकरच सिंहस्थ लागणार, तेव्हां आतांच काय तो लग्नाचा विचार ठरवावा आणि मलाही एकपक्षीं तें लांबणीवर टाकणं ह्मणजे अविचारच वाटतो. पण थोडाफार तरी लौकिकाचा विचार नकोका करायला ? तो गुंडाळून ठेवून कित्येकांनीं चालवलं आहे, त्याप्रमाणं पुनर्विवाह केला, तर पिलंभट ह्मणतात तशी चारसहा महिनेंही नको वाट पाहायला. पण लोकभय आहेना ! तेव्हां आतां लागलंच लग्न केलं, तर लोक नांवं ठेवायला राहतील वाटतं तुम्हांला ?

रामशास्त्री–ही मंडळी आपल्याला सल्ला देताहेत तोही योग्यच आहे, आणि आपण ह्मणतां तेंही एका अर्थी गैर नाहीं. कारण ह्मटलं आहे, 'सहसा विदधीत न क्रियां। अविवेकः परमापदां पदं ।' तेव्हां योग्यायोग्य पाहून काय तें करावं हें युक्तच आहे. तथापि पुनर्विवाह वेगळा आणि हें लग्न वेगळं. याला नांवं ठेवणारे म्हणजे

केवळ कुत्सितजन. त्यांना भिणं ह्मणजे एक प्रकारचं हृदयदौर्बल्यच होय. आणि या बाबतींत स्पष्ट धर्माज्ञाच आहे मुळीं. मनुस्मृतींत सांगितलं आहे कीं, ' भार्यायै पूर्वमारिण्यै दत्वाग्निं अंत्यकर्मणि । पुनर्दारक्रियां कुर्यात् पुनराधानमेव च । ' म्हणजे मृतभार्येला अग्नी दिला, कीं लागलीच पुरुष विवाहाला योग्य होतो; मग त्यानं अगदीं विलंब करूं नये. आणि ही धर्माज्ञा ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोनही दृष्टींनीं दिलेली आहे. भार्येवांचून धर्माचरण नाहीं ही पारमार्थिक दृष्टी, आणि ' भार्याधीनं सुखं पुंसां भार्याहीनं गृहं वनं । भार्याधीना सुखोत्पत्तिः भार्याधीनाः शुभोदयाः'। ही ऐहिक दृष्टी. तेव्हां यावरून माझा विचार आलाच असेल आपल्या ध्यानांत.

नाना०–पण इतक्या अल्प अवधींत सर्व मनासारखं जुळणं आपल्याला कठीण नाहीं का वाटत ?

पिलंभट–या शंकेला खरंच काय म्हणावं, तें आम्हाला समजत नाहीं शास्त्रीबोवा.

राम०–त्यांतलं असं आहे **पिलंभट** ' बालक जाणेना मातेशीं तिचें चित्त बाळापाशीं ' आपण ध्यानीं मनीं स्वप्नीं जी यांच्या सुखाची कळकळ बाळगतों ती यांना काय ठाउक ? यांच्या प्रश्नाला उत्तर ह्मणजे माझं यावेळीं येथं आगमन हेंच होय. ज्या गोष्टीबद्दल नानासाहेबांना फिकीर वाटते ती तर मी आधींच साध्य करून टाकली आहे. गेले पंधरा दिवस मी मुळीं याच विवंचनेंत होतों. सिद्धी मिळाली तेव्हां आलों सुचवायला.

दामोदर–मी तरी तेंच ह्मणत होतों यांना. नाहीं तर आम्ही कशाला ? उगीच खायला काळ आणि भुईला भार ?

नाना०–शास्त्रीबोवा, तुह्मी तर मला यावेळीं अगदीं निरुत्तर करून सोडलंत. आतां विनंती ह्मणून इतकीच कीं :–

साकी.

पुरे करा हा विवाद आतां स्थळ आधीं मज सांगा ।
अवधि न करितां तयारिलाही पुढच्या सत्वरि लागा ।
शुभमंगल वाणी । झणि ती पडुं द्या मम कानीं ॥ १ ॥

राम०–अहो तें सांगायला नको. सर्व कांहीं अगदीं तुमच्या मनासारखं जुळलं आहे. दामोदरपंतांना तेवढं पिशवीचं तोंड खुलं करायला सांगा म्हणजे झालं.

नाना०–एकूण देण्याघेण्याची खटपट आहे म्हणतां ? बरं पण नांवगांव तर आधीं सांगाल ?

राम०–हें पहा, 'दाम करी काम' लालुचीशिवाय कुठं अशीं कार्यं पार पडलीं आहेत ? कसं झालं तरी हा तृतीयसंबंध. तेव्हां अशा स्थितींत बरोबरीचं स्थळ पहाण्याच्या खटपटींतच पडूं नये मुळीं. मुख्य मुद्यावर दृष्टी ठेवावी म्हणजे झालं. आतां मागणी जरा जबर आहे हें खरं; तथापि आपण एकदां वस्तु पाहिलीत कीं दुपटीलाही मागं घेणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. आतां तुम्हाला नांवगांव पाहिजे, तर त्यांत कांहीं गुप्त नाहीं. हरभट राजापूरकर त्या गायआळींत रहातात– आपल्या असतीलच वाटतं ते माहितींतले ?

पिलं०–माझ्या सुद्धां ती **सुशिलाच** घोळत होती मनांत. काय सांगूं **नाना**साहेब, नक्षत्र आहे नक्षत्र ! आणि शिवाय बहुतेक उपवरच म्हणायची. साखरेचं खाणार त्याला देव देणार ! अहो, अशा बायकोसाठीं स्वर्गसुख झिडकारील एखादा; मग पैशाची काय कथा !

नाना०–पण नक्की काय द्यावं लागणार, हें नाहीं अजून सांगितलंत तुम्ही ?

राम०–मीही पण तें अजून नक्की ठरवलं नाहीं. म्हटलं आधीं आपला विचार घ्यावा, आणि मग ठरवावं काय तें कायमचं. आतां या कामीं **हरभट**जीच्या बायकोकडून कदाचित् हरकत यायची भीती आहे खरी. पण त्याचं काय ! जरूर पडल्यास तिलाही थोडं आमिष दाखिवलं म्हणजे झालं. म्हटलंच आहे. 'कोन याति वशं लोके मुखे पिंडेन पूरितः'। जसा रंग दिसेल, तसं करायला आपली परवानगी असली म्हणजे झालं.

नाना०–त्याची नको फिकीर तुम्हाला, तुम्ही कराल त्याला माझी पूर्ण संमति आहे.

राम०–तर मग घेतों आतां आपली आज्ञा. (किंचित् थांबून) हो!

चरी आठवण झाली ! मला लागतील तशा रकमा द्यायला दामोदरपंतांना आपण सांगून ठेवायला हवं, ही विनंती करायची राहिलीच ! तूर्तातूर्त पांचशें रुपये पुरे होतील.

नाना०– कांहीं हरकत नाहीं. दामोदरपंत ह्या शास्त्रीबोवांना सध्यां पांचशें रुपये.

दामो०– चला माझ्याबरोबर खालीं तिजोरीच्या खोलींत, म्हणजे देतों रुपये. (रामशास्त्र्यांबरोबर चार पावलें जाऊन हळूच) पण आमच्या पातीचे रुपये आधीं कापून दिले पाहिजेत हो !

राम०–(हळूच) पण नाहीं म्हटलं कुणी ?

पिलं०– मीही घेतों आतां आपला निरोप.

नाना०– यावं नमस्कार.

पिलं०– (शास्त्रीबोवास गांठुन हळूच) शास्त्रीबोवा, गरिबाचं स्मरण असायचं बरं का ?

राम०– वः हें काय सांगायला पाहिजे ! (तिघे जातात.)

नाना०–(किंचित् स्तब्ध राहून आपल्याशीं) हा लग्नाचा योग अचानक मनासारखा जमून आला, म्हणून म्हटलं तर मनाला उल्हास वाटावा. पण काय असेल तें असो, फिरून फिरून गोपाळरावांच्या बोलण्याचं स्मरण होऊन, मन आपलं उद्विग्नच होतं ! राहून राहून मनाला असंच वाटतं कीं,–

पद– (' जो लोककल्याण० ' या चालीवर).

(राग–मालकंस.)

सारा वृथा व्याप । देईल हा ताप ।
मी आचरीं पाप । दंडील मातें ॥ ध्रु० ॥ सारा० ॥
कन्येसि दुःखांत । ठेवोनि जो तात ।
हो मग्न स्वार्थांत । सुख केवि त्यातें ॥सारा०॥१॥
न लग्न हा घात । बालेसि निभ्रांत ।
वैधव्यकूपांत । लोटीत हातें ॥ सारा० ॥ २ ॥

(पडदा पडतो.)

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(स्थळ—रामशास्त्र्यांचें घर.)

पुरुषोत्तम–(आपल्याशीं) मी ठेवीत होतों **हरभटांना** नांवं ! आणि माझे प्रत्यक्ष वडील या राक्षसी कृत्याला सामील अं ! पण असला अधर्म प्रत्यक्ष डोळ्यासमोर घडत असून त्याच्या प्रतिकारार्थ यत्न न करणं, म्हणजे एका अर्थी या दुष्कृत्याला सामील होण्यासार-खंच नव्हे काय ? बाबांचे ते शब्द माझ्या काळजाला कसे झोंबून राहिले आहेत. काय म्हणे ! "आम्ही जर तुम्हा पढतमूर्खांप्रमाणं शास्त्रप्रणीत नीतिसिद्धांतांना उराशीं धरून व्यवहार करूं लागलों असतों, तर तुम्हांला केव्हांच धुळीचे दिवे खावे लागले असते ! आह्मी त्यांना पोथींतल्या पोथींत गुंडाळून ठेवून, येनकेनप्रकारेण द्रव्यसंपादन करीत आलों, ह्मणूनच तुमची पोसवणूक झाली !" एकूण हें सर्व शरीर अशा पापार्जित द्रव्यावर पुष्ट झालं आहे अं ! यांतील अस्थी, चर्म, मज्जा, मांस, रक्त, हीं सर्व अशा निंद्याचरणानं मिळवलेल्या पैशावर पोसलीं आहेत ! धिक्कार असो या माझ्या जिण्याला ! यापेक्षां जन्मतांच माझा अंत झाला असता, तर हें पापजड शरीर तरी मला वागवावं लागलं नसतं ! पण झाल्या गेल्याचा नुसता शोक करून काय उपयोग ? त्याच्या परिमार्जनार्थ हातून यत्न होतील, तरच तो खरा पश्चात्ताप. तेव्हां आतां तरी या अन्यायाचा प्रतिकार करण्यास झटणं, हें आजपर्यंतच्या अज्ञातपाप-पुष्टतेबद्दलचं प्रायश्चित्तच होय, असं मी समजतों. झाला, हाच निश्चय कायम. काय वाटेल तें साहस करावं लागलं, तरी बेहेत्तर आहे. पण हें लग्न तर आपण लागू देणार नाहीं. आतां असं झालं तर, तसं झालें तर, या भवति-न-भवतींत कालक्षेप करीत बसण्यांत अर्थ नाहीं. शिक्षणानं मनुष्य विचारशील होतो, हें जसं खरं आहे, त्य प्रमाणं विचाराच्या अतिरेकानं कृती पंगु पडते ह्मणतात, तेंही खोटं नाहीं.

विचार पाहिजे; नको असं नाहीं. पण तो साधन आहे, साध्य नव्हे, हें विसरतां कामा नये आणि ह्मणून:—

पद–(' जरठें न विवाह करावा॰ ' या चालीवर).

सुविचार न तो मानावा ।
घडवीना जो कृतिला हातुनि। कवडीमोल गणावा ॥ध्रु.॥सुवि॰
शंकाकुल जो करुनि मनाला । शिकवी मागें जो व्यायाला ।
यत्नपराङ्मुख करी नराला। अवकाश न त्या द्यावा ॥१॥सुवि॰
ये न जोंवरी पोहायाला । न शिवे तोंवरि मी पाण्याला ।
हेंचि धरुनि जो बसे तयाला। धीर कसा तो यावा ॥२॥ सुवि॰

तात्पर्य, विचाराचं पर्यवसान कृतींत होईल, तरच त्याची मातब्बरी. नाहीं तर तो कुचकामाचा समजला पाहिजे. तेव्हां आतां मनांत योजल्याप्रमाणं ताबडतोब राधाबाईंची गांठ घ्यावी हेंच बरं. ती कशी झाली तरी आई आहे. ती आपल्या पोटच्या गोळ्याबद्दल केवळ बेपर्वाई दाखवील हें संभवत नाहीं. या वेळेस **हरभटजी**ही बाबांना घेऊन **नानासाहेबां**कडं गेले आहेत. तेव्हां ही संधी दडवतां कामा नये. (जातो.)

प्रवेश २ रा.

(**सुशीला** व **राधाबाई** माजघरांत बोलत बसल्या आहेत.)

सुशिला– आई कांग तूं आपल्या लाडक्या सुशिलेचा असा कंटाळा करितेस? मी तुला नकोशी का झालें आहे? आईः–

पद–(' भय त्यजी हृदयिंचें सगळें॰ ' या चालीवर)

कां तुझ्या उदरिं मी आलें । जन्मतांचि कैशि न मेलें ।
कुढुनी जगलें ॥ ध्रु॰ ॥ कष्ट परोपरि । घेउनि अजवरि ।
कां मला सांग वाढविलें ॥ कां मला॰ ॥ १ ॥ कां तुझ्या॰ ॥
वृद्ध पतीला। मज द्यायाला। वद कसें कठिण मन केलें ॥२॥ वद॰
कां या परतें। मजसि न मातें। डोहांत ढकलुनी दिधलें ॥३॥ डो॰

राधाबाई– माझे लाडके! कांग तूं अशी भलतं न् सलतं बोलून मला हिणवतेस? तुला म्हाताऱ्याला देऊन तुझ्या साऱ्या जन्माचं

मातेरं करावं असं मी स्वप्नांत तरी चिंतीन काग? पण काय करूं?–

पद–(' घेउनि ये पंखा० ' या चालीवर)

मन माझें भ्रमलें । मज सुशिले । मार्ग न गे कळे ॥ ध्रु० ॥
मतिला जे सुचले। उपाय सर्व जहाले। परि वाया ते गेले ॥१॥
रागावुनि बसलें । देतें जीव ह्मणालें। रडरडुनी मी थकलें॥२॥
हृदय न परि द्रवलें। स्वतंत्र नाहिं मि बाळे। नच माझें मुळिं चाले ३

पुरुषोत्तम– (प्रवेश करून आपल्याशीं) वः हीं मायलेकरं याच गोष्टीसंबंधानं आपसांत बोलत आहेत. एकूण संधी तर सोळा आणे साधली! आतां यांना व्यत्यय न करतां, इथंच कांहीं वेळ थांबून योग्यसा प्रसंग पाहून आंत जावं हें बरं दिसतं.

सुशीला– आई, खरंच दुःखाच्या भरांत मी उगीच तुला वेड्यासारखं बोललें. परवां **यशोदाकाकू** ह्मणत होत्या, तेंच खरं. त्यावेळीं मला त्यांच्या बोलण्याचा नीटसा उमज पडला नव्हता. पण आतां त्यांच्या प्रत्येक शब्दाची माझ्या मनाला साक्ष पटूं लागली आहे. त्या ह्मणत होत्या कीं,:—

पद–(' अरसिक किति हा शेला० ' या चालीवर.)

निर्मियली नारीला । पुरुषजनाच्या उपभोगाला ॥ध्रु०॥निर्मि०
आवड नावड स्त्रीला । अपराधचि हा मोठा गणिला१॥आव०
विधि घडि दुर्बल अबला। पात्र न म्हणुनी स्वातंत्र्याला२॥विधि
ठेविति पुरुष स्त्रियेला । रहाणें तैसें प्राप्तचि तिजला॥ ३॥ठेवि०॥

राधा०– हें त्यांचं म्हणणं कांहीं खोटं नाहीं. मारेकऱ्यांनीं वांकव मान ह्मंटलं, कीं कैद्याला जसं ती खालीं केल्यावांचून गत्यंतर नसतं, त्यांतलीच बायकांची अवस्था! मी तुझी आई खरी, पण मला विचारतो कोण? खरं म्हणशील तरः–

पद–(' अजि शेवटचा लाभचि हा० ' या चालीवर.)

बाळे तुजला । जन्म जरी मी दिधला । तरि सत्ता न मुळीं मजला । तरि० ॥ ध्रु० ॥ ह्मणती स्त्रीला । अर्धांगी नांवाला । न विचारी परि कुणि तिजला । न विचारी०॥तुज वृद्धाला । द्याया ताताचि सजला । देवाविण त्राता नुरला । देवाविण० ॥

(चाल) पाव प्रभो मज दीनाला। वैधव्यार्णविं ही बाला।
बुडते गा दे हाताला॥ करि करुणेला। देई सौभाग्याला।
संकटिं या तारी हिजला। संकटिं०॥ १॥

पुरुषो०–(पुढें होऊन):– साकी

तारिल हिजला हा पुरुषोत्तम देइल सौभाग्याला।
स्वयें विधी जरि वैधव्यार्णविं लोटुनि द्याया सजला।
करि जो यत्नाला। ईश न अंतर दे त्याला॥ १॥

राधा०–काय! माझ्या हाकेसरसा देव हिच्या साह्याला धांवून आला! (पुरुषोत्तमास पाहून) छे! काय तरी मी वेडी! असं कधीं कुठं झालं आहे? हा तर त्या नष्ट रामशास्त्र्याचा मुलगा! अरे बाबा! तुझ्या त्या मानभावी बापानं आमच्या दुःखाचा भरलेला घडा तुला रिता का वाटला? अन् ह्मणून त्यांत भर घालायला का तूं पुढं सरसावलास? अरे, आमच्या दुःखाचा आधींच कडेलोट होऊन चुकला आहे. आतां आमची आणखी कोणती विटंबना करायची तुझ्या मनांतून आहे?

पुरुषो०–राधाकाकू आपल्या कन्येच्या दुःखानं जळणाऱ्या आईच्या अंतःकरणांतून खऱ्या संतापानं बाहेर पडणारे हे तुमचे मर्मभेदक शब्द जरी माझ्या काळजाला घरे पाडल्याशिवाय रहात नाहींत, तथापि ते केवळ अस्थानीं नाहींत, हें मी पूर्णपणें जाणून आहें. तेव्हां तुमची मी आतां कशी समजूत पाडूं? पण तुह्मी जरा शांत होऊन माझं बोलणं ऐकून घ्याल, तर मी तुमचा शत्रू नसून मित्रच आहें, अशी तुमची खात्री झाल्याशिवाय राहणार नाहीं.

राधा०–हो तें खरंच! तुझ्या बापानंही प्रथम अशीच साखर पेरली होती! पण सुशिलेला पाहायला नेली होती, ती परत येऊन जेव्हां हंबरडा फोडून रडायला लागली, तेव्हां मला तें त्यांचं कारस्थान समजलं. प्रथम मला मुलगी कांहीं तरी सांगत असेल, अशी शंकाही आली. ह्मणून माझ्या बहिणीचा नवरा सहजगत्या साताऱ्याहून इथं आला होता, त्यांच्याकडून मी बारकाईनं तपास करवला, आणि पहातें तों मुलीनं सांगितलं तें कांहींच नाहीं, असं मला कळून

आलं. म्हणून ह्मणतें, तुझ्या बापाचा मित्रपणा मला भोंवतो आहे, तेवढा पुरे. त्यांत आणखी तुझ्या मैत्रीची भर नको!

पुरुषो०–तुह्मी मजविषयीं विनाकारण असा गैरसमज करून घेऊन त्यालाच चिकटून बसाल, तर माझा नाइलाज आहे. तुह्मांला वाटतं त्याप्रमाणं तुमच्या दुःखावर डाग देण्याइतका मी नीच नाहीं. साधल्यास तुमच्या या कन्येवरचं संकट दूर करतां आल्यास पहावं, याच उद्देशानं मी इथं आलों आहें. तुम्ही मजविषयींचा आपल्या मनांतला वृथा संशय समूळ काढून टाकून माझं ह्मणणं ऐकून घ्याल, तर मला वाटतं, तुमच्या कन्येवरचं हें अरिष्ट सहज टाळतां येईल.

सुशीला–पण आई, हे काय ह्मणतात, तें नुसतं ऐकून घ्यायला तुझं काय जातं? यांच्या एकंदर चालचर्येवरून हे आपल्याला फसवतील, अशी माझ्यानं नुसती कल्पना देखील करवत नाहीं. काय असेल तें असो, पणः–

श्लोक–(कामदावृत्त.)

पाहि मूर्ति ही तेथपासुनी। आस उपजली माझिया मनीं।
हेचि मज चुडेदान देउनी। ठेवितिल मला करुनिया ऋणी १

मला तर खचित् वाटतं कीं, देवानंच यांना माझ्या साह्याला पाठवलं असावं. ह्मणून ह्मणतें कीं यांचं काय ह्मणणं आहे, तें ऐकून घ्यायला अनमान करूं नको. माझ्याकरतां तरी तें ऐकून घेच.

राधा०–बरं, तूं ह्मणतेस तसं कां होईना. हं बसा खालीं, अन् सांगा तुह्मांला काय सांगायचं तें.

पुरुषो०–(खालीं बसून) पण अजून तुमचा संशय तुह्मांला सोडीत नाहींसं दिसतं, आणि तो सुटल्याशिवाय तर माझ्या बोलण्याचा मुळींच उपयोग होण्याचा संभव नाहीं.

राधा०–खरं पुसाल तर तुह्मांला काय, अथवा दुसऱ्या कुणाला काय, माझ्या मुलीवरचं हें संकट टाळतां येईल, असा मला मुळीं भरंवसाच येत नाहीं. हें टळायला मार्ग काय तो एकच; आणि तो इतकाच कीं, हें ठरलेलं लग्न मोडून टाकायला कुणी तरी त्यांचं मन वळवलं पाहिजे. आणि तें कुणाच्यानं होईल, असं कांहीं मला वाटत नाहीं.

पुरुषो०—छे ! छे ! तें शक्यांतलं असतं, तर मुळीं गोष्टच या थरावर आली नसती. तें युक्तिप्रयुक्तीनं केलं, तरच साधण्याचा संभव. पण ती युक्तिप्रयुक्ती सर्वथा तुमच्या साह्यावर अवलंबून आहे.

राधा०—एकूण तुम्ही सुचवणार, तें वेड्यावांकड्यांतला दिसतं !

पुरुषो०—घाबरूं नका. मी सुचवणार, तें प्रथमदर्शनीं जरी तुह्माला थोडं विलक्षण वाटण्याचा संभव आहे, तरी त्यांत वास्तविक गैर असं कांहींच नाहीं. आतां विशेष प्रस्तावना न करतां माझा विचार काय आहे, तें मी तुह्माला सांगतों. लग्नाचा मुहूर्त आतां काय तो एकच राहिला आहे, तो गेला ह्मणजे पुढं सिंहस्थ लागणार. तेव्हां हरप्रयत्नानं हा मुहूर्त तेवढा टाळला पाहिजे.

राधा०—पण तो टळणार कसा ?

पुरुषो०—तें अगदीं सोपं आहे. पण तुमचं मात्र मला या कामीं पूर्ण साह्य पाहिजे. लग्नाचा मुहूर्त येत्या गुरुवारीं आहे. त्याच्या अदल्या दिवशीं, ह्मणजे बुधवारीं मध्यरात्रींच्या सुमारास मी गाडी घेऊन तुमच्या मागिलदारीं येईन, व तुम्ही कोणाला नकळत हिला माझ्या हवालीं करा. ह्मणजे बाकीची सर्व व्यवस्था बिनबोभाट होईल. त्याची तुह्माला काळजी नको.

राधा०— भलतंच कांहीं तरी ! असं कुणी कधीं केलं आहे ? लोक काय ह्मणतील हें नको का पाहायला ? पोरगी कुणाबरोबर तरी उठून गेली, अशी गांवांत कंडी पिकली, म्हणजे चांगलाच रोजगार होऊन बसायचा !

पुरुषो०—तुम्ही अशा नसत्या शंका काढाल, तर माझा नाइलाज आहे मी आपल्याकडून तुमच्या अथवा तुमच्या कन्येच्या अब्रूला काडीइतकाही धक्का पोहोंचूं नये, अशी व्यवस्था केली आहे. अथवा मी ह्मणण्यापेक्षां ईश्वरानंच ही योजना जमवून आणली असली पाहिजे. नाहीं तर माझी आणि तुमच्या मेव्हण्याची अचानक गांठ पडायचा योगच जुळताना. मी हें सर्व त्यांच्या विचारानंच ठरवलं आहे, व मुलीला जी येथून पाठवायची, तीही साताऱ्यास त्यांच्याकडेच पाठवायची आहे. शिवाय गुरुवारीं सकाळीं दहा वाजले नाहींत,

तोंच भालचंद्रपंतांकडून ' **सुशीला** आज सकाळच्या गाडीनं एकटीच आमचेकडे आली आहे, कां ह्मणून विचारतां उगीच आलें ह्मणते; खुशाल आहे. ' अशी सातान्याहून तुम्हास तार यावी, असंही आह्मी ठरवलं आहे. आणि हें लोकांना समजलं म्हणजे कुणीही झालं तरी ह्मातान्याशीं आपलं लग्न लागूं नये, म्हणून मुलगी आपल्या मावशी-कडे गेली, असंच ह्मणेल यांत संशय नाहीं.

राया०—पण **भालचंद्रपंत** जर स्वतःच आयते इथं आले होते, तर आणखी दोन चार दिवस राहून हिला स्वतः आपल्याबरोबरच घेऊन जाण्याचं त्यांनीं कां ठरवलं नाहीं. इतकंच नव्हे, तर काल सातान्याला जातांना त्यांनीं यासंबंधानं माझ्याजवळ चकार शब्द सुद्धां कसा काढला नाहीं, हें कसं ?

पुरुषो०—त्यांनीं कसंही करून बुधवारपर्यंत इथं राहून स्वतःच हिला घेऊन जावं, ह्मणून मीही आपली पराकाष्ठा करून पाहिली; पण त्याला ते कबूल होईनात. ते म्हणाले, या बाबतींत पुढं जर कदा-चित् फिर्यादी अर्यादी झाल्या, तर तें सारं मलाच भोंवणार. तें कांहीं बरं नव्हे. पण बाकीची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन, सुशीला अचानक आपल्या घरीं चालून यावी अशी जर तुम्हीं व्यवस्था करीत असाल, तर त्याला मात्र आपली ना नाहीं. याशिवाय या प्रकरणाशीं आपला कोणत्याही प्रकारचा संबंध आहे, असं नुसतं दिसूं देण्यालाही आपण तयार नाहीं. असं त्यांनीं निक्षून सांगितलं, तेव्हां माझी बहुतेक नाउमेदच झाली. बाकीचं सर्व होईल, पण तुमचा या गोष्टीला रुकार मिळवावा कसा, हें मला सुचेना. आपल्या बायकोला तुमच्याकडं पाठवावी, असं एकदां मनांत आलं, पण तिच्या हातून तें काम पार पडेल असा मला भरंवसा येईना. तेव्हां आपण स्वतःच तुमचा रुकार मिळविण्याचा यत्न करावा, यश देणार ईश्वर समर्थ आहे, असं शेवटीं मी ठरवलं, व मनांत योजल्याप्रमाणं तुमची गांठ पडून, मी आपला विचार तुह्मांला कळविलाच आहे. यांत थोडंसं साहस आहे खरं; पण त्यावांचून गत्यंतर नाहीं, हें मनांत आणून तुम्ही त्याला संमती द्याल, असा मला भरंवसा आहे.

राधा०–पुरुषोत्तमपंत, तुम्ही आह्मा दोन गाईंना चिखलांतून वर काढण्याच्या हेतूनंच हा इतका त्रास घेत अहां, याबद्दल मला आतां काडीइतकाही संशय उरला नाहीं. पणः—

अंजनीगीत.

मार्ग असे जो तुह्मि योजियला। बरवा न दिसे माझ्या मतिला
करुनि साहसा जनदोषाला । पात्र कशी होऊं ॥ १ ॥
इष्ट वाटतें जें कां पतिला । ह्मणति इष्ट तें व्हावें स्त्रीला ।
विगणिन जरि या जनवचनाला । होइल जगिं निंदा ॥२॥

शिवाय भालचंद्रपंत म्हणतात त्याप्रमाणं फिर्यादीअर्यादी झाल्या तर काय होईल ही भीती आहेच. मग हिला फिरून नवरा मिळायचीही कदाचित् पंचाईत होऊन बसायची !

पुरुषो०– हें पहा असल्या कामांतही नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध केल्याबद्दल तुह्मांला नांवं ठेवणारे कांहीं हरीचे लाल जरी सांपडले' तरी तुमच्या कन्यावात्सल्याबद्दल तुह्माला नांवाजणारेही अनेक लोक निघतील; व त्यांपैकीं कुणीही हिला मोठ्या आनंदानं पत्करील, यांत संशय नाहीं. तुमची दुसरी भीती फिर्यादीअर्यादीची. पण मीच हिच्या हातून असं साहस करवलं, हें वाटेल तिथं कबूल करायला जर मी तयार आहें, तर मग तुम्हांला त्याची भीती कसली ? याबद्दल मला कुणी कांहींही म्हटलं, वेळीं तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला, तरी मी त्याला मोठ्या आनंदानं तोंड देईन. तुह्माला मी हात जोडतों, पायां पडतों, माझं एवढं ऐकाच.

सुशीला–आई, देव कृपाळू होऊन, मला या दुःखाच्या खाईंतून वर निघायला हात देतो, आणि त्याला तूंच झिडकारून दूर लोटतेस ? आणि तेंही कां, तर लोक नांवं ठेवतील ह्मणून ! अग लोकांनीं नांवं ठेवलीं, तरी तीं असणार दोन दिवसांचीं, आणि माझ्या होळी होणार साऱ्या जन्माची, हें कसंग नाहीं येत तुझ्या लक्षांत ? नाहीं तर हें बघ, याचा दोष तूं आपल्यावरही घेऊं नकोस, अथवा तो यांच्यावर टाकून, यांनाही नसत्या पेंचांत घालूं नकोस. तर तूं आपली असं करः—

पद– (‘ तूं टाक चिरुनि ही मान० ’ या चालीवर).

टाकूनि मजवरी दोष । रहा निर्दोष ॥
मी सज्ज पडाया बळी, जरी कुणि छळी, धरुनिया रोष ॥ध्रु०॥
(चाल) जरि मला मिळेना पती । मज नसे तयाची क्षिती ।
पुरवली कुमारी स्थिती ।
याहुनी, बरवि ती गणी, त्यांत शतगुणी, मला संतोष ॥ १ ॥

आई, ही अशी अमोलिक संधी आणू म्हटल्यानं यायची नाहीं. ती आयती चालून घरीं आली आहे. तेव्हां तूं यांचं ऐकच, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. आईः—

पद– (‘ हे प्रभो विभो अगाध० ’ या चालीवर.)

तूं नको नको संधि अशी ही गमवूं । सुजना या मुळिंही दुखवूं ॥
(चाल) धावुनी लगबगा आले । मत्राण कराया सजले ।
निष्काम प्रेम हें असलें । न गडे मागें फिरवूं ॥१॥ तूं नको० ॥

राधाबाई– पुरुषोत्तमपंत ‘एकीकडे आड आणि एकीकडे विहीर’ म्हणतात, तशांतली खरोखर यावेळीं माझी स्थिती होऊन गेली आहे. राहून राहून वाटतं, कीं देवानं आपल्याला ज्यांच्या हवालीं केलं, त्यांचं करणं किती जरी गैर असलं, तरी त्याच्या उलट जाणं बरं दिसत नाहीं. पण फिरून या पोरीच्या तोंडाकडं पाहिलं, म्हणजे वाटतं, कीं एकीची जी वाट लागली, ती डोळ्यांसमोर असून, डोळ्यांवर कातडं ओढून घेऊन, दुसरीचीही तशीच गत होऊं द्यावी, हें निदान आईला तरी शोभत नाहीं; पतीच्या इच्छेविरुद्ध गेल्याबद्दल लोकांनीं आपली कितीही छीः थूः केली, देवानं त्याबद्दल कसंही शासन केलं, तरी पुरवलं; पण या पोटच्या गोळ्याला दुःखाच्या खाईतून वर काढायला आपण तरी आपली शिकस्त केल्यावांचून राहूं नये. अजूनहीः— दिंडी–

पुढें कैचें होईल हिचें आतां ।
भिववि चित्ता ही फिरुनि फिरुनि चिंता ।
उद्यांवरती आजचें मरण गेलें ।
असें मानुनि साहसा सिद्ध झालें ॥ १ ॥

तेव्हां माझ्यासंबंधानं तुम्ही आतां अगदीं निर्धास्त असा. बुधवारीं मध्यरात्रीं हिला तुमच्या पदरांत घालण्याच्या कामीं माझ्याकडून काडीइतकी देखील कसूर होणार नाहीं. मग तिला तारा वा मारा. चला आतां. माझी ही देवाला जायची वेळ झाली आहे, तेव्हां मीही जोगेश्वरीचं दर्शन घेऊन सर्व सुरळित पार पडावं म्हणून देवीला नवस करतें. (सर्व उठतात.)

पुरुषोत्तम– शाबास ! राधाकाकू शाबास ! तुमच्या या मातृप्रेमाची व तुम्ही दाखविलेल्या धैर्याची सर्व समंजस लोक तारीफच करीत रहातील, व ईश्वर याची पुण्यकृत्यांतच गणना करील, याबद्दल मला अगदीं शंका नाहीं. असो, आतां तुह्माला कांहीं सांगायचं राहिलं नाहींच, तथापि इतकंच ह्मणतों कीं,:—

पद– (' नागीणि चपल खलजिव्हा० ' या चालीवर.)

लाभेल पति कसा हिजला । हा तुह्माला । घोर नुरला ।
काळजी अतां ती मजला ॥ ध्रु० ॥
हिजला मम प्राणासम मानिन । हिच्या सुखास्तव मुळिंहि न मोजिन । आली जरि संकटमाला ॥ १ ॥ लाभेल० ॥

येतों तर आतां. फिरून गांठ बुधवारीं रात्रीं. (जातो. पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

रामशास्त्री–(आपल्याशीं) तरी मला प्रथमच वाटलं होतं कीं, यांत कुणी तरी भेद्या असला पाहिजे. पण हा एवढा सारा उपद्व्याप आमच्याच चिरंजिवांनीं केला असेल, हें माझ्या स्वप्नींही नव्हतं. पण पहातों तों आपलं खरंच ! काय करावं ? पैशाच्या परी पैशाला मुकलों आणि वर आणखी हा गळफांस ! बरं, पोर तरी सुधं असायचं होतं ! दुसरासा असता तर ' शिवाय गुरवे नमः ' ह्मणून कानावर हात ठेवून केव्हांच मोकळा झाला असता. पण हा बेटा मला आपलं स्पष्ट उत्तर करतो, कीं ' हो मीच करवलं हें सगळं, पुढं काय ह्मणतां ? ' अरे गाढवा ! मला विचारतोस पुढं काय करतां ह्मणून, पण उद्यां नानासाहेबांनीं तुला जर नेऊन कोर्टांत उभा केला, तर

तिथं काय उत्तर देणार तूं? आणि या थरावर गोष्ट आली, तर त्यांत नवल नाहीं. कोण ती कालची फजिती! थोरामोठ्याचं लग्न म्हणून प्रतिष्ठित गृहस्थ, शास्त्री, वैदिक, आपले निमंत्रणाप्रमाणं मंडप शोभिवंत करायला हजर! पण नवऱ्या मुलीला कुठं आहे ठिकाण! **दामोदरपंतांनीं** आपलं कुणाला कांहीं, कुणाला कांहीं सांगून मंडळी वाटेला लावली. पण ती बायकापोरांत पसरलेली गोष्ट! ती का लपून रहाते? मुलगी मध्यरात्रीं परसाकडेला ह्मणून गेली ती गेली, ही बातमी हां हां ह्मणतां साऱ्या शहरभर पसरली. पुढं साताऱ्याहून तार आली, तीही आपली बोलतां बोलतां ज्याच्या त्याच्या तोंडीं. कांहीं तरी खरं खोटं रचून झालेली फजिती लपवावी ह्मटलं, तर अणुमात्र जागा राहिली नाहीं. तेव्हां अशा स्थितींत हें प्रकरण कोर्टांत गेलं, तर त्यांत आश्चर्य कसलं? पण तें जर कोर्टांत जाऊं दिलं, तर इतक्या प्रयासानं मिळवलेली हातची शिकार जाईल ना? त्याची वाट काय? वाट कसली? त्याला युक्ती तीच. **हरभट** कांहीं अजून हातचा गेला नाहीं. **नानासाहेबही** बायकोकरतां हपापलेले आहेतच. आतां अशा पळून गेलेल्या पोरीशीं लग्न करायलां ते कदाचित् नाहीं होय करायचे. पण हें सर्व **भालचंद्रपंताच्या** फुसलावणीचं फळ आहे, तिच्याकडे त्याचा मुळींच दोष नाहीं, असं त्यांच्या मनांत भरवून दिलं, म्हणजे झालं. **भालचंद्रपंत** इथं नुकतेच येऊन गेले होते, हें तर **नानासाहेबांना** कळलंच आहे. त्यालाच आणखी थोडंसं तिखटमीठ लावावं कीं, झालं काम! शिवाय इतकी फजिती उडाल्यावर दुसरी एखादी मुलगी मिळणं बहुतेक दुरापास्तच, हीही भीती त्यांना आहेच. चिरंजीवही लवकरच मुंबईस जाणार आहेत. आणि शिवाय मी सिंहस्थांत लग्नाचा मुहूर्त काढणार आहें, हें त्याच्या स्वप्नींही येण्याचा संभव नाहीं. तेव्हां हा वार फसण्याची आतां अगदीं भीती नको. 'कृष्ण कृष्ण कृष्ण!' ही पाल कुचकुचली यांत सिद्धी खाचित मिळणार. तेव्हां आतां आधीं त्या काशीकराची गांठ घेऊन, या सिंहस्थाच्या शास्त्रार्थाचा तेवढा निकाल लावून, मग **नानासाहेबांची** गांठ घ्यावी हें बरं. (जातो.)

———

प्रवेश ४ था.

(नानासाहेबांच्या दिवाणखान्यांत ते व रामशास्त्री बोलत बसले आहेत.)

रामशास्त्री–पण आपल्याशीं लग्न लागूं नये, ह्मणून जर सुशीला नाहींशी झाली असती, तर एक गोष्ट वेगळी. तसा तर मुळींच प्रकार नाहीं. हें सर्व त्या **भालचंद्रपंतांचं** कारस्थान होतं हें आतां आपल्याला माहीत झालंच आहे.

नानासा०–पण सिंहस्थ संपेपर्यंत आतां जर मुळीं मूहूर्तच नाहीं, तर या नसत्या वाटाघाटींत अर्थ तरी काय ?

रामशास्त्री–मुहूर्ताची काळजी नको आपल्याला. त्याची व्यवस्था केल्याशिवाय का आलों आहें मी आपल्याकडं ?

नानासा०–पण तें धर्मसंमत होईल का ?

रामशास्त्री–अहो, आमचा धर्म ह्मणजे एक कामधेनु आहे. इष्टकामनापूर्तीला तो सहसा आड येणारा नाहीं. आपद्धर्म या सदराखालीं शास्त्रानं कसकशा सवलती ठेवल्या आहेत, याची आपल्याला पूर्ण माहिती नाहीं, ह्मणून आली ती आपल्याला शंका. आणि शिवाय सिंहस्थांत लग्न न करण्याची जी रूढी पडलेली आहे, तिच्या कारणाचा थोडासा विचार केला, म्हणजे याला वास्तविक आपद्धर्मही मानण्याचं प्रयोजन नाहीं. या पर्वणींत क्षौरादि विधी पुण्यदायी मानले आहेत. पण जनदृष्टीनं ते अशुभ गणले असल्यामुळं या वर्षाशीं अशुभत्वाची कल्पना कांहींशी सहचरित होऊन, या दिवसांत लग्नादि शुभकार्यं न करण्याकडं लोकांची प्रवृत्ती झाली आणि यांत भटाभिक्षुकांची ओढाताणही आयती वांचत असल्यामुळं आलं त्या रूढीचंच शास्त्र बनवण्यांत, झालं. तेव्हां ही उपपत्ती आपण विचारांत घेतली, ह्मणजे सिंहस्थांत लग्न करणं वास्तविक अधर्माचं कसं नाहीं, हें आपल्याला सहज दिसून येईल.

नाना०–असं असेल तर होईल तितक्या लवकर हें लग्न उरकून घेणं ह्मणजे एका अर्थी ही लौकिकाची झालेली हानी भरून काढण्यासारखंच आहे. पण पूर्वी माझ्या लक्षांत न आलेलं, असं आणखी एक भीतीचं कारण उपस्थित झालं आहे, त्यामुळं फिरून मन माघार घेतं.

रामशास्त्री–(वाचून) आणखी असं भीतीचं काय झालं आहे कारण उपस्थित ?

नाना०–सुशिलेला **त्रिवेणी** ह्मणून एक बहीण असून ती विधवा आहे, हें प्रथम मला माहीत नव्हतं. तेव्हां भीतीचं कारण हेंच कीं:–

पद–(' नको विवाहचि हा मजला० ' या चालीवर.)

असुनि त्रिवेणी नवि तरणी । अजुनि सकेशा । वयांत ऐशा ।
राहुनि राहुनि । येतें हें मनिं ॥ ध्रु० ॥ असुनि० ॥
फितवि कुणि फिरुनि विवाहाला। जरि तिजला। तरि डाग कुला।
हा धाक मला । पडतो फिरुनी ॥ १ ॥ असुनि० ॥

गोदावरीचा इतिहास आहेच आपल्याला ठाउक; आणि तसाच कांहीं प्रकार याही बाबतींत झाला, तर काय करावं ?

रामशास्त्री–अंः त्यांत काय आहे ! सिंहस्थ आलाच आहे, तेव्हां **हरभटा**कडून तिला लागलीच सोवळी करवून टाकली, कीं सगळाच घोर मिटला. **हरभटांनीं** तिला इतके दिवस तशी राहूं दिली, हेंच वास्तविक गैर. कारण त्यासंबंधानं व्याससंहितेंत स्पष्ट अनुज्ञाच आहे मुळी कीं, ' मृतं भर्तारमादाय ब्राह्मणी वन्हिमाविशेत् । जीवन्ती चेत् त्यक्तकेशा तपसा शोधयेत् वपुः । ' आतां या इंग्रजी कायद्यानं सती तर बंदच झाली आहे. राहतां राहिलं वपन. आणि त्यावांचून गतपती व विधवा या दोघांनाही नरकवास सांगितला आहे. तेव्हां हें झाल्यावर मगच मुळीं तिथिनिश्चय करतों, ह्मणजे झालं कीं नाहीं ?

नाना०–ह्मणजे सारंच निर्धास्त झालं. पण हें लांबणीवर मात्र टाकूं नकाहो. 'शुभंच शीघ्रं.' आतां तिकडंच जा आणि काय ठरवलंत तें मला लागलींच येऊन कळवा. मी शौचाला जाऊन आलों, कीं रिकामाच आहें.

रामशास्त्री– ठीक आहे. या पावलींच निघालों मी तिकडं.

(रामशास्त्री जातात, मागून कानावर जानवें घालीत नानासाहेबही जातात.)

प्रवेश ५ वा.

(केश मोकळे सोडलेली चिंताग्रस्त त्रिवेणी मागिलदारच्या परसाच्या पायरीवर बसली आहे.)

त्रिवेणी–(आपल्याशीं)

पद–(‘ उद्धवा शांतवन० ’ या चालीवर.)

संपुनी भाग्य आजि कैचें । केशांनों तुमचें गेलें ॥ ध्रु० ॥
न्हाणिलें माखिलें तुह्मा । मातेनें अति प्रेमानें ।
वाढविले करुनी नाना । यत्नातें किति आस्थेनें ।
(चाल) तें सर्व व्यर्थ परि गमतें । पोसुनी जेवि बकरीतें ।
मग कसाब कापी तीतें । तैसें हें वाटे झालें ॥१॥ संपुनी० ॥

पण केशांनो, तुम्ही मला सोडून गेल्यावर मग काय रहाणार ? तुमच्याबरोबर सगळ्याचाच शेवट होणार ! हाय ! हाय ! !

पद–(‘ बलसागर तुम्हि० ’ या चालीवर.)

तुह्मि गेल्यावरि कुठुनि कपाळीं चंद्रकळा काळी ।
कुठली अंगीं जरतारी वा साधीही चोळी ॥ १ ॥
मूद फुलें मग कुठुनि नाग तो नाकीं नथ कुठली ।
तोडे गोटहि सरी ठुशी ती मग मजला सुटली ॥ २ ॥
सौभाग्याचें सौख्य न लिहिलें विधिनें जरि भाळीं ।
तुमच्या संगें तत्सुखछाया अजवरि अनुभविली ॥३॥
ती छाया कां हिरोनि घेतां काय चुकी घडली ।
कांहो सांगा, तोडुनि जातां ममता जी जडली॥४॥तुह्मि०॥

केशांनो ! मी इतके दिवस तुमची जी जोपा केली, ती व्यर्थच ना ? ज्यांनीं त्यांनीं म्हणावं, ‘ पहा हिचा नवरा मेला, आतां कशाला हवी हिला वेणी न फणी ! ही आतां नटून मुरडून दाखवणार तरी कोणाला ?’ पण काय सांगू, तुम्हांला शोभवण्यांत मला इतकी कांहीं हौस वाटते, कीं त्यापुढं या लोकांच्या हंसण्यालाही मी जुमानीत नाहीं. पण आतां तें सारं गत गोष्टीसारखं होणार ना ? बाकीच्या बायका तुह्मांला नाना प्रकारें शृंगारून, कुणी आपल्या पतीला आनंदित करतात, कुणी आपल्या आईबापांना सुखवतात,

कुणी लग्नाकार्यांत हौसेनं इकडून तिकडं मिरवतात. पण मला हत-भागिनीला पाहून आनंद तो कुणाला होणार! आमचं नुसतं तोंड पाहिलं कीं अपशकून होतो! मग लग्नाकार्यांत आह्माला कोण येऊं देणार? तरी पण तुमच्यामुळं मी कशी बशी चारचौघींत उठत बसत तरी होतें. पण आतां काय? झालं! फार तर चार प्रहरांचे तुम्ही आतां सोबती! पण केशांनो! मी तुम्हाला खचित सोडणार नाहीं! अगदीं गच्च धरून बसेन! मग तुम्ही—(इतक्यांत तिची मैत्रीण यमुना दार उघडून आंत येते. त्रिवेणी न्हावी आला असं वाटून घाबरून उठते) अग आई! धांवग धांव! हा दुष्ट आतां मला विद्रूप करणार! हाय! हाय! आतां माझी कीव कोण करील? (यमुना मागून येऊन तिला धरते. त्रिवेणी अधिकच घाबरून ओरडते) अग आई! आतां काय करूं? :—

अंजनीगीत.

धरणिमाते दुभंग होई। कन्या अपुली उदरीं घेई।
झगटे अंगा दुष्ट अगाई। राखि लाज माझी ॥ १ ॥

(त्रिवेणी मूर्छित होऊन पडते; यमुना तिचें डोकें मांडीवर घेऊन तिला पदरानें वारा घालते.)

यमुना—अग **त्रिवेणी** असंग काय करतेस? धांवा धांवा काय म्हणतेस, भलतं सलतंच काय बडबडतेस? अग डोळे उघडून माझ्या-कडं पाहशील तर खरी! अग मी तुझी मैत्रीण **यमुना** नव्हे का? अजूनही मला ओळखलं नाहींस वाटतं?

त्रिवेणी—(सावध होऊन यमुनेच्या तोंडाकडे पहात) कोण यमुने! तूं का आलीस?

यमुना—मग तुला कोण वाटलं?

त्रिवेणी—(हळूच उठत उठत) हें पहा **यमने**! काय सांगूं तुला? माझ्या मनाला यावेळीं काय यातना होत आहेत, त्या माझ्या मला ठाऊक! देवा! माझ्या हातून अशी काय चुकी घडली कीं, मजवर तुझा इतका कोप व्हावा? अग आई! यापेक्षां मला मरण आलं असतं, तरी पुरवलं असतं! **यमने**, कायग मी आतां करूं? (यमुने-च्या गळ्याला मिठी मारून रडूं लागते.)

यमुना–(आपल्याशीं) अगबाई हिच्यावर कांहीं तरी मोठं संकट आलं असलं पाहिजे, नाहीं तर ही इतकी वेडावून नाहीं जायची. (तिचे डोळे पुशीत मोठ्यानें) पण त्रिवेणी, तुझ्यावर असं कोणतं संकट ओढवलं आहे, तें मला सांगशील तर खरी. हें पहा, मला सांगायला अंदेशा नको आणूं मनांत. हं सांग पाहूं.

त्रिवेणी– यमने काय तुला सांगूं मी ?

पद– (' झाली ज्याची उपवर दुहिता० ' या चालीवर.)

उच्चाराया शब्द कटू तें ! जिव्हा सखये माझि न वळते ॥ध्रु०॥
चारचौघिमधिं बसुनि मनातें । कशितरि अजवरि रिझवित होतें ।
तेंहि न पहावे कर्मगतीतें । सुख तेंही ती हिरुनी नेते ॥ १ ॥
कुठुनि आतां मी बाहिर पडतें । झोपाळ्यावरि गाणीं ह्मणतें ।
केंचे आतां खेळ खेळतें । स्वप्नचि सारें सखि होई तें ॥ २ ॥
त्रिवेणि ! चल तुझि वेणि घालितें।ह्मणशिल आतां वद कोणातें।
विंचरिलें त्वां प्रेमें ज्यांतें । सखे चालले सोडुनि मज ते ॥ ३॥

(फिरून यमुनेच्या गळां पडून रडूं लागते.)

यमुना–(आपल्याशीं) अरेरे ! काय बिचारीवर प्रसंग ! (मोठ्यानें) त्रिवेणी ! मी आतां कांहीं बोललें, तरी तुला दुष्टासारखी वाटणार आहें. पण तुला सांगतें, असा प्रसंग माझ्या वैऱ्यावरही आलेला मला पाहवणार नाहीं. मग तूं तर माझी जिवाची मैत्रीण ! लहानपणापासून आपण एका ठिकाणीं खेळत आलों ! एकमेकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी एकमेकांशीं बोललों ! मग तुझ्यावर असा प्रसंग आलेला मला कसा बरं बघवेल ? पण सखे, करायचं काय ? बायकांचं जिणंच मुळीं खोटं ! तेव्हां आपणच आपला विवेक करून दुःख गिळलं पाहिजे.

त्रिवेणी–यमने, तूं ह्मणतेस तें खरं, पण कायग करूं ? देवानं माझा नवरा नेला, त्याबरोबर एवढी मेली हौसही नेली असती, तर फार बरं झालं असतं. पण ती तेवढी मेली नाहीं नाहींशी केली, याला कसं ग करूं ?

यमुना–अग, मला का तें समजत नाहीं ह्मणतेस ? वैराग्य कांहीं सोपं नाहीं, आणि त्यांतही तुझ्या वयाला तर तें फारच कठीण, हें मलाही कळतं; पण करायचं काय ? वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे.

त्रिवेणी–अग हें सारं सांगायला येतं, पण तें करणं किती कठीण आहे, हें तूं सुखांत आहेस, ह्मणून तुझ्या चांगलंसं ध्यानांत येत नाहीं. मी त्याबद्दल विचार करकरून रात्रीच्या रात्री काढल्या आहेत. तूंच विचार करून पहा बरं ? मी विचारतें:–

पद–(‘ मज लावण्याची खनि दिसते० ’ या चालीवर.)

हौस कुणाला सुटलि। वद गडे। हौस०। आशा तुटली॥ध्रु०॥हौ०
जरि पुत्राच्या विरहें माता । विव्हल होई तरि दिन जातां ।
बालमुखा चुंबाया करितां । उत्सुक न कुणा दिसलि । वद०॥१॥
स्त्री मरतां जरि घरोघरीं पति । श्मशानवैराग्याप्रति वरिती ।
सुतक फिटे न फिटे तों मागुति। नवरी न कुणी वरिलि। वद०॥२॥
जर्जर रोगांनीं जरि झाला । वृद्धहि आशाबद्ध सुखाला ।
जिंकिल कशि मग विधवाबाला। हौस मनीं जी जडलि।वद०।३।

यमुना–सखे, हौस जिंकायची कठीण खरी, पण लौकिकाला भ्यालं पाहिजेना ? हरभटजींना का वाइट वाटत नसेल, पण लोक नांवं ठेवतात, त्याला काय करायचं ? सखे, हे शब्द उच्चारायचं माझ्या अगदीं जिवावर येतं; पण असल्या वेड्यावांकड्या समाधानापेक्षां दुसरं काय ग माझ्या हातीं आहे ?

त्रिवेणी–अग तुझ्या हातीं काय आहे, आणि कुणाच्या हातीं काय आहे ! माझं नशीब फुटकं येवढं मात्र खरं ! तरी पण तुझं भाषण ऐकून माझ्या मनांत जे विचार येतात ते मला बोलून दाखवल्यावांचून रहावत नाहीं. तूं ह्मणतेस, लोक नांवं ठेवतात. पण बाबांनीं पाउणशें वर्षांच्या प्रेताशीं माझी मान गोवून दिली, तेव्हां या लोकांच्या तोंडाला कुलपं पडलीं होतीं काग ? आणि आतांच तेवढीं तीं निघालीं होय ? पण त्यावेळीं सारेच जर मुळीं आपापला स्वार्थ साधायला टपून बसलेले, तर मग नांव ठेवणार कोण आणि कुणाला ? काय ग तरी निर्दय हे पुरुष ? :—

पद– (' बघुनि उपवना ' या चालीवर.)
स्वार्थपरायण पुरुष पहा हे स्वार्थ कसा साधिती ।
मिथुनी सारे दुर्बल अबला जाणुनिया नाडिती ॥ ध्रु०॥
जरठ विधुरवर मध्यस्थांच्या रज्जूनें ओढिती ।
जनकाहि वैधव्याच्या कूपीं निजकन्या लोटिती ।
चांडालहि मनिं चरके पाहुनि अतिनिर्दय ही कृती ।
परी नवल कीं पुरुष न लाजति द्याया त्या संमती ।
(चाल) हा कन्याविक्रय शुभमंगल मानिती ।
भट शास्त्री मिळुनी दक्षिणार्थ धांवती ।
सोयरेधायरे पक्वान्नें झोडिती ।
यापरि जे ते सोय आपुली स्वस्थपणें लाविती ।
होळि होतसे सकल सुखाची अबलांच्या मात्र ती ॥१॥

यमुना– तूं ह्मणतेस तसं, हे सारे पुरुष आपापल्या सुखापुरतं पाहून, बायकांच्या सुखसोयीविषयीं अगदीं बेफिकीर असतात, याबद्दल काडीइतकी देखील शंका नाहीं. पण याला उपाय काय ?

त्रिवेणी– कां बरं याला उपाय असूं नये ? अग आधींच मेल्याहूनही मेल्या झालेल्या आम्हा दीन गायींवर आणखी धोपटे घालीत बसण्यांतच का या पुरुषांची सारी मर्दुमकी ? यापेक्षां आमच्या साऱ्या जन्माची राखरांगोळी करून टाकणाऱ्या नरपशूंचा हे चांगला समाचार घेते, तर कांग आमची अशी दैना झाली असती ? अग:–

पद– (' वद जाउं कुणाला शरण० ' या चालीवर.)
जे वृद्धपतिस्थंडिलीं, अर्पिती बळी, कन्यकांचे ।
जे साथी या पापाचे । अग सखयेग । जे साथी० ॥१॥
जे असुनि मृत्युच्या पथीं, गळे कापिती, बालिकांचे ।
ते सारे खाटिक साचे । अग सखयेग । ते० ॥ २ ॥
जरि लोक तया दंडिते, नाक कापिते, या खलांचे ॥
कापते गळे का असुचे । अग सखयेग । कापते० ॥ ३ ॥
परि पुरुष ह्मणुनि ते बळी, कवण मग पिळी, कान त्यांचे ।
जगिं काळ सर्व अबलांचे। अग सखयेग । जगिं० ॥४॥

यमुना– खरं बाई. पण चमत्कार हा कीं शास्त्रंही पहावीं, तीं आपलीं बायकांच्याच पाठीं लागलेलीं! त्यांनींच मुळीं तुझ्यासारखीला हें वपन लावून दिलं आहे, असं शास्त्री सांगतात.

त्रिवेणी– अग कसलीं मेलीं हीं शास्त्रं! आणि कसले मेले हे शास्त्री! हा सगळा अप्पलपोट्यांचा बाजार!!! हें सगळं देवाला मानवतं असं का तुला वाटतं! नाहींग नाहीं. तूं थोडा विचार करून पहा, म्हणजे हीं शास्त्रं देवानं केलीं नसून, आपमतलबी माणसांनींच रचलीं आहेत, हें तेव्हांच तुझ्या लक्षांत येईल. अग हा सारा धडधडीत अन्याय नाहीं काग? तूंच पहा बरंः—

पद– (‘ सकुमार, असुनि तूं फार० ’ या चालीवर.)

विधुरास, जरी संन्यास, बळें यायास, कुणि न ये पुढती। कुणि०।
मुंडाया विधवा सर्व तातडी करिति। तातडी० ॥ १ ॥
जरि पती, पत्निचा स्मृती, सहज विसरिती, दुजीला वरिती। दुजी०।
विधवांतें न कळे मार्ग अन्य का कथिती ॥ अन्य० ॥ २ ॥
हा न्याय, म्हणावा काय, परी स्त्री गाय, पाहुनी चिरिती। पाहुनी०
शास्त्राच्या सुरितें सखे घेउनी हातीं ॥ घेउनी० ॥ ३ ॥

यमुना– याला कोण न्याय ह्मणेल? पण हा धडधडीत अन्याय असून पुरुषांना दिसत कसा नाहीं, याचंच मला नवल वाटतं!

त्रिवेणी– अग त्यांत नवल कशाचं? हें बघः—

पद (‘ भूपती खरे ते वैभव० ’ या चालीवर.)

लागतें तळावें न कधिं उन्हामधिं ज्यातें । उन्हामधिं० ।
रवितापतीव्रता कुठुनि कळावी त्यातें ॥
जरि सखे पारखें शास्त्र नरांतें असतें। नरातें० ।
विधवा परि विधुरा त्राहि त्राहि तें करितें॥
(चाल) मृतपत्नीसुगतीसाठीं । मुंडितें ।
परिधान कराया छाटीं । सांगतें ।
उपवास व्रतेंही पाठीं । लावितें ॥
तरि तया कळुनियां हाल आमुचे पुरते । आमुचे० ।
पोळुनिया दुःखें सखे तेहि कळवळते ॥ १ ॥ लाग० ॥

यमुना– मला तुझ्या या ह्मणण्यांत एक अक्षरसुद्धां खोटं दिसत नाहीं. तेव्हां तुझं मी आतां कसं समाधान करूं ? तुझं एकंदर दुःख मनांत आणलं ह्मणजे वाटतं, कीं सती जाण्याची पहिल्यासारखी चाल असती, तर किती तरी बरं झालं असतं ! एकदांच काय हाल झाले असते, आणि मनाचा धडा करावा लागला असता, तो असता ! पण ही पदोपदीं विटंबना फार वाईट. जनावराला सुद्धां कुणी असे हाल हाल करून मारीत नाहींत. पण बायका ह्मटल्या कीं त्या जनावरापेक्षांही नीच. त्यांना कुणीच वाली नाहीं. पण अरेरे ! सखे, तुला आज मी अशी शेवटची पहाणारना ? तुला अशा स्थितींत टाकून घरीं जायला माझा पाय बघ कसा तो मुळींच निघत नाहीं. पण काय करूं ? मी कांहीं स्वतःची मुखत्यार नाहीं, आणि मला येऊन वेळही बराच झाला. तेव्हां ह्मणतें, कसं तरी करून मन घट्ट कर, आणि मला निरोप दे. आपण अशाच आणखी पुष्कळ दुःख करीत बसलों, तरी त्याचा काय उपयोग होणार ?

त्रिवेणी–**यमने**, जा तूं आतां. नाहीं तर चल, मीच तुला शेवटची दारापर्यंत पोचवायला येतें. उद्यांपासून हें काळं तोंड घेऊन मला कुठून बाहेर पडायला येणार ? चल. अग मनांत साचलेलं दुःख ओकल्याशिवाय रहावत नाहीं इतकंच. बाकी बायकांची जात ह्मटली ह्मणजे केवळ पंगू, हें मलाही दिसतंच आहे ! देव आमचा कुणी पाठिराखा निर्माण करील तेव्हां करील ! तोंपर्यंत आल्या संकटाला निमूट तोंड दिल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. तेव्हां आतां तुझाच उपदेश घेतें आणि–

पद–(व्यर्थ मि जन्मलें० या चालीवर.)

घट्टचि आतां मन करितें। आल्या भोगा मी सहतें ॥ध्रु०॥घट्ट०
सर्वस्वी परतंत्रा अबला हें मजला कळतें ॥
अग सखि हें मजला० ॥ घट्टचि० ॥ १ ॥
सुटका नाहीं आणुनि मनिं हें दुःखाला गिळितें ॥
अग सखि दुःखाला० ॥ घट्टचि० ॥ २ ॥

(दोघी डोळे पुशीत जातात. पडदा पडतो.)

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ–नानासाहेबांच्या वाड्याची देवडी.

गनबा–पन कायव जोतिबा, तो संकरभट बामन तर ह्मनत व्हता, कीं औंदा लगनं न्हाइ लागायची म्हून, अन मंग नानासाबांचं कसंव लागलं लगीन?

जोतिबा–तीं शास्तरं गनबा, गरिबास्नी लागू. पैकवाल्यानं काइ बी करावं. त्येला खोट न्हाई.

गनबा–अन ती पोरबी ह्मन पळून गेली व्हती, अन तिच्या संग कसं व लावलं तुमच्या धन्यानीं लगीन?

जोतिबा–तसं नव्ह त्ये गनबा, त्येचात झाली व्हती न्यारीच गफलत.

गनबा– काय राव थापा मारताया! आह्मास्नी ठावंच नाहीं जनु! तुमी असं बी ह्मनायचं कीं नानासाबांच्या भरजानीला बगून-श्यान अक्षी गुंग व्हून गेली व्हती ती पोर!

जोतिबा–तसं पन मीबी कुठं ह्मंगतोया! असल्या उतारपनात त्येनी लगीन करनं मलाबी तुमच्यावानीच वंगाळ वाटतं. पन त्येला अपुन काय करनार? तरी पन तिच्या पळून जान्यात काईबी गफलत झाली व्हती, ह्ये खास.

गनबा– तुमी काइबी ह्मना. पन त्येचात काइ बिंग असल्याबिगार ‘ कुनीबी न्हाई जायचं या लगनाला ’ अशी आमच्या धनीसाबांनीं समद्यास्नी ताकीद्च नसती दिली घरात.

जोतिबा– त्येचं कारन राव न्यारंच है. तुमच्या धन्याचा इचार व्हता, कीं आमच्या गोदावरीबाईचा झोतूर लावावा म्हून. ते आमच्या नानासाबास्नी न्हाइ पडलं पसंत. अन त्येनी तिला घरी आनून केली लागलीच सवळी. तवापून तेड आलीया जनु त्येंचात.

गनबा– अव पन नानासाबांचंबी नव्ह कां ह्ये तिसरं लगीन? त्येचातन झोतुरात काय व अंतर?

जोतिबा–अव पन बामनामधी पुर्शावानी बायकांची बी फिरून लगनं करायला धरम आहे ना आडवा ? त्येला काय करनार ?

गनबा– तुमीबी राव त्या बामनावानी वेडपं बनलाया जनु. अव ह्मातान्यास्नी खुशाल करू द्यावी लगनं, अन कवळ्या पोरीस्नी टाकाव्या मुंडून हा कोणत्या मुलखांतलाव धरम ?

लावणी–(तूं कोन कुनाची नारी॰ या चालीवर.)

धरमाचि रीत राव न्यारी । रंजल्याचा तो कैवारी ॥ ध्रु॰ ॥
पुर्शापुरती बगतो सोय जो रडवि घरोघर पोरी ।घरो॰। घरो॰॥
घरम ह्मनावा काय राव जो करी अशी शिरजोरी।अशी॰।अ॰१
बिजवरास्नी बांधि बाशिंगं असुन खोड ह्मातारी ।खोड॰।खो॰
रंडक्या पोरिला मुंडकि कराया नेइ गंगच्या तीरीं। गंग॰। गं॰२
धरम नव्ह तो ज्याच्यापायी पापं घडत्याती भारी । घड॰ ।घड॰
चोरुन करमं करून तान्हुली मारिति किति तरि नारी। किती॰३

जोतिबा–खरं गनबा. हा धरम नव्ह, असं मलाबी तुमच्यावानी आतां वाटूं लागलया. पन आपुन त्येला काय करणार ? ' तुका ह्मन उगी ऱ्हावं अन जे जे व्हइल तें तें पाहावं '! बरं त्ये राहू द्या आता. पन तुह्मी आज हकड कशापायी आला व्हता, त्ये तर समजू द्या.

गनबा– तुमच्या गोदावरीबाईच्या जावला आलया ऱ्हान. ह्मनून त्यासनी बोलावनं आलुया मी.

जोतिबा– पन गोदुताई जनु हैरान हैत्या. आज दोन दिसात त्या कुठं भाइर पडल्या ऱ्हाइ दिसल्या. चला पन आमच्या धनीसा-बाकडं. म्हजी समजल काय है त्ये. (जातात.)

प्रवेश २ रा.

(ऱ्हाणवली मखरांत बसली आहे व सत्यभामाबाई बाहेर उभ्या आहेत.)

सत्यभामा– (यशोदाबाई येतात त्यांस पाहून) या यशोदाबाई ! मी बायकांचीच वाट पहात बसलें आहें, पण अजून कांहीं कुणी येत नाहीं. फिरून स्वयंपाकालाही उशीर झालेला तिकडं खपायचा नाहीं.

यशोदा–पण तुमची थोरली सून नाहीं का स्वयंपाकपाणी पहायला ?

सत्य०—ती नेहमीं तरी असते कुठं इथं? तिचं आपलं उठ पळ माहेरीं, उठ पळ माहेरीं, हें एकसारखं चाललंच आहे. काय मध लागला आहे त्या माहेराला कुणाला ठाऊक! आई आजारी होती, तेव्हांपासून ती जी माहेरीं गेली आहे, ती परत कधीं आली आहे अजून! बापाच्या लग्नाला झटलं तर जवळ जवळ महिना होत आला. अजूनही नको होतं झणतां तिनं परतायला? शेवटीं परवा **सरस्वतीला** न्हाण आलं त्या दिवशीं मी बोलावणंही धाडलं. पण **नानासाहेबाक**डनं निरोप आला कीं, तिला बरं नाहीं. बरं वाटलं झणजे पाठवून देतों.

यशोदा—एकूण **नानासाहेबांचं** लग्न झालंच झणतां तर! पण तें झालं कुणाशीं? अन फिरून सिंहस्थांत कसं झालं?

सत्य०—अहो त्या **सुशिलेशींच** झालं फिरून तें. दाखवला असेल त्या मायलेकींना धाकदपटशा झालं. आणि त्या रामशास्त्र्यांनीं दिला बाई झणे सिंहस्थांत लग्न करायला शास्त्रार्थ काढून! आतां काय काय शास्त्रार्थ निघतील राम जाणे! पण देव कांहीं अजून झोपी गेला नाहीं. इकडं नानासाहेबांचं लग्न होतं न होतं, तोंच त्यांच्या त्या पुरुषोत्तमाची बायको गेली वैकुंठाला!

यशोदा—पण यांत त्यांना शिक्षा काय झाली? उद्यां होईल त्या पुरुषोत्तमाचं फिरून लग्न.

सत्य०—अहो, पण दुबार खर्च तर आलाना. यापेक्षां आणखी शिक्षा ती काय पाहिजे! पण तें असूं दे. **रमा** अजून कशी नाहीं येत? (इतक्यांत रमा येते. तिला पाहून) व: ही **रमा** आलीच. शंभर वर्षं आयुष्य आहे तुला! मी तुझीच तर वाट पहात होतें. बाकीच्या बायका येतील हळूहळू. पण सरस्वतीची ओटी भरण्याचा मान आज तुझा आहे!

रमा—इश्श! मीच कशाला पाहिजे ओटी भरायला?

सत्य०—अग जिला पहिला मुलगा झाला असतो, तिनंच भरली पाहिजे न्हाणवलीची ओटी आज. जसं कांहीं ठाऊकच नाहीं तुला. पण पहातें आतां तुझा हातगुण!

रमा—इश्श! माझा हातगुण काय करणार? माझ्या थोडंच आहे

तें हातीं. पण तें राहूं दे. मला आधीं हें मखर असं मागिलदारीं अगदीं खोनपटींत कां घातलं तें सांगा.

यशोदा— मी तरी तेंच विचारणार होतें.

सत्य०—अहो, पण करणार काय? 'असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ' ह्मणतात त्यांतली अवस्था! आमच्या इथलीं माणसं आपलीं सदा विटलेलीं. हौस ह्मणून काडीची नाहीं. मीं हिला बसवायची गोष्ट काढली मात्र! त्याला त्यांनीं सतराशें फाटे फोडले. नहाण आलं, त्याचं इतकं अवडंबर कशाला पाहिजे माजवायला; या असल्या गोष्टींची गपचीप या कानाचं त्या कानाला न कळतां व्यवस्था लागलेली चांगली; पण या बायकांना पाहिजे चारगटपणा करायला; यांना पाहिजे त्या न्हाणवलीला पालखींत बसवून सगळ्या गांवभर मिरवायला; दवंडीवाल्याकडून याची दवंडी पिटवायलाही सांगायच्या तुह्मी बायका; असं बाई बोलायला लागल्यावर मग काय करावं माणसानं? त्यांतच आणखी भाऊजींना वारून महिनाही झाला नाहीं, हीही सबब आयतीच पडली त्यांच्या पथ्यावर. मग मी जेव्हां अगदीं खनपटीलाच बसलें, तेव्हां नाहीं होय करतां करतां मिळाली एकदांची परवानगी. पण त्याबरोबरच बजवायचं, कीं तुह्माला अगदीं पाहिजेच असलं, तर घाला मागच्या सोप्यांत मखर, पुढच्या चौकांत किंवा माडीवर घातलं, तर टाकीन तें उसकटून! मग बाई काय करूं?

यशोदा— नाहीं, पण रामभाऊंच्या मरणाची त्यांची सबब साहजिकच होती.

सत्य०— अहो, भाऊजींकरितांच असतं तर मीही एक वेळ नसता धरला इतका आग्रह. पण त्यांचा मोडा पाहिला, तो आपला जानकीकरितां. ह्मणे, ती अशी दुःखी कष्टी आणि घरांत हे सुखसोहळे काढून मौजा मारायचं तुमच्या मनांत येतं तरी कसं! अहो, पण ही आतां दुःखी कष्टी असणार साऱ्या जन्मभर; ह्मणून कां आह्मी सगळ्यांनीं आतां बैरागी व्हावं ह्मणतां! आधीं आमच्या जानकीला कांगावा कसा करावा तो शिकवायला नको, आणि त्यांत तिकडून अशी फूस;

मग काय विचारतां ? तिनं आज चार दिवस मला कसं चळू का पळूं करून सोडलं आहे.

यशोदा—काय, केलन् तरी काय तिनं असं ?

सत्य०—अहो आजची सकाळचीच गोष्ट सांगतें तुम्हाला. म्हटलं, सरस्वती आज न्हाली आहे, तेव्हां अंबाडी बुचडा बांधून त्यावर फुलांची वेणी घालावी. जानकीला वेण्या चांगल्या करतां येतात, म्हणून तिला सांगितली ती करायला. पण काय आणलीन वेणी करून म्हणतां ! ना तिला शेंडा ना बुडखा. बरं तें झालं. पुढं आतां ओटी भरल्यावर न्हाणवलीला मखरांत जेवायला बसवायची, म्हणून वरचं तेवढं रुप्याचं ताट न वाट्या तिला आणायला सांगितल्या. त्याला आधीं लावलेन तीन प्रहर. बरं, पुढं आणल्यान, तों त्यांवर आपले सगळे पाण्याचे डाग ! हे कसे ग पडले म्हणून विचारलं, तों आपली आधीं बोलेचना. मग सांगितलेन कीं तीं भांडीं हातांत घेतल्याबरोबर मला रडूं कोसळलं, त्यानं पडले ते डाग. कायहो झालं हिला तीं भांडीं हातांत घेतल्याबरोबर रडं कोसळायला ? कां त्यांत विंचू होते, त्यांनीं नांग्या मारल्या हिला, कां झालं तरी काय ? असं एकका दोन, किती म्हणून तुम्हांला सांगूं ? मला अगदीं वैताग आणून सोडला आहे तिनं !

यशोदा—अहो खरं म्हणाल, तर असलीं कामं तिला या वेळीं सांगणं हेंच मला गैर वाटतं. तिचं गर्भादान व्हायचं ठरलं असून तें होण्यापूर्वीच दुर्दैवानं तिच्यावर तो प्रसंग ओढवला आणि त्याला अजून पुरते दोन महिनेही लोटले नाहींत. तेव्हां त्या फुलांची वेणी गुंफतांना तिचं चित्त ठिकाणावर राहिलं नाहीं, किंवा त्या ताटवाट्या पाहून आतां यापुढं साऱ्या जन्मभर आपण यांना आंचवलों, असं वाटून तिला रडं आवरलं नाहीं, तर त्यांत नवल कशाचं ?

सत्य०—पुरे पुरे ! तुम्हीही लागलां तिचाच कैवार घ्यायला. हिचाच काय तो नवरा मेला, असं नाहीं. शिवाय त्याला आतां दोन महिने होऊन गेले. आतां काय त्याचं ? आमच्या गणपतीची नव्हती का चांगली न्हाती धुती बायको मेली ? मग तो नव्हता असा उठल्या बसल्या रडत ?

यशोदा–अहो त्याची गोष्ट वेगळी अन तिची वेगळी. गणपतीची बायको मरून एक महिनाही झाला नाहीं, तोंच फिरून त्याचं लग्न झालं, आणि त्याला ४–६ महिने लोटले नाहींत, तोंच सरस्वतीला न्हाण येऊन, फिरून झालंच ह्मणायचं सगळं जिथल्या तिथं; तशी तर नाहींना जानकीला आतां आशा?

सत्य०–हें तर खरंना? मग उगीच रडून काय उपयोग? लागलीच सोवळी झाली असती, तर नवऱ्याला तरी नसतं कुजावं लागलं नरकांत. पण तिला तें कळेल तरना? अहो आतां तें छप्पर डोक्यावर चांगलं का दिसतं? शिवाय मला ती असून नसल्यासारखीच झाली आहे, तें वेगळंच. हो, तिच्या हातचा सैंपाक कांहीं नैवेद्य-वैश्वदेवाला चालायचा नाहीं, तेव्हां मलाच लागते त्या चुलीची सांज सकाळ पूजा करायला. आतांशा बाई नाहीं, ब्राह्मण नाहीं, कांहीं नाहीं. तिच्या मनाला हेंही नको म्हणतां वाटायला, कीं आपण तीन त्रिकाळ आपलं, ताट मांडलं, कीं आयतोबासारखे येऊन पानावर बसतों, हें कांहीं बरं नव्हे. पण तिला काय त्याचं? दुसऱ्याचे हात भाजले ह्मणून तिच्या थोडेच येताहेत हाताला फोड.

यशोदा–माझं ऐकाल, तर तुह्मी आतां हे नेमधर्म पाळायच्या भरीसच नका पडूं. अहो, आतां घरोघर हे प्रकार होऊन बसलेले. आतां नैवेद्य चालतो त्यांच्या हातचा आणि वैश्वदेव चालतो. परवां ते **कृष्णंभट** ह्मणत होते, कीं हे निर्बंध मागल्या युगांकरितां होते; कलीयुगाला ते लागू नाहींत ह्मणून.

सत्य०– **कृष्णंभट** म्हणोत, कीं कुणी ह्मणोत, मला कांहीं बाई असा भ्रष्टाकार खपायचा नाहीं. आणि याशिवाय मला भीती आहे ती दुसराच. थोरल्या सुनेसंबंधानं आमच्या घरच्यांनीं काय करायचं मनांत आणलं होतं, तें आलंच असेल बहुधा तुमच्या कानीं; पण **नाना**साहेबांनीं त्याला मोडा घालून, तिला माहेरीं नेऊन सोंवळी केली, तेव्हां तो विचार सोडून द्यावा लागला. तसं **जानकी**चंही करायचं यांनीं मांडलं, तर यांचं काय घ्या? तिच्या माहेरींही नाहीं कुणी यांना हरकत करायला.

यशोदा–तुम्हाला काय वाटत असेल तें असो. पण मला कीं नाहीं, या अजाण पोरींच्या हातून कांहीं वेडंवांकडं होण्याची धास्ती बाळगीत बसण्यापेक्षां, यांना फिरून संसारांत पडूं देणं कांहीं गैर दिसत नाहीं.

सत्य०–वः तुह्मी तर आतां शर्थ केलीत ह्मणायची! मग करावेत कीं नाहीं मुलीच्या दोन हाताचे चार हात?

यशो०–तुमच्यासारखे आमच्या घरचे पुरुष असते, तर मी खचितच मागं पाहिलं नसतं तसं करायला, पण ते त्याच्या उलट असल्यावर मग मी काय करणार? पण आतां या गोष्टी राहूंदेत. आपण जर अशाच बोलत बसलों, तर **सरस्वती**ची ओटी भरून घ्यावी केव्हां, आणि तिला जेवायला मिळावं केव्हां?

रमा०–मी तरी तेंच ह्मणणार होतें.

सत्य०–माझ्याकडून कांहीं उशीर नाहीं. मी मारतेंच **गणपती**ला हाक. **गणपती**! जरा खालीं येऊन जा बाळ पाहूं. पागोटं घालून येहो!

गणपती–(माडीवरून) आलोंच येवढं पत्र पुरं करून.

सत्य०–पण **राधाबाई** कशा नाहीं येत अजून? मी तर सकाळींच फिरून **पिलंभटां**ना त्यांच्याकडं पाठवलं होतं.

यशोदा–पण इतकीं बोलवण्यावर बोलावणीशीं लागूं लागलीं **राधाबाईंना**?

रमा०–वः, तुह्माला नाहींच का ठाऊक? अहो, **नानासाहेबांच्या** सासूबाई झाल्या आहेत त्या आतां!

यशो०–खरंच मी तें विसरलेंच होतें!

गणपती–(प्रवेश करून) हं हा आलों. काय करायचं?

सत्य०–पण इतकी गर्दी कशाची झाली आहे तुला?

रमा०–अहो गर्दी **सरस्वती**जवळ बसायची! दुसरी कशाची?

सत्य०–वः मग बरंच झालं. आह्मी तरी त्याकरितांच बोलावलं तुला. बस तिथं **सरस्वती**जवळच्या पाटावर.

गण०–कुठं मखरांत बसूं ह्मणतेस कीं काय? वः!

सत्य०–पण त्याला झालं काय?

गण०–कांहीं होवो वा न होवो. आपण कांहीं बसणार नाहीं. पाहिजे तर इथं बसतों.

सत्य०–बरं बाबा, तुह्मी अलीकडचीं मुलं. तुह्मी का कुणाचं ऐकणार आहां? **सरस्वती**, तूंच ये बाहेर आपली. **रमा**, घे तेवढे मखरांतले दोन्ही पाट बाहेर. (**रमा** पाट बाहेर मांडते) हं बैस इथं या पाटावर. **सरस्वती**, तूं बस त्या पाटावर. **रमा** भर आतां ओटी.

रमा०-पण ओटीच्या तबकांत साखर ठेवली आहे का घालून!

सत्य०–हो सगळं बरोबर करून ठेवलं आहे.

रमा०–पण तस्त कुठं आहे?

सत्य०–**जानकी**ला सांगितलं होतं तें आणून ठेवायला. पण ती बसली असेल कुठं तरी जाऊन रडत! तिला सांगून काम झाल्यावर मग काय? आपण मेल्याशिवाय स्वर्ग दिसायचा नाहीं. आणतें मी तें.

यशोदा–अहो, पण तें मखरांत दिसतं आहे तें काय?

रमा०–खरंच कीं तस्तच आहे. (बाहेर आणते.) हं उठा सरस्वतीबाई! पाय धुवाल कीं नाहीं आधीं यजमानांचे. (**गणपतीस**) मागितल्याशिवाय नाहीं हो द्यायचा पाय. आणि मागायचा तो उखाणा घालून नांव घेऊन मागितला पाहिजे.

सरस्वती–मला नाहीं बाई येत उखाणे.

रमा०–अस्सं का? बरं मी सांगतें उखाणा. मग तर झालंना? हं म्हण, ‘समोर होता कोनाडा त्यांत होता हिरा’

सरस्वती– समोर होता कोनाडा त्यांत होता हिरा–

रमा०–आणि **गणपतरावा**सारख्या लग्न झालेल्या पुरुषांना बाहेरचा नाद नाहीं बरा.

सरस्वती–इश्शबाई! हा कसला भलताच उखाणा?

यशोदा–पण काय ग **रमा**, लग्न झालं नसलं, ह्मणजे मग वाटेल तिथं झक मारायला कुलमुखत्यारी दिली आहे वाटतं कुणी पुरुषांना!

सत्य०–अहो लग्न झालं असलं काय आणि नसलं काय, पुरुषांनीं कांहीं केलं, तरी त्यांना भंग नाहीं.

यशोदा–होका, हें नव्हतं बाई मला शास्त्र माहीत!

गणपती—हा तुमचा वाद पुरे चोवा आतां. हे केले दोन्ही पाय पुढं. आटपा आतां लौकर.

यशोदा—ह्मणजे दुसऱ्या उखाण्यांत नको निघायला आणखी एखादं बिंग !

सत्य०—राहूं दे बाई आतां ही थट्टा.

(**सरस्वती** पाय धुवून रुमालानें पुसते, **रमा** तिची ओटी भरते.)

रमा०—(**गणपती** उठून जाऊं लागतो त्यास) हं नांव घेतल्याशिवाय नाहीं हो जायचं. (**गणपती** जातो.)

सत्य०—अग आतां उद्यां फिरून व्हायचंच आहे तें सगळं.

पिलंभट—(प्रवेश करून) आतां उद्यां काय होतं कपाळ ! आतां गेलं तें आणखी महिन्यावर.

सत्य०—कां पण तें ?

पिलंभट—काय सांगूं तुह्माला ? तुम्ही मला निरोप सांगितला होता, कीं मुलीला घेऊन इकडंच दोन दिवस रहायला या, असं राधाबाईंना सांगा ह्मणून. त्याप्रमाणं मीं सकाळींच त्यांच्याकडं गेलों. त्या होय नाहीं करीत होत्या, इतक्यांत **नानासाहेबांकडून** मनुष्य आला, आणि त्यानं कायसं त्यांच्या कानांत सांगितलं. त्याबरोबर मला कांहीं एक न सांगतां, त्या मुलीला घेऊन तडक तिकडं गेल्या. मीही असं काय झालं आहे तें कळावं, ह्मणून त्यांच्या पाठोपाठ **नानासाहेबांच्या** घरीं गेलों, आणि ऐकतों तों आपलं विलक्षणच !

सत्य०—असं अर्धवट कायहो बोलतां काय झालं आहे, तें एकदां स्पष्ट सांगा तरी ?

पिलं०—काय सांगूं कपाळ ! पण सांगायला हें पाहिजेच. जरा एकीकडं व्हा. त्यांची मुलगी **गोदावरी**—ह्मणजे तुमची थोरली सून, तिनं आज पांच दिवस झाले, जीव दिला !

सत्य०—अरे देवा ! (असें ह्मणून मटकन खालीं बसते.)

यशोदा—पण जीव द्यायला झालं तरी काय ? आणि शिवाय त्याला पांच दिवस झाले ह्मणतां ? पण **सरस्वतीला** न्हाण आलं त्या दिवशीं तिला बोलावणं गेलं होतं, तेव्हां ती निजून आहे, बरं वाटलं

ह्मणजे येईल, असा **नानासाहिबांकडून** निरोप आला होता, हें कसं ?

पिलं०–त्या दिवशीं तीं मुळीं घरीं होती कुठं ? ती तर आधींच दोन दिवस घरांतून नाहींशी झाली होती. तेव्हां **नानासाहेबांनीं** सांगितली कांहीं तरी सबब, झालं. त्यांचा बारकाईनं शोध चाललाच होता, तों आज कोणच्याशा पत्रांतून, तिनं तळेगांवीं स्टेशनाजवळच्या विहिरींत जीव दिल्याचं सविस्तर छापून आलं, त्यावरून त्यांना समजला सगळा प्रकार.

यशोदा–पण जीव द्यायला कारण काय झालं तें नाहींच सांगितलंत तुह्मी ?

पिलं०–तें तुह्माला सांगूं तरी कसं, कोण जाणे. पण आतां तें छापून निघून सगळ्या गांवभर झालं आहे. नशिबाचा भोग ह्मणायचा, झालं ! ते **नाना**साहेबांचे कारभारी **दामोदर**पंत, त्यांनीं परवां **नाना**साहेबांच्या लग्नाचे वेळीं, आपल्या बायकोच्या अंगावर घालायला ह्मणून, **नाना**साहेबांच्या घरचे कांहीं दागिने तिच्यापासून घेतले होते मागून. लग्न होऊन आठ दिवस झाले, पंधरवडा लोटला, तरी त्यांनीं ते परत केले नाहींत. तिला अर्थातच काळजी लागली,–

यशोदा–म्हणजे ? ते नाकबूल गेले वाटतं, आणि ह्मणून घाबरून जाऊन तिनं जीव दिला ? पण तो तळेगांवीं जाऊन कां ?

पिलं०–छेहो ! त्यांत झाली होती दुसरीच भानगड ! (हळूच) त्या **दामोदर**पंतांच्या संगतीनं पोर पडली होती अडचणींत. तेव्हां तिनं दागिन्यांबद्दल निकड लावलेली पाहून त्यांनीं तिला सांगितलं, कीं तूर्त हे दागिने असूं देत असेच मजजवळ. हें झालेलं कृत्य आधीं निस्तरलं पाहिजे. हें लोकांच्या नजरेस येऊं लागून कुणाला अंदेशा आला, म्हणजे भलतीच बसायची पंचाइत होऊन. मी तळेगांवीं बिनबोभाट सर्व व्यवस्था करवली आहे, तिकडं तूं जा. जातांना **नानासाहेबांना** सांग, कीं मी सासरीं जातें ह्मणून. तेवढ्यानं सगळं गपचीप उरकलं, तर कांहीं नड नाहींच. पण यदाकदाचित् हें बाहेर फुटलं, ह्मणजे मग माहेरही सुटणार आणि सासरही सुटणार तेव्हां जिवाभावाला हे दागिने जवळ असलेले बरे. पोर घाबरून जाऊन बरं ह्मणाली. दुसरे दिवशीं

तळेगांवीं जाऊन पहाते, तों न्यायला मनुष्य आलेला नाहीं आणि कांहीं नाहीं. तेव्हां थोडा वेळ वाट पाहून ती स्टेशनाजवळच्या धर्मशाळेंत गेली. आणि आतां पुढं काय करावं हें तिला सुचेनासं होऊन, समोरच असलेल्या विहिरींत त्याच रात्रीं उडी टाकून, तिनं आपल्या कर्मकथेचा शेवट केला !

यशोदा–पण हें सगळं समजलं कसं ?

पिलं०– ही सगळी हकीकत बाहेर यायला असं कारण झालं कीं, **दामोदर**पंतांनीं शिकवल्याप्रमाणं आपण सासरीं जातों, असं **नानासाहेबां**ना न सांगतां, घडलेला सर्व प्रकार पत्र लिहून त्यांना कळवावा, व आपला अपराध पोटीं घालण्याबद्दल त्यांची प्रार्थना करावी, असा विचार करून, घरून निघण्यापूर्वी तिनं त्यांना एक पत्र लिहिलं होतं. पण मागून तिचा विचार फिरला, कीं तळेगांवाहून तें पोस्टांतून त्यांना पाठवण्याचा तिचा मानस होता, कोण जाणे; पण तिच्या गांठोड्यांत तें पत्र सांपडून, पंचनाम्याचे वेळीं तें वाचण्यांत आलं, त्यावरून ही सर्व हकीकत पत्रांतून छापून आली आहे. दुःखांत सुख इतकंच कीं, **दामोदर**पंतांनीं ते दागिने मात्र कालच **नानासाहेबां**कडं पोंचते केले आहेत.

यशोदा–काय बाई तरी हा प्रसंग ! सत्यंबाई तुमच्यावर तर दुःखाचा पर्वतच कोसळला ह्मणायचा. पण काय बाई करायचं ? सगळ्यांच्यापुढं जाववेल, पण नशिबापुढं कोण जाणार ?

सत्य०–तें तर खरंच, पण **यशोदा**बाई, या कारटीमुळं आतां मला बाहेर तोंड काढण्याची सुद्धां चोरी होणार हो! यापेक्षां त्यांनीं योजलं होतं तसं झालं असतं, तरी एक वेळ पुरवलं असतं, असं तुमच्यासारखं आतां मलाही वाटायला लागलं. शिव शिव ! काय ही बेअब्रू ! आतां कसंहो करूं यशोदाबाई !

यशोदा–तुमच्या दुःखाला पारावार नाहीं हें मलाही कळतं. पण कसा तरी मनाला विवेक केला पाहिजे. तुह्मी आतां आंत चला, आणि घटकाभर स्वस्थ पडा. चला उठाच. रमा तूं इथली एवढी आवराआवर कर. **सरस्वती**, तूंही चल आंतच. (सर्व जातात. पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

(नानासाहेब कोचावर टेंकून बसले आहेत.)

नाना०–(आपल्याशीं) हरहर ! काय मी ही आपली शोचनीय स्थिती करून घेतली ! पण याबद्दलचा सारा दोष माझ्याच माथीं नाहीं का ?—

पद्– (' अभिनव मधुलोलुप हे० ' या चालीवर)

अविचारें केलें जें तेंचि भोंवलें ।
विषवृक्षा यावि कशीं मधुरशीं फळें ॥ ध्रु. ॥ अविचारें० ॥
रूढीला बळि पडुनी । कन्या तरुणी असुनी ।
नाहिं तिचें दुःख मनीं । कधिंहि आणिलें ॥१॥ अविचारें०॥
श्वशुर तिला संसारीं । घालाया सिद्ध जरी ।
आणुनिया माहेरीं । तिजसि मुंडिलें ॥ २ ॥ अविचारें० ॥
होणारें परि घडलें । हातें जणुं तिज वधिलें ।
कुलहि कलंकित केलें । काय मिळाविलें ॥३॥ अविचारें०॥

वास्तविक पाहतां आपल्या स्वतःच्या स्थितीवरून मला तिच्या स्थितीची कल्पना व्हायला पाहिजे होती. ती झाली नाहीं इतकंच नाहीं, तर तिच्या सासऱ्याला तिचा कळवळा येऊन तो तिच्या दुःख-निवारणार्थ झटत असतां, मी तिचा जन्मदाता बाप असून, त्याला साह्य न करतां उलट त्याचा निषेध केला, आणि ती दुःखानं हंबरडा फोडीत असतां, अत्यंत क्रूरपणानं तिला विद्रूप करून टाकली ! पण त्याचा काय उपयोग झाला ? आणि तो झाला नाहीं यांत आश्चर्य तरी कशाचं ? जोंपर्यंत मन मुंडलं नाहीं, तोंपर्यंत या मस्तकमुंडनाचा काय उपयोग ? मी साठीच्या घरांत आलों असून, ज्या मला संन्यास पत्करेना, तो मी तिला बालवयांतच संन्यास देण्यास प्रवृत्त झालों, आणि जाणून बुजून तिची व तिजबरोबर आपली स्वतांची छीः थूः करून बसलों! या असल्या अनर्थाला कारण होण्यापेक्षां तिच्या सासऱ्याचं ऐकून तिचं फिरून लग्न होऊं दिलं असतं, तर तें शतपटीनं चांगलं झालं असतं ! तें मीं केलं नाहीं तें नाहींच, पण उलट याच अनर्थाची पुनरावृत्ती होण्याची मात्र मी आणखी सा-

मुग्री तयार करून ठेवली आहे ! शिव ! शिव !

पद–(' साध्य नसे मुनिकन्या० ' या चालीवर)

किति अविचार सि केला । विगणुनि भावी परिणामाला ॥ ध्रु० ॥
आचरुनी जरि साहस सुशिला । झटली संकट टाळायाला ।
तरिही शेवटिं नाडिलि तिजला । टोंची हें हृदयाला ।
सर्पावरती जैसा भाला ॥ १ ॥ किति० ॥
अवचित मृत्यू येउनि मजला । तिजवरि वैधव्याचा घाला ।
बालवयांतचि जरि या पडला । काय करिल मग अबला ।
चिंताज्वर हा जाळि मनाला ॥ २ ॥ किति० ॥

आणि आतां मला गांठायला, मृत्यूला फार दिवस लागतील असंही वाटत नाहीं. हा जो माझ्या मनाला भयंकर धक्का बसला आहे त्यामुळं आधींच रोगजर्जर झालेल्या या शरीरांत तो जणुं डोकावीतच आहे, असं मला भासायला लागलं आहे. अरेरे! किती तरी निंद्य माझं आचरण हें! **सुशिलेला**च नुसती नाडून मज दुष्टाचं समाधान झालं न हीं ! **त्रिवेणीला** कुणी कदाचित् पुनर्विवाहाची भर देईल, ह्मणून तिलाही मी तातडीनं सोवळी करवली, आणि लागलीच तिची तिच्या आत्याबाईकडे **ना**शकास रवानगी करून दिली ! पण तिलाही **दामोदर**पंतासारखा एखादा नराधम भेटला, तर माझ्या कुलाला कलंक लागायला राहील का ? हा विचार त्या वेळीं कसा माझ्या मनांत आला नाहीं! आणि **सुशिले**वरही असाच अनिष्ट प्रसंग गुदरणार नाहीं ह्मणून तरी कशावरून ? पण तो जर गुदरला, तर त्याचाही दोष सर्वथा माझ्याच माथीं नाहीं का ? आणि माझ्या डोळ्यांत देवानं हें झगझगीत अंजन घातलं असूनही, माझ्या निंद्य पापांत आणखी ही अशी भर पडूं देणं, म्हणजे माझ्या अविचाराला सीमाच नाहीं ह्मटलं पाहिजे. प्रयत्न केल्यास **सुशिले**शीं आचरलेल्या पापाचं अजूनही परिमार्जन करणं केवळ अशक्य आहे, असं मला वाटत नाहीं. तिचं जरी नांवाला माझ्याशीं लग्न झालेलं आहे, तरी ती अजून वास्तविक कुमारीच आहे. तेव्हां, माझ्या पश्चात् तुह्मी तिचे पालक व्हा आणि तिचं फिरून कन्यादान

करा, म्हणून गोपाळरावांची विनंती केली, तर ते ती खचित अमान्य करणार नाहींत. गोपाळराव ! तुम्ही मला वेळींच जागं करण्याचा प्रयत्न केला, तेव्हांच मी जागा झालों असतों, तर हा अनिष्ट प्रसंग मजवर कां आला असता ? तुम्ही त्यावेळीं उच्चारलेला प्रत्येक शब्द आतां माझ्या कर्णरंध्रांत कसा दुमदुमत आहे. तुम्ही मला नीट सांगत होतां कीं—

पद–(' जाते कीं मम शकुंतला हीं० ' या चालीवर)

दुःख पराचें आणुनिया मनिं स्वानुभवावरुनी ।
घात करुं नका कुमारिचा निज वृद्धपणीं वरुनी ॥ ध्रु०॥
उपदेशामृत हितदायी तें हालाहल गणुनी ।
वैधव्यार्णविं दिधली दीना बाला लोटोनी ॥ १ ॥
त्या पापास्तव दंडावें मज ऐसें योजोनी ।
दुःखगिरी हा मजवरि पडला अवचित कोसळुनी ॥२॥

माझ्या निंद्य कृतकर्माबद्दल या लोकींच जर मला अशी दुर्धर शिक्षा भोगावी लागत आहे, तर मेल्यावर मला दंडण्याकरितां यमलोकीं कोणत्या तीव्रतर यातनांची योजना केली असेल ! हाय ! हाय ! ते यमदूत माझ्या उघड्या पाठीवर कोरडे लगावूं लागले, ह्मणजे मी कितीही गयावया केलं, तरी ते माझी कीव करतील काय ? छे छे ! तें कोठून होणार ? अरे अधमपशो ! क्षणिक विषयसुखासाठीं, त्या निरपराधी दीन गाईच्या साऱ्या जन्माचा भंडवडा करण्यास उद्युक्त होतांना, तुला जर दयेचा पाझर फुटला नाहीं, तर तुज पाप्याची त्यांनीं काय म्हणून कीव करावी ? हे यमदूतांनो ! तुम्ही माझी अगदीं गय करूं नका ! आणा ते तुमचे कोरडे, आणि लगावा ते या अधमाच्या पाठींत ! (किंचित् थांबून व समोर दूर न्याहाळून) अरे पण हे डोक्याला मंडवळ्या बांधलेले इतके ह्मातारे इथं कुठून आले बरं ? आणि पहावं तों दुसरीही मंडळी आणखी त्यांच्याभोंवती जमली असून, ते सर्व एकमेकांच्या अंगावर तुटून पडूं पहात आहेत ! हें आहे तरी काय ? (निरखून पाहून) हां समजलं ! माझ्यासारखेच शिंगं मोडून वासरांत शिरणारे ह्मातारे नवरे मुलगे, त्यांचे

मध्यस्थ, त्यांना आपल्या कन्या ओपणारे लोभी बाप, आणि आपल्या संमतीनं त्यांना प्रोत्साहन देणारे शास्त्रीपंडित व त्या नवरदेवांचे सगेसोयरे, हे सर्व यमदूतांकरवीं होणाऱ्या दुःसह शिक्षेनं वैतागून जाऊन, जो तो 'तुमच्यामुळं आह्मांला या असह्य यातना सोसाव्या लागत आहेत,' असं ह्मणत, परस्परांच्या नरडीचा घोट घेऊं पहात आहे! हरहर! काय भयंकर देखावा हा! बाबांनो! आतां एकमेकांवर असे दांत ओठ खाल्ल्यानं या यमदंडापासून तुमची थोडीच सुटका होणार आहे! वेळीं जागे झाला असतां, तर त्याचा उपयोग होता. आतां उगाच जळफळण्यांत काय अर्थ आहे? नका असे एकमेकांच्या अंगावर धावूं. आपण सर्व सारख्याच दोषाचे वाटेकरी आहोंत. हां आटोपा हात! (असें ह्मणत त्यांस थांबविण्यास जाऊं लागतो व फिरून भानावर येऊन) अरे! पण मी वेड्यासारखा बोलतों आहें कोणाशीं? आणि भांडणापासून परावृत्त तरी कोणाला करायला निघालों? इथं तर कुणीच नाहीं. हा मला नुसता भास झाला. अथवा हा भास नव्हे. तर माझ्या मनाला एकसारखे टोचीत राहिलेले जे यातनामय विचार, त्यांचंच हें प्रतिबिंब ह्मणायचं! एकंदरींत पापी माणसाचं त्रस्तांतःकरण ही एक दुसरी नरकपुरीच ह्मणतात, तें खोटं नाहीं. माझ्या विधुर बंधूंनो! हें माझं उदाहरण पाहून तुमचे डोळे उघडतील काय? बापहो!

पद- ('जाई तूं परतोनी०' या चालीवर)

(राग—असावरी.)

तळमळ ही देखोनी। नयनीं। तळमळ ही देखोनी॥
बालवधूला नाडुं नका हो! हेतु दुष्ट तो या सोडोनी॥ ध्रु०॥
विधवाबाला रडति घरोघर, तिकडे डोळेझाक करोनी॥
त्यांत नका भर घालूं अणखी, क्षणिक सुखाचा लोभ धरोनी॥१॥
खोटें ठरुनी स्वप्न सुखाचें राहिल जाचणि मनिं लागोनी॥
बसाल गाळित अश्रुसणी मग हाय! हाय! हा जप घेवोनी॥२

(पडदा पडतो.)

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ–रस्ता.

यशोदा–बरी तुमची गांठ पडली. आज बरेच दिवस तुम्हाला भेटायचं मी मनांत योजतें आहें, पण फुरसतच झाली नाहीं.

सत्यभामा–आतां गांठ पडली, ह्मणून आपलं वरकरणीं हें बोलतां आहां झालं. पण माझ्याकडं नुसतं बसायला आल्यानं कांहीं तुह्मला कुणी वाळींत नाहीं टाकीत !

यशोदा–पण तुह्मला आधीं अशी शंका आली कशी ?

सत्यभामा–शंकेला खरं ह्मटलं तर जागा नाहीं खरी; पण म्हटलं, नजाणो ! बाकी मला या कामीं गुरुमंत्र मिळाला आहे तुमच्याचकडून. 'अशा पोरींच्या हातून कांहीं वेडंवाकडं होण्याची भीती बाळगीत बसण्यापेक्षां त्यांना फिरून संसारांत पडूं देणं कांहीं गैर नाहीं, ' हें तुम्ही म्हटल्याला जवळ जवळ दोन वर्षं होत आलीं; पण ते तुमचे शब्द माझ्या हृदयांत अगदीं वज्रलेप होऊन बसले आहेत.

यशोदा–आणि तुह्मी त्याचा उपयोगही पण केलात. आपल्या जावेला आपली मुलगी मानून तिचं कन्यादान करायला पुढं येणं, म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे ! बरं, पण **जानकी** गेली का आपल्या नवऱ्याकडं ?

सत्यभामा–नाहीं अजून. त्यांना आठपंधरा दिवसांत एम. ए. च्या परीक्षेकरतां मुंबईला जायचं आहे, तिकडून आले, म्हणजे जाणार आहेत **जानकी**ला घेऊन वडलांकडे. तूर्त कालेजांतच आहेत ते.

यशोदा–एकूण त्यांचं हें पहिलंच लग्न वाटतं ? आणि तसं असलं, तर अधिकच तारीफ म्हणायची त्यांची.

सत्यभामा–तें तर खरंच; पण मला ह्मणाल तर त्यांच्याहीपेक्षां त्यांच्या वडलांचीच तारीफ वाटते. मुलावर कुमारींच्या उड्या पडत असून विधवेला आपली सून करायला आजकाल कोण तयार आहे ?

यशोदा—असो, जानकी मोठी दैवाची झणायची. मला हें ऐकून फार संतोष झाला. उद्यां आदितवार आहे, तेव्हां येतें उद्यांच दुपारीं तुमच्याकडं. म्हणजे **जानकी**चा नवराही पाहायला सांपडेल. पण तुम्ही आतां इतक्या लगबगींनें निघाला आहां कुठं तें मला सांगा.

सत्यभामा—दुसरं असंच एक लग्न जमवावं म्हणतें जमलं तर.

यशोदा—तुम्ही एकदां एखादी गोष्ट मनावर घेतलीत कीं, तिला तुह्मी आपल्या वाहिलेल्या, हें मला ठाऊकच आहे.

सत्यभामा—माझं असूं द्या, पण मी तुम्हाला सांगतें, कीं बायकांनीं स्वतः मनावर घेतल्याशिवाय असल्या गोष्टी रंगारूपाला यायच्या नाहींत. पुरुषांचेंही त्याला साह्य पाहिजे हें खरं, पण त्याचा मुख्य भार ह्मणाल तर बायकांवरच आहे. आणि त्यांचं या कामीं मन वळवणं फार कठीण आहे असंही मला वाटत नाहीं. त्यांना सगळ्या गोष्टी नीट समजून सांगितल्या, म्हणजे याबद्दलची त्यांच्या मनांत असलेली आढी खचित निघून जाईल. हा सगळा गैरसमजाचा प्रकार आहे. मला सुद्धां मागं वाटत असे, कीं पुनर्विवाह म्हणजे कांहीं मुलखानिराळी तऱ्हा असेल म्हणून. पण पहायला गेलं तर त्यांत मुळींच कांहीं चमत्कारिक नाहीं. तोच विधी, तशींच मंगळाष्टकं, सगळं कांहीं आपलं इतर लग्नासारखंच.

यशोदा—अहो बायकाच नव्हे, तर पुष्कळ पुरुषही मनचंच आपलं कांहीं तरी रचून, उगीच त्याला नांवं ठेवीत असतात. पण त्याबद्दल बोलूं केव्हां तरी रिकामपणीं. आतां आधीं मला हें सांगा कीं कुणाच्या लग्नाचा विचार चाळविला आहेत हा ?

सत्यभामा—नानासाहेब वारल्यापासूत आज दीड दोन वर्षं **सुशीला गोपाळरावां**च्याकडंच असते, हें आहेच ठाऊक तुह्माला. ती आली होती त्यांच्या बरोबर परवां जानकीच्या लग्नाला. तिथं गोष्टीवरून गोष्टी निघतां समजलं कीं, **गोपाळरावां**च्या मनांतून तिनं फिरून लग्न करावं असं फार आहे. पण तीच हट्ट घेऊन बसली आहे, कीं मला नाहीं आतां फिरून या लग्नाच्या भानगडींत पडायचं ह्मणून. तिच्या अंगीं वास्तविक या वयांत असलं वैराग्य

उत्पन्न होणं साहजिक नाहीं. मला तर वाटतं कीं ती लौकिकाच्या भीतीनं मागं घेत असावी. तेव्हां **राधाबाईंकडून** तिच्याजवळ ही गोष्ट काढवून कांहीं उपयोग झाला तर पहावा, ह्मणून चाललें आहे मी आतां **राधाबाईंकडं**. सुशिलेचं फिरून लग्न झालं, तर माझी कांहीं त्याला हरकत नाहीं, असं त्यांनीं एकदां माझ्याजवळ ह्मटलेलं मला स्मरतं. ह्मणून ह्मणतें पहावा प्रयत्न करून.

यशोदा– तुमच्या प्रयत्नाला यश येवो ह्मणजे झालं. पण परत जातांना उभ्याउभीं मला भेटल्याशिवाय जाऊं नका हो. (जातात.)

प्रवेश २ रा.

(**राधाबाई** व **सुशीला** बोलत बसल्या आहेत.)

सुशीला–आई लौकिकाला भिऊन मी नाहीं ह्मणतें असं नाहीं. लोक काय, त्यांना बायकांनीं शिकणंही आवडत नाहीं. ह्मणून तें का मी सोडलं आहे ?

राधाबाई–तर मग तुझा असा निश्चय होण्याचं कारण तरी काय? तुझ्यासारखीला या वयांत संसारसुखाचा वीट येणं, म्हटलं तर शक्य दिसत नाहीं. आपल्या बरोबरीच्या मैत्रिणी, कडेवर असलेल्या आपल्या बालकांचे मुके घेत आनंदानं रस्त्यांतून जातांना पाहिल्या, ह्मणजे जिच्या हृदयांत कल्होळ उडून जात नसेल, अशी तुझ्या सारखी अभागी एक तरी मुलगी दाखवतां येईल, असं कांहीं मला वाटत नाहीं.

सुशीला– आई हें तुझं ह्मणणं कांहीं खोटं नाहीं, आणि माझी स्वतांची तशी स्थिती होत नाहीं, असंही मी ह्मणत नाहीं. पण असं असूनही मला तुमच्या सगळ्यांच्या इच्छेला मान देतां येत नाहीं त्याला माझा निरुपाय आहे.

राधा०–पण तें कां ?

सुशीला:– आई तें सांगण्यापासून जर उपयोग असता, तर तें मी **सगुणाताईंनाही** नसतं का सांगितलं ?

राधा०–उपयोग असो वा नसो. तूं तें मला सांगितलंच पाहिजे.

सुशीला–आई, तुझा शब्द मोडणं माझं शील नव्हे. ह्मणून थोड-क्यांत तुला इतकंच सांगतें कीः—

पद–(' नृपममता रामावरती० ' या चालीवर)

मन वेडें जडलें जेथें। तेथुनि तें परत न फिरतें। कसें करूं। ध्रु०।
दुर्लभ ते मज हें कळतें। परि मन हें गुंतुनि रहातें। कसें करूं।
विसराया जरि त्या झटतें। विफलचि तें सारें होतें। कसें करूं।
सोडुनी। तया लागुनी। अन्यचिंतनीं। मति न मम वळते।
आहे तें बरवें गणितें। कसें करूं॥ १ ॥

राधा०–पण असं नुसतं मोघम सांगून उपयोग काय? तुझं मन कुणावर जडलं आहे, ते तुला दुर्लभ कां वाटतात, हें सगळं समजलं, ह्मणजे प्रयत्न करून पाहायला तरी जागा झाली. हें पहा, माझ्याजवळ तुला संकोच धरण्याचं कारण नाहीं.

सुशीला–आई, तुझ्याजवळ मला संकोच धरण्याचं कारण नाहीं हें खरं, पण तें सांगण्यापासून उपयोग होण्याची जर मुळीं आशा नाहीं, तर त्याची उगीच वाच्यता करीत बसण्यांत तरी अर्थ काय?

राधा०–सुशिले, तूं माझ्याशीं असे आढेवेढे घेतल्याचं आजपर्यंत माझ्या कधीं आठवणींत नाहीं. एकूण माझ्यावर तुझा विश्वास नाहीं ह्मणायचा!

सुशीला–आई, अशी भलतीच शंका तुला आली तरी कशी? पण असं तरी कशाला? तुला सगळं एकदां स्पष्ट सांगूनच टाकतें, ह्मणजे झालं. पण हें कुणाजवळ बोलायची नाहीं, असं मला तूं वचन दे आधीं. नाहीं तर भाबडेपणानं तूं **सगुणा**ताईंनाही तें सांगायचीस.

राधा०–वाटेल त्याच्याजवळ बोलायला मी वेडी का आहें?

सुशीला–तसं नाहींग. पण हें कुणाला समजलं तर तें मला मरणापेक्षांही दुःसह होणार आहे, ह्मणून तुला सुचवून ठेवलं. असो, **सगुणा**ताईंनीं मजजवळ ही लग्नाची गोष्ट प्रत्यक्ष काढल्याला जरी फार दिवस झाले नाहींत, तरी त्यापूर्वी त्यांनीं व **गोपाळराव**दादांनीं या संबंधानं माझ्या देखत अनेकदां पर्यायानं चर्चा केलेली होती; व यामुळं साहजिकच तो विचार बरेच दिवस माझ्या मनांत घोळत

होता. हें चाललं असतां माझ्या लग्नाच्यापूर्वी तुला मी जें ह्मणालें होतें कीं:— श्लोक-(कामदावृत्त).

पाहि मूर्ति ही तेथपासुनी । आस उपजली माझिया मनीं ।
हेचि सज चुडेदान देउनी । ठेविातल मला करुनियां ऋणी॥१

त्या शब्दांची एक दिवस मला अचानक आठवण झाली; आणि ते उच्चारतांना माझ्या ध्यानींमनींही नसणारा त्यांचा अर्थ माझ्या मनांत घोळूं लागला; आणि तेव्हांपासून पूर्वी मला अगदींच अपरिचित असलेली अशी कांहीं नवीनच भावना माझ्या हृदयांत उत्पन्न झाल्याचं माझ्या लक्षांत आलं, व त्यासंबंधीं मनोराज्यांत मी गर्क होऊन गेलें असतां, माझ्या मनांत अशी बळकट आशा उत्पन्न झाली कीं:—

पद–(' कधिं करिती लग्न माझें० ' या चालीवर).

प्रियमूर्ती मजसि प्रेमें ह्मणविल ती आपुली ॥ ध्रु० ॥
संकटीं । पाहुनी मला । जिच्या कळवळा । हृदयिं दाटला । दीनजनवाली । ह्मण०॥ १ ॥ विव्हला । मजसि जाणुनी । द्रवुनियां मनीं । गृहिणि ह्मणवुनी । करिल सुखशाली । ह्म० ॥२॥

परंतु भावी सुखाची ही नुसती आशाही माझ्या हतदैवाला फार दिवस पाहवली नाहीं. कारण माझा मनांत असं यायला लागून थोडे दिवस झाले नाहींत, तोंच त्यांचा आतां आमरण विधुर रहाण्याचा पक्का निर्धार झाला असल्याचं मला समजून आलं; आणि त्या दिवसापासून मीही त्यांचंच अनुकरण करण्याचा निश्चय केला आहे.

राधा०–पण त्यांचा तसा निर्धारच झाला असला, तर तो नाद मुळीं सोडून देणंच बरं नाहीं का? तूं नुसतं होय ह्मटलंस, कीं **गोपाळराव** तुझ्याकरतां चांगला देखणा, संपन्न, तुला साजेसा पती शोधून काढल्याशिवाय रहाणार नाहींत.

सुशीला–आई, लग्न ह्मणजे एक बाजार का आहे? मला समजूं लागलं नसतं, तर एक स्थळ नाहीं दुसरं, दुसरं नाहीं तर तिसरं, हें शक्य झालं असतं. पण आतां ती प्रियमूर्ती माझ्या डोळ्यांपुढं खेळत असतां, माझं मन दुसऱ्या ठिकाणीं कसं बरं जडेल? आई, प्रेम

नुसतं जड झटल्यानं जडत नाहीं, व तें बाह्य गोष्टींवरही अवलंबून नसतं. तुला मी सांगावं असं नाहीं, पण:—

पद—(' या कोणि बाली जगिं विशाली० ' या चालीवर.)

न करी धनाची प्रेम अपेक्षा तें न रमे स्वरुपांत ।
सुखविलाससेचन न बा उपजवी प्रेमांकुर हृदयांत ॥ १ ॥
नकळे अकल्पित अभिमतजनपदीं लीन कसें मन होत ।
परि जडे एकदां तिथें ध्रुवासम अढळपदातें घेत ॥ २ ॥

राधा०—या तुझ्या म्हणण्यांत अर्थ आहे, हें मलाही कबूल केलं पाहिजे. पण बाळे, आज एक तुझं मन तुझ्या स्वाधीन आहे झणून तें पुढंही तसंच राहील, असा भरंवसा नाहीं. तेव्हां तें अनावर होऊन गोदावरीसारखं—

सुशीला—आई, असं झाल्यावर मग माणसांत आणि पशूंत अंतर तें काय ? शिवाय दुसरीही एक गोष्ट तूं विसरतेस. ज्यांच्यावर हें संन्यासव्रत जुलमानं लादलेलं असतं, त्यांची झटली तर एक गोष्ट वेगळी. पण माझ्यावर या बाबतींत कुणाचा जुलूम नाहीं; इतकंच नाहीं, तर उलट मला सर्व गोष्टी अनुकूल. ज्यांच्याशीं माझं जुलमानं लग्न लागलं, त्यांना शेवटीं मला व्यर्थ नाडल्याबद्दल पश्चात्ताप होऊन, आपल्या पश्चात् मी फिरून संसारांत पडावं, झणून मरतांना त्यांनीं मला आग्रहपूर्वक सुचविलेलं; सध्याच्या स्थितींत निदान बालविधवांना तरी फिरून लग्न करण्याची मोकळीक असूं देणं फार अवश्यक आहे, अशी ज्यांची पक्की खात्री झालेली, व त्याची रूढी पाडण्याकरितां कितीही छळ झाला, तरी तो सोसायला जे अगदीं तयार, अशा गोपाळरावदादांचा व सगुणाताईचा मला आश्रय; व याकामीं तुझीही मला पूर्ण संमती; आणि इतकं असूनही, मी जर आपण होऊन आहें या स्थितींत रहायला तयार आहें, तर माझ्या हातून कांहीं भलतं सलतं होईल, ही तुझी भीती उगीचच नाहीं का ?

राधा०—बाळे, तुझं बोलणं विचाराला सोडून नाहीं हें मलाही दिसतं. तेव्हां तुला मी आतां काय बोलूं ? आपलं नष्टचर्य अजून संपलं नाहीं, हेंच खरं. असो, आतां घेतें मी तुझा निरोप. ईश्वर करो

आणि तुझीही सुबुद्धी अशीच राहो, एवढंच माझं देवाजवळ मागणं आहे. (उठते.)

सुशीला–आई चल. मीही तुला पोंचवायला येतें. पण तुझ्या मनांतली भीती अजून समूळ नाहींशी झालेली दिसत नाहीं. आई, ही तुझी सुशीला तुझ्यावर खालीं पहाण्याचा कधींही प्रसंग येऊं देणार नाहीं, याबद्दल तूं अगदीं निर्धास्त ऐस. आईः–

पद––(' जाऊं कामाला० ' या चालीवर.)

मानी वचन प्रमाण । गडे मम । मानी० ॥ ध्रु० ॥
त्या प्रियमूर्तीवांचुनि मजला जग हें बंधुसमान। जग०गडे०॥१॥
स्वप्नान्तरिंही मजविषयीं मानें भलति न शंका आण। भल०॥२॥
कधिंहि न लाविन नांवा लांच्छन कापिलि जरि कुणि मान ॥३॥

प्रवेश ३रा.

(साहेबी पोषाक केलेले स्वच्छंदराव व वेश्येच्या धर्तीवर नटलेल्या गंगाजी व राधाजी खुर्च्यांवर बसल्या आहेत. पुढें असलेल्या वाटोळ्या टेबलावर ग्लास, बाटल्या, पाव, बिस्किटें, चिरूटांची तबकडी, विड्यांचें तबक, तस्त, वगैरे पदार्थ ठेवले आहेत.)

स्वच्छंदराव–(खिशांतील घड्याळाकडे पाहून) अरे पांच तर वाजायला आले. पण ज्यांच्यामुळं आज ही गोपाळराव व पुरुषोत्तमपंत यांच्याशीं एंगेजमेंट करावी लागली, त्या दुटप्पीरावांचा तर अजून ठिकाण नाहीं! का फिरला राजेश्रींचा बेत? (इतक्यांत गोपाळराव व पुरुषोत्तमपंत येतात त्यांस पाहून) ओहो ! याचं नांव टाइमशीरपणा! यावं, (त्यांच्याशा शेकहंड करून राधाजीच्या पलीकडील दोन खुर्च्यांवर त्यांस बसवितात व आपण गंगाजीजवळ बसतात.)

गोपाळराव–(एकंदर देखावा पाहून गोंधळल्यासारखे होऊन) मला आपण कोणत्या कामाकरतां बोलावलं तें कळलं ह्मणजे बरं.

स्वच्छंदराव–सांगतोंच तें, पण चिरूट तर पेटवाल एकेक आर्धा.

गोपाळराव व पुरुषोत्तम–नाहीं. आह्माला नाहीं त्याची संवय.

स्वच्छंदराव–(नाराज झाल्याच्या स्वरानं) बरं! आपली मर्जी ! आपण सुधारक ह्मणवतां, तेव्हां आपल्याला हें अग्राह्य असेल, असं

मला वाटलं नव्हतं. (इतक्यांत दुटप्पीराव येतात त्यांस पाहून) वः खूप केलीत तुह्मी तर आज! दुटप्पीराव! अहो तुह्मी साडेचार वाजतां यायचं कबूल केलं होतंना ?

दुटप्पीराव– अहो तें खरं स्वच्छंदराव. पण वऱ्हेंत त्या बॅरिस्टरांनीं केला चहाचा आग्रह, त्यामुळं झाला थोडासा उशीर. आज त्यांच्या इथं प्यारजींचं गाणं आहे रात्रीं. आपल्याला सहकुटुंब घेऊन यायला त्यांनीं मला आग्रहपूर्वक सांगितल आहे. बरंका गंगाजी. आमच्या राधाजी तर अवश्य येतीलच. कारण गाणं आहे प्राकृत. तेव्हां त्यांना आयती तालीमच होईल ह्मणायची.

राधाजी–माझी चौकशी तुह्माला कशाला हवी आतां ? मला वाटलं तर जाईन, नाहीं तर नाहीं जायची !

गंगाजी–ठीक दिलंस उत्तर ! माणसाला ज्या गांवाला जायचं नाहीं, त्याची वाट विचारण्याचा चोंबडेपणा हवा कशाला ? पुरुष निर्लज्ज ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं.

दुटप्पीराव–अबब ! काय झणकारा हा ! पण आम्हाला तो धडा शिकवायला असले गुरु मिळूनही आह्मी पट्टशिष्य बनलों नाहीं, तर मैंदच म्हणायचे आम्हीं. पण तें राहूं दे. आज गंगाजींनीं बेत तर उडवून दिला आहे अगदीं ज्याचं नांव तें !

स्वच्छंदराव-अहो, तुमच्या केळवणाकरितां आहे हा सारा थाट !

दुटप्पीराव– असं तोंडदेखलं कां बोलतां ? राधाजींच्या केळवणाकरितां केली आहे ही स्पेशल तयारी, असं कां ह्मणाना ?

गोपाळ०– मला माफी करा. पण मी नुकत्याच केलेल्या विनंतीची आठवण देण्याची मला परवानगी असावी.

स्वच्छंदराव–वः, त्यांत माफी कशाबद्दल. मी करतोंच आतां एकदम मुख्य गोष्टीला सुरुवात. हे आमचे मित्र दुटप्पीराव दुर्दैवानं नुकतेच विधुर झाले असून, त्यांच्या मनांतून एखाद्या गतभर्तृकेला आपली सहचरी करावी असं आहे. यांना असं समजलं आहे कीं, नानासाहेब पांडुरंगे ह्मणून कोणी गृहस्थ सुमारें दोन वर्षांपूर्वी वारले, तेव्हांपासून त्यांची तरुण, देखणी पत्नी आपल्याज-

चळ असून, आपण तिला आपल्या कन्येप्रमाणं मानली आहे. आपला माझा जरी पूर्वीचा परिचय नाहीं, तथापि आपण पुनर्विवाहाचे कट्टे अभिमानी आहां, हें मी एकलेलं आहे. तेव्हां अनायासें प्राप्त झालेल्या या संधीचा आपण अवश्य फायदा घ्याल, असं जाणून मी ही आपल्याला तसदी दिली आहे.

गोपाळ–आपल्या या कळकळीबद्दल मी आपला फार आभारी आहें व आपल्या मित्रांच्या नैतिक धैर्याबद्दल त्यांचंही मी अभिनंदन करतों. पण मला दिलगिरी वाटते कीं, **नानासाहेबांच्या** पत्नीनं फिरून संसारांत पडावं, अशी जरी माझी स्वतांची मनापासून इच्छा आहे, तथापि तिची त्या गोष्टीला तयारी नाहीं. आतां आपण आमरण असेच वैधव्यदशेंत आपले दिवस काढणार, हा तिचा निश्चय कांहीं केल्या सुटत नाहीं, त्याला माझा नाइलाज आहे.

दुटप्पीराव–आपल्याला त्याबद्दल दिलगिरी वाटण्याचं प्रयोजन नाहीं. कारण मागाहून विचार करतां या भानगडींत पडणं एकंदरींत शहाणपणाचं नव्हे, असंच मला आतां वाटायला लागलं आहे.

स्वच्छंदराव–हें हो काय दुटप्पीराव! सुदैवानं ती मुलगी पुनर्विवाहाला तयार नाहीं म्हणून बरं, नाहीं तर तुम्ही मला आज तोंडघशींच पाडणार होतां ह्मणायचे!

दुटप्पीराव–तसं नव्हे हो. एखाद्या गतभर्तृकेला आपली सहचरी करण्याचा माझा विचार अजूनही कायमच आहे. पण तें असं पुनर्विवाहासारख्या प्रसिद्ध रीतीनं न करितां त्याची वाच्यता न होईल; अशा बिनबोभाट रीतीनं करणंच अधिक पोक्त विचाराचं होईल असं आतां माझं मत झालं आहे.

स्वच्छंदराव–तुमच्या या पोक्त विचाराबद्दल मला कांहीं ह्मणायचं नाहीं. पण हा जरा आधीं केला असतात, ह्मणजे यांना उगीच तसदी द्यावी लागली नसती.

गंगाजी–मी तुह्माला आधींच सांगत नव्हतें, यांच्या तुह्मी नादीं लागूं नका ह्मणून!

पुरुषोत्तम–मला वाटतं, हा आपला वाद क्षणभर एका बाजूस

ठेवून, माझ्याशीं आपलं कोणतं असं महत्वाचं काम आहे, तें आधीं कळेल तर अधिक सोईचं होईल.

स्वच्छंदराव—समजलों. ह्मणजे मग आपल्या प्लेझरमध्यें उगाच व्यत्यय नको. पण मला आपल्याकडून एका गोष्टीचा उलगडा करून घ्यायला पाहिजे आणि तो इतकाच कीं आपण जो फिरून लग्न न करण्याचा विचार ठरवला आहे, तो कुमारिकेपुरताच आहे, कीं तो पुनर्विवाहालाही लागू आहे.

पुरुषोत्तम—मला आतां मुळीं लग्नच कर्तव्य नाहीं. साधल्यास पुनर्विवाह करावा असा माझा एकदां विचार होता, पण आतां तो मी कायमचा रहित केला आहे.

स्वच्छंदराव—दॅटस् राइट्. तुमचं आमचं मत या बाबदींत अगदीं एक आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. अहो, या पुनर्विवाहित बायका झाल्या तरी त्यांची लाज, मर्यादा त्यांनां कुठं सुटते आहे? असल्या बायकांच्या जुगाखालीं मान देण्यांत हशील तें काय? असो, आतां तुह्माला तसदी कां दिली हें सांगतों. पण तें सांगण्यापूर्वीं आमच्या या गंगाजींचा थोडासा इतिहास तुह्माला सांगितला पाहिजे.

दुटप्पी०—मलाही त्या बाबतींत आज बरेच दिवस जिज्ञासा आहे.

स्वच्छंदराव—यांना दुर्दैवानं बालपणींच वैधव्य आलं. तेव्हां त्यांना किती दुःख झालं असेल, याची तुह्माला स्वानुभवावरून कल्पना होईलच. अशा स्थितींत एका रंगेल सुधारणाभक्तांना यांची करुणा येऊन त्यांनीं यांना घरांतून काढून दुसरीकडं नेल्या. प्रथम प्रथम त्यांना साहजिकच प्रिय असणाऱ्या सुरापानादिकांची गंगाजींना लज्जत माहित नसल्यामुळं यांचा त्यांचा बेबनाव होतो कीं काय, अशी भीती उत्पन्न झाली होती. पण सुदैवानं यांना लवकरच त्यांतील सुखस्वारस्य प्रत्यक्ष अनुभवानं कळूं लागल्यामुळं ती भीती टळली. तथापि दुर्दैवानं फिरून उलट खाल्ली.

दुटप्पी०—ती कां?

स्वच्छंदराव—अहो मीं तेंच सांगतों आहेना. तुमचं उगीच मध्यें घोडं कशाला? सुरादेवीचा **गंगाजीवर** जसजसा सुप्रसाद होऊं

लागला, तसतसा तो यांचा पूर्वीचा लाजाळूपणा, यांच्या त्या वेड्या समजुती, या पार नाहींशा होऊन 'आपपर जया नाहीं चैतन्य जैसें' अशा निर्विकल्प स्थितीला या जाऊन पोचल्या. पुढं साहजीकच यांची व यांच्या प्रियकराकडं येणाऱ्या सुरादेवीच्या भक्तांची अधिकाधिक दोस्ती जमत चालली. यांच्या प्रियकरांच्या हृदयांत सुधारणेचा पूर्ण प्रकाश पडला नसल्यामुळं त्यांना तें विषम वाटूं लागलं. त्यांच्या यांच्या या बाबतींत चकमकी झडूं लागल्या. शेवटीं यांना ती स्वतंत्रताहानी असह्य होऊन, त्यांतून आपली मुक्तता करून घेण्यासाठीं, यांनीं लवकरच उघडपणें बावनखणीचा आश्रय केला.

दुटप्पी०–शाबास! याचं नांव बाणेदारपणा.

स्वच्छंदराव–एक दिवस कर्मधर्मसंयोगानं यांची आमची तिथं गांठ पडून यांच्या तोंडून हा सगळा पूर्वेतिहास आह्माला समजला. तेव्हां या आपल्या सहचरी होण्यास योग्य जाणून व यांच्या स्वतंत्रतेला आमच्याकडून कोणत्याही प्रकारची अटक होणार नाहीं, असं यांना आश्वासन देऊन, आह्मी त्यांना इथं घेऊन आलों. त्यापूर्वी यांची धाकटी बहीण **राधाजी** यांच्यावरही तसाच प्रसंग ओढवून त्यांनाही त्यांनीं आपल्याजवळ आणून ठेवल्या होत्या. **गंगाजी** आमच्या इथं आल्यापासून **राधाजी**ला असं वाटूं लागलं कीं, आपल्या स्थितींत जसं एक प्रकारचं स्वातंत्र्य आहे, तसं त्यांत एक प्रकारचं पारतंत्र्यही आहे. व 'तुझ्यासारखीच माझीही सोय लागली तर पहा' असं त्यांनीं **गंगाजीनां** सुचविलं. तेव्हां **गंगाजी**च्या सांगण्यावरून **राधाजी**लाही मी आपल्या घरीं आणल्या, व त्यांची कशी सोय लावावी या विचारांत मी होतों. शोध करतां करतां, तुह्मी मोकळे असून, तुमचा आतां फिरून लग्नाच्या कटकटींत पडण्याचा विचार नाहीं व तुह्मी स्वातंत्र्याचे कट्टे अभिमानी असून अनाथ अबलांचे कनवाळू आहां, असं मला समजलं. तेव्हां तुह्मी **राधाजी**चा अवश्य स्वीकार कराल, अशा उमेदीनं आज मी ही तुह्मांला तसदी दिली आहे.

पुरुषोत्तम–मी इथं येऊन इथला हा एकंदर देखावा प्रथम माझ्या दृष्टीस पडला, तेव्हांच आपण चुकून आपल्याला न भावण्या-

सारख्या ठिकाणीं आलों आहों, हें मला कळून आलं, व त्याच वेळीं आपली रजा घ्यावी, असं माझ्या मनांत आलं होतं. पण कांहीं भिडेखातर ह्मणा व कांहीं जिज्ञासेमुळं ह्मणा, तो विचार तसाच मनांतल्या मनांत राहिला. पण तें एकाअर्थी बरंच झालं. कारण, माझे देशबांधव वास्तविक समंजस असून ते असे सुधारणाविद्वेषी कां होतात, हें जें एक मला आज बरेच दिवस गूढ होतं, त्याचा त्यामुळं बराच उलगडा झाला. तुमच्या सारखी स्वेच्छाचारी मंडळी आपल्या स्वतांला सुधारक म्हणवितांना व तुमच्या या अत्याचारांचा तुम्ही सुधारणेंत अंतर्भाव करतांना पाहून, 'जळो ही सुधारणा आणि नायनाट होवो या सुधारकांचा !' असे समाजाच्या तोंडून उद्गार निघाल्यास त्यांत आश्चर्य तें काय? मी स्वातंत्र्याचा कट्टा अभिमानी आहें व अनाथ अबलांचा उद्धार करणं हें मी आपलं कर्तव्य मानतों, याची मला लाज वाटण्याचं मुळींच कारण नाहीं. पण स्वातंत्र्य म्हणजे स्वेच्छाचार नव्हे व अनाथ अबलांचा उद्धार करणं म्हणजे त्यांना कुलटा बनवणं नव्हे. त्यांचा उद्धार करायचा तो त्या कदाचित् कुमार्गवर्ती होतील या भीतीपासून होय. अनाथ बालिकांनीं फिरून झाला तरी विवाहच करायचा आहे. ' अन्योन्यस्याव्यभिचारो भवेदामरणांतिकः। एष धर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परम्' म्हणजे :—

साकी.

जायापतिचें विवाहबंधन मृत्यु न जोंवरि तोडी ।
एकनिष्ठ व्रत कधिं न ढळावें कधिं न फुटावी जोडी ।
संक्षेपें कथिला । परमधर्म हा दंपतिला ॥ १ ॥

हा मनुप्रणीत परमधर्म पुनर्विवाहित दंपत्यांनींही कडकडीतपणें पाळला पाहिजे. आतां यापुढं कोणत्याच प्रकारचं लग्न न करण्याचा जो माझा निश्चय झाला आहे, त्याचं कारण, असले स्वेच्छाचार मनसोक्त करतां यावे, हें नव्हे. हे स्वेच्छाचार, हीं सुरापानादि व्यसनं, हे सर्व आमच्या संक्रमणावस्थेचे परिणाम होत. यांचं आर्यावर्तांत कायमचं ठाणं बसेल, अशी मला मुळींच भीती नाहीं. आह्मी त्यांतून लवकरच मुक्त होऊं असा मला पूर्ण भरंवसा आहे. तसं होईपर्यंत

तुमच्यासारख्या उल्लूंना व तुमचं वर्तन पाहून सऱ्या सुधारणे-विषयींही साशंकवृत्ती असणाऱ्या माझ्या देशबांधवांना, कविकुलगुरु कालिदास याच्या प्रसिद्ध उक्तीची आठवण देऊन, मी असंच म्हणत राहीन कीं,:—

पद ('तरुण कुलिन गोरा०' या चालीवर)

ग्राह्य सर्व कांहीं। जुने वा। नविनहि वा नाहीं।
परि तयामधुनि घे दिसे योग्य जें तेंचि गुणग्राही॥ ध्रु०॥
भाळुनी जुन्याला तेंचि धरुनि जो बसे।
जो नवें ह्मणुनिया निंद्यहि प्रिय गणितसे।
मूढता तयांच्या पदरिं तुल्य येतसे।
दोषरहित नाहीं। जुनें वा। नविन असो तेंहि॥ १॥ परि०

स्वच्छंद०—अहो तुमचं हें व्याख्यान आतां पुरे. तें ऐकायला आम्ही नाहीं तुम्हाला इथं बोलावलं. तुह्मी आपल्याला सुधारक म्हणवतां, हें ऐकून आम्ही फसलों. तुमच्यापेक्षां हे आमचे दुटप्पीरावच पुष्कळ बरे. यांचे हे वरचे भस्माचे पट्टे जरी अजून सुटले नाहींत, तरी पण यांचं अंतर्याम तुमच्यापेक्षां किती तरी निर्विकल्प झालं आहे! यावं आतां. आपल्याला विनाकारण तसदी पडली!

गोपाळ०—तुमच्याशीं वाद घालण्यांत अर्थ नाहीं, हें मला दिसतंच आहे. तथापि हा आपला नवीनच घेतलेला पेशा सोडून एकाच कोणा गृहस्थाचा आपल्याला आसरा मिळाला तर पहावा, असं जें या अभागी तरुणीला वाटायला लागलं आहे, तें तिच्यांत झालेल्या विवेकजागृतीचंच दर्शक होय, असं मी समजतों; व जातां जातां तिला इतकंच सुचवून ठेवतों कीं:—

दिंडी.

घडुनि उपरति जरि हिजसि दैवयोगें।
वीट पापाचा येइ पुढें मागें॥
भगिनि मानुनिया करिन शक्य जें जें।
साह्य तें तें कर्तव्य गणुनि माझें॥ १॥

(गोपाळराव व पुरुषोत्तम जातात.)

स्वच्छंद०–वः दुटप्पीराव! खूप सुधारक हुडकून काढलेत बुवा! पोलादी फणीनं आपले केस विंचरून घेणाऱ्या बायांतसुद्धां आम्हाला कुणी इतक्या सोवळ्या आढळल्या नाहींत! अहो, असं हें एकांत स्थळ, या टेबलावरचा तोंडाला पाणी सोडणारा हा देखावा, आमच्या या गंगाजी व राधाजी सारख्यांचे मनाला घायाळ करून टाकणारे हे अंगविक्षेप, हीं सर्व पाहून एखादा शुक्राचार्यही गडबडून गेला असता. पण हे वेडेपीर पहावं तों आपले समुद्रांतून कोरडे गेले! पण जाईनात! त्यांच्या नशीबीं नाहीं या अमृताचा स्वाद घेण्याचं, इतकंच. आपणच झोंकूं या त्यांच्या नांवानं दोन ग्लास अधिक, झालं! सोडा आतां तो पडदा खालीं. या झगझगीत प्रकाशापेक्षां त्याच्या आडच या रंगाला अधिक खुलाई चढते!

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

रामशास्त्री–(आपल्याशीं) एकुण ईश्वराचा माझ्यावरचा कोप अजून शांत झाला नाहीं, हेंच खरं. नाहीं तर इतक्या दुःखपरंपरेनंतर, माझ्या त्या साध्वी भार्येनं मरतां मरतां उच्चारलेल्या त्या हृदयद्रावक शब्दांनीं माझे डोळे उघडले असून, माझी अशी निराशा झाली नसती. नानासाहेबासारख्या वृद्धाशीं आणि तेंही सिंहस्थांत मुहूर्त काढून मी जें सुशिलेचं लग्न लावलं, तितकं तरी तिला आपली सून करणं सचित अधर्माचं नाहीं, अशी माझी खात्री झाली असून, पहातों तों सुशिलाच मुळीं आतां फिरून लग्न करायला तयार नाहीं! आणि त्यामुळं, आतां आपण आमरण विधुरदशेंतच रहाणार, हा पुरुषोत्तमाचा निर्धारही उलट अधीकच दृढ होऊन गेला! बरं पुढंही, साधल्यास हरभट व राधाबाई यांच्याकडून तरी सुशिलेची या कामीं अनुकूलता मिळविण्याची खटपट करून पहावी, असं मनांत योजून मी त्यांची गांठ घेण्याचा विचार मनांत आणतों, तोंच त्या बिचाऱ्या त्रिवेणीसंबंधाची ती दुर्वार्ता माझ्या कानीं कां यावी? शिव! शिव! त्रिवेणी तूं त्या देवळी निद्रा आणि पाठीवर बिऱ्हाड, अशा रामदाश्याच्या

नादीं लागून अशी फशी पडण्यापेक्षां, फिरून लग्नच केलं असतंस, तर तें बरं झालं नसतं का? पण तुला त्याबद्दल दोष द्यायला मला आधीं तोंड कुठं आहे! तूं सकेशा असल्यामुळं तुला कुणी कदाचित् पुनर्विवाहाची भर देईल व त्यामुळं आपल्या कुळाला डाग लागेल, या भीतीनं भाऊसाहेब शशिकलेशीं लग्न करायला कचरत आहेत असं पाहून, मीच इरपटांच्या मागं लागून तुला सोवळी करवली नाहीं काय? भाऊसाहेब! तुमच्या गोदावरीच्या शोकानं त्यावेळीं लागलाच तुमचा अंत झाला नसता, तर आपल्या अविचारी धर्म-प्रेमाची ही पुनरावृत्ति पाहून तुमच्या मनाची काय स्थिति झाली असती? हा अविचारी धर्मप्रेमा! आजपर्यंत गोदावरीत्रिवेणी-सारख्या दुर्दैवी बालिकांचे तूं जे असंख्य बळी घेतले आहेस, तित-क्यांनीं तुझी तृप्ती झाली नाहीं काय? तुझ्या मनांतून आणखी असे किती बळी घ्यायचे आहेत? पण अविचारी धर्मप्रेम म्हणजे कांहीं कुणी व्यक्ती नव्हे, तेव्हां त्याला व्यर्थ दोष देण्यांत अर्थ काय? त्या प्रेमानं अंध झालेल्या लोकांचे डोळे उघडतील, तेव्हां खरं. पण ते तरी उघडणार कसे? माझ्यासारखे शास्त्रीपंडितही केवळ स्वार्थाचे गुलाम बनून, जर खुशाल शास्त्राला अशास्त्र व अशास्त्राला शास्त्र ठरवून लोकछंदानुवर्ती होतात, तर लोकांची तरी या वेड्या रूढ समजुतींतून मुक्तता व्हावी कशी? असं करण्यापेक्षां 'सत्यान्नास्ति परो धर्मः' या सूक्ताचा आश्रय करून, खोट्या लोकप्रियतेचा लोभ दूर सारून, आह्मी जर लोकांना योग्य मार्ग दाखविला असता, तर त्या कृपाघन परमेश्वरानं आमचा योगक्षेम आतांहीपेक्षां अधिक चांगल्या रीतीनं चालवला असता, व लोकांनाही खरा धर्म कळून ही अनर्थपरंपरा सहज बंद झाली असती. असो, शशिकलेला आपली सून करण्याचा माझा मनोरथ जरी मला आतां शेवटास नेतां येत नाहीं, तथापि तेवढ्यानंच निराश होऊन मी जर स्वस्थ बसलों, तर माझ्या हृदयांत पडलेल्या या प्रकाशाचा उपयोग काय? सांप्रत घडत असलेल्या अनर्थपरंपरेचीं उघडउघड कारणं दोन. एक वाटेल त्या वयांत विधुराला फिरून लग्न करण्याची रूढीनं ठेवलेली मोकळीक

व दुसरं, संसाराचा अल्पही अनुभव घडण्यापूर्वीच ज्यांच्यावर वैधव्याचा दारुण प्रसंग येऊन गुदरतो, त्यांनाही फिरून संसारांत पडण्याची असलेली बंदी. तेव्हां शास्त्रीपंडितांची अनुकूलता संपादन करून हे दोनही अन्याय दूर करण्यासंबंधानं सर्व ब्रह्मवृंदाकडून श्रीशंकराचार्यांना विज्ञप्ती करण्याचा प्रयत्न केला, तर तो व्यर्थ होईल, असं मला वाटत नाहीं. करतां आतां त्याच उद्योगाला लागावं हें बरं. (जातो.)

प्रवेश ५ वा.

रामदासी–(आपल्याशीं) 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये' ह्मणतात तें खोटं नाहीं. माझीच गोष्ट पहाना:–

पद–('राधाधर मधु मिलिंद ०' या चालीवर)

भगव्या वेषा भुलून हरहर। जाति कितिक नर फसून।
'श्रीरघुवीर समर्थ' मि ह्मणतां। वंदिति मजसी नमून ॥ध्रु०
नवस जननिचा स्मरून। जहालों। ब्रह्मचारि परि फिरून।
विषयाच्या भार भरून फसविलि। बाला मीं मन हरून॥१॥

मुलं जगेनात, ह्मणून आईनं केलेल्या नवसाप्रमाणं हा दासपंथ स्वीकारून मी ब्रह्मचर्य व्रत घेतलं; पण तें खरं ब्रह्मचर्य नव्हतं, मारून मुटकून अंगीं आणलेलं तें! थोडे दिवस झाले नाहींत, तोंच पहातों तों, तीं तीं इंद्रियं त्या त्या सुखाला फिरून लुब्ध होऊं लागलीं. भगवीच कफनी, भगव्याच छाट्या, पण त्यांची गुलाबी झांक कायम कशी राहील, इकडं मन वेधूं लागलं. अशा प्रकारें विषयेच्छा बळावत जातां जातां, शेवटीं मी तिचा केवळ गुलाम बनून, त्या निष्पाप तरुणीला भुरळ घालून भ्रष्ट केली! आणि तेवढ्यानंच जणुं माझ्या पापाचा घडा पूर्ण भरला नाहीं, असं वाटून, त्यांत मी आणखी बालहत्या व स्त्रीहत्या यांची भर घातली! हरहर! माझ्यासारखा नीच अधम दुसरा कोणी असेल काय? किती तरी निंद्य माझं आचरण हें!:–

पद–('माझें हृदय पोळत ०' या चालीवर)

मी त्यजुनि सुमति, केलि कृती, घोर अती, जाळि ती मला।
हत्याद्वय, करुनि हाय, मिळवि काय, नरक जवळि केला ॥ध्रु०

(चाल) उषदेशामिषें फसवुनि तिज नादिं लावियेलें ।
ती काम्य गमे तंवर तिला प्रेम दावियेलें ।
परि गरज सरे तेंवि पहा दूर लोटियेलें ।
गर्भ पोटिं, ती एकटि, या संकटिं, त्यजिलि मरायाला ॥ १ ॥

त्रिवेणी ! मी तुला तशा अडचणींत एकटी सोडून जर यःपलाय केलं नसतं, तर तुझ्या हातून ती बालहत्या तरी कां झाली असती, आणि तुझ्या प्राणावर तरी पारी येऊन कां बेतली असती ! तुझ्या त्या लोभी बापानं तुला प्रथम वैधव्यकूपांत लोटून दिली ती दिली, पण पुढं तरी डोळे उघडून, तुझं बालवय मनांत आणून, त्यानं फिरून तुझं लग्न केलं असतं, तर मज दुष्टाच्या हातून तुझी अशी विटंबना कां झाली असती ? अथवा मी हा ब्रह्मचर्याचा घातलेला आव लटका आहे, असं दिसून येतांच, गृहस्थाश्रमाचा स्वीकार करून, उघडपणें तुझं पाणिग्रहण केलं असतं, तर तुझ्यावर असा प्रसंग तरी कां आला असता ? शिवशिव ! आजपर्यंत मजसारख्या नराधमांनीं, आपण अगदीं नामानिराळे राहून, अशा किती तरी दीन गाई नाडल्या असतील ! पण आतां या कोरड्या पश्चात्तापाचा मला काय उपयोग ? या लोकीं जर खरा न्याय असता, तर मी न्यायाधिशाकडं जाऊन, त्रिवेणीच्या हातून घडलेल्या बालहत्येला मीच सर्वस्वी कसा कारण आहें, हें त्याला कळवलं असतं व तिच्या जागीं आपल्यालाच फाशीं देण्याबद्दल त्याला विनवलं असतं; पण तें शक्य नाहीं. तथापि देवाच्या न्यायी राज्यांत ज्या शासनाला मी खचित पात्र ठरलों असतों, तें शासन न्यायाधीश आपल्याला करीत नाहीं, एवढ्याच सबबीवर टाळणं हें खचित नामर्दपणाचं होणार आहे. करतां तें शासन आपल्या हातांनीं स्वतांला करून घेऊन, तुझ्या दुःखाचा वाटेकरी होण्यास मीं तयार आहें, इतकं तरी त्रिवेणी फाशीं जाण्यापूर्वी तिला कळवितां येईल, तर ही मनाची जाचणी थोडी तरी कमी होईल, अशी मला आशा वाटते. करितां न्यायाधिशाची गांठ घेऊन, तिची भेट घेण्याची परवानगी मिळविण्याची साधल्यास खटपट करून पहावी. (जातो.)

प्रवेश ६ वा.

(स्थळ तुरुंग. त्रिवेणी आपल्या कोठडींत उदास होऊन बसली आहे.)

त्रिवेणी-(आपल्याशीं) शेवटीं एकदांचा, माझ्या मृत्युलोकच्या यातनांचा अस्त करणारा हा दिवस उगवला! आतां एक दोन तासांतच या पापिणीच्या दुःसह भारापासून धरणी-मातेची सुटका होईल. काल त्या ह्यातार्‍या शिपायाला माझा कळवळा येऊन त्यानं मला देवाची प्रार्थना कर, आणि कृतकर्माबद्दल त्याची क्षमा माग, ह्मणजे हा अंतकाल तुला फार दुःसह होणार नाहीं, ह्मणून मोठ्या कळकळीनं सांगितलं. त्याप्रमाणं सार्‍या रात्र-भर तसं करण्याचा मी अनेकदां प्रयत्न करून पाहिला. पण व्यर्थ! माझ्या पापाबद्दल ईश्वराची क्षमा मागण्याचं मला कसं तें धैर्यच होत नाहीं, काय करूं ?

पद-('मन माझें भडकुनी गेलें०' या चालीवर)

निजहातें पाडस अपुलें, वधिलें, लौकिका भ्यालें।
नाहिं कुळींही भय देवाचें मनिं या मी आणिलें ॥ ध्रु० ॥
कशि देवा तुजला विनवूं, अळवूं, मजसि हें नकळे।
क्षमा करी मज ऐसें वदण्या जिव्हा ही न वळे ॥१॥ निजहातें०

तेव्हां आतां ती व्यर्थ खटपट सोडून देऊन, मरणाच्या बोलावण्याची वाट पहात बसावं झालं !

शिपाई-(प्रवेश करून) बाई, बाहेर कोणी गृहस्थ आला आहे, त्याच्या मनांतून तुह्माला भेटायचं आहे.

त्रिवेणी-(आपल्याशीं) माझी यावेळीं गांठ घेणारा हा कोण ? (मोठ्यानं) त्यांनीं आपलं नांवगांव कांहीं सांगितलं आहेका ?

शिपाई- नाहीं. पण त्यांच्या वेषावरून ते कोणी बोवा असावेत, असं वाटतं.

त्रिवेणी- (उद्वेग व आश्चर्य वाटून) बोवा आणि मला भेटूं इच्छि-तात, मग तें दुसरें कोण असणार ? पण काय हेतूनं ते आले असावे बरं ? पण मरतां मरतां मी त्यांचं तरी मन कशाला खट्टू करूं ? (शिपायास) शिपाईबोवा, येऊंद्या त्यांना. माझी कांहीं हरकत नाहीं.

(शिपाई रामदास्यास घेऊन येतो.)

शिपाई– बोवा, तुह्माला काय बोलायचं असेल, तें इथं उभं राहून बोला; आणि तेंही लवकर आटपा. कारण ठरलेल्या मुदतीपेक्षां अधिक वेळ तुम्हाला इथं राहूं देण्याची मला परवानगी नाहीं. (जातो.)

रामदासी– त्रिवेणी! हर ! हर ! काय तुझी हृदयद्रावक स्थिती ही ! आणि ती होण्याला मी दुष्टच सर्वथा कारण झालों ! हाय ! हाय! तुला पाहून यावेळीं माझ्या मनाची जी स्थिती झाली आहे, तशी एखाद्या प्रचंड वादळानं खवळलेल्या समुद्राचीही होत नसेल ! तुझंही अंतःकरण मला पाहून, संताप, द्वेष, तिरस्कार, इत्यादि उद्वेगकारी मनोवृत्तींनीं अगदीं क्षुब्ध होऊन गेलं असलं पाहिजे ! पण त्याच्या शमनाला एकच जो मार्ग, तो जर शक्य असता, तर तुझ्या जागीं मलाच फाशीं देण्याबद्दल मी न्यायाधिशाची विनंती केली असती; व मग कदाचित् माझ्या इतर अपराधांबद्दल तुझी क्षमा मागायला मला थोडा तरी धीर आला असता. पण काय करूं ? तें तर मुळींच शक्य नाहीं. तेव्हांः—

पद–('तुज दिलें दुःख मी०' या चालीवर)

जा अतां सर्व विसरोनी । हेंहि न मज वदवे वदनीं ।
तूं संकटिं एकटि असुनी । गेलों मी तुजला त्यजुनी ।
जनिं निंदा व्हावि न ह्मणुनी । तुज नाडोनी । टाकिलिग रानीं।
अधमाहुनि अधम बनोनी ॥१॥ जा० ॥

त्रिवेणी–पण ही तुमची वेड्यासारखी विनंती त्या न्यायाधिशानं मान्य करावी तरी कशी ? अपराध केला मी, आणि त्याबद्दल फाशीं तुम्हांला ? याला कुणी झालं तरी वेडच ह्मणणार !

रामदासी–त्रिवेणी, मला वेड लागलं आहे, असं का तूं समजतेस ? छेग छे ! तसं झालं असतं तर मग आणखी काय पाहिजे होतं ! पण माझी ती विनंती मुळींच वेड्यासारखी झाली नसती. अपराध एकाचा आणि शिक्षा दुसऱ्याला, हाच धडधडीत अन्याय आहे. तूं प्रथम केवळ निष्पाप असून, नाहीं नाहीं त्या निंद्य मार्गांचा अवलंब करून मी तुला जाळ्यांत धरिली, व शेवटीं अडचणीचा

प्रसंग येतांच तुला एकटी टाकून, करूनसवरून नामानिराळा होण्यास नीचपणें प्रवृत्त झालों, हें जर खरं आहे, तर त्याबद्दलचं शासन मलाच व्हावं हेंच योग्य नाहीं का ?

त्रिवेणी–पण असं पाहायला गेलं तर प्रत्येक अपराधाचा धागा किती तरी लांब नेतां येईल !

रामदासी–आणि तो नेतां येईल तितका दूर नेऊन, त्यावरून अपराधाचा कमीअधिकपणा ठरवणं, हें तर न्यायाधिशाचं मुख्य कर्तव्य आहे. एखाद्या माणसाला कैफ देऊन, त्याचं वर्तन शुद्धीवर असणाऱ्या माणसाप्रमाणं होत नाहीं, ह्मणून जर त्याला कुणी शासन करूं लागेल, तर तें योग्य ह्मणतां येईल काय ? नाहीं; आणि तोच न्याय या ठिकाणींही लागू केला पाहिजे. कारण कीं,

पद– (' भूपती खरे ते वैभव सुख भोगीती ' या चालीवर)

घालिना मुलाला जेवूं घरिं जरि आइ । घरीं० ।
गांवांत भीकही वाप न मागूं देई ।
राहिला तयाला मार्ग न दुसरा कांहिं । दूसरा० ।
सहजींच चोरिची दीक्षा तो मग घेई ।
(चाल) स्थिति तशी बालविधवेची । होतसे ।
वासना प्रबल विषयाची । मनिं वसे ।
लग्नास अटक जनतेची । परि असे ।
त्यांतही अधम नर विपथीं जरि तिज नेइ । जरी० ।
शिक्षेस पात्र ती नकळे कैशी होई ॥ १ ॥

नवरा मेला कीं विषयवासना नष्ट व्हावी, अशी देवही योजना करीत नाहीं, आणि लोक तर विधवांना फिरून लग्न करूं देत नाहींत. अशा स्थितींत केवळ पुरुषांच्या फुसलावणीनं नाडल्या जाणाऱ्या दुर्दैवी अबला वास्तविक अपराधी, कीं आपली विषयेच्छा तृप्त करण्याला उघड उघड उकिरडे फुंकण्याचीही ज्यांना समाजाकडून पूर्ण मुभा आहे, असे जे विषयलोलुप पशू त्यांना भ्रष्ट करतात, ते वास्तविक खरे अपराधी, हें न्यायाधिशांनीं पहायला नको का ?

त्रिवेणी–माझ्यासारख्यांचं वांकड्या मार्गांत पाऊल पाडण्याला

पुरुषच वास्तविक कारण होतात, हें तुमचं ह्मणणं जरी खोटं नाहीं, तरी पण वाकडं पाऊल तें वाकडंच. तें कारण असून पडो, वा नसून पडो, त्याला शासन हें व्हायचंच. आणि माझं नुसतं वाकडं पाऊल पडलं, इतकंच नाहीं, तर :—

अंजनीगीत.

असुनि पोटिचा ओला गोळा । जी मी सजलें तद्घाताला ।
मानिल त्या मज चांडाळिणिला । कोण निरपराधी ॥ १ ॥

सत्यदासी–त्रिवेणी ! तुझा प्रत्येक शब्द तुझं अंतःकरण पश्चात्तापानं कसं विव्हल होऊन गेलं आहे, याची जरी पूर्ण साक्ष पटवीत आहे, तरी त्यावरून खरी अपराधी तूं आहेस, असं सिद्ध न होतां, उलट माझ्या नीचतेचा अंतर्बाह्य काळेपणा मात्र माझ्या स्पष्ट निदर्शनाला येत आहे. तुझ्या हातून घडलेलं कृत्य अत्यंत निर्दयपणाचं होतं हें मला कबूल आहे. पण तुझ्या मातृप्रेमावर लोकलज्जेचा जबरदस्त पगडा बसला नसता, तर तें करण्यास तूं कधींही प्रवृत्त झाली नसतीस. ही लोकलाज किती कठीण आहे पहाः—

पद–(' ये काल कसा विपरीत० ' या चालीवर)

भ्रमवी न भयें जनलाज जया । नरवीर असा जगतांत न या । ध्रु०
जानकि मूर्ती पतिनिष्ठेची असुनि रामही त्यजुनि दया ।
वनिं टाकाया एकलि तिजला सजला भिउनी लोकभया ॥१॥

मग तुझ्या हातून लौकिकाच्या भीतीनं तें घडलं यांत नवल तें काय ? तेव्हां तुझ्यासारख्या फसलेल्या स्त्रिया या दोषाला जरी नांवाला कारण असल्या, तथापि त्या निरपराधी बालकांची हत्या करणारे खरे चांडाळ वास्तविक माझ्यासारखे नीच पुरुषच होत, यांत तिलप्राय संशय नाहीं. अशा हत्या प्रत्यक्ष त्यांच्या हातून घडत नाहींत खऱ्या, पण त्याचं कारण इतकंच कीं:—

दिंडी.

गर्भ पुरुषाच्या पोटिं कधिं न राही ।
ह्मणुनि हत्याही पुरुष करित नाहीं ।

उलट असता जरि नियम सृष्टिचाही ।
फाशिं जाते शेंकडो पुरुष तेही ।

आणि हें जर अगदीं उघड आहे, तर अशा हत्यांबद्दल स्त्रियांना दोषी ठरवून देहान्त शिक्षा देणं, ह्मणजे स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या प्रसूतिवेदनांच्या सृष्टिकृत अपरिहार्य विषमतेंत आणखी अन्यायाची भर घालणं नव्हे का ?

त्रिवेणी—एकूण माझ्यासारख्या दुष्ट स्त्रियांना अगदीं धुतल्या तांदुळासारख्या निर्मळ समजून सोडून द्याव्या, असाच तुमच्या ह्मणण्याचा अर्थ दिसतो ! या लोकची गोष्ट आतां राहो, पण परलोकीं तरी देव माझ्या सारखीला निष्पाप मानील असं का तुम्हाला वाटतं ? छे हो !

पद–(' प्रियकर माझे भ्राते० ' या चालीवर)

पोळुनि जाई चुकुनिहि पडलें पाउल जरि अग्नीवरती ।
ईशनियम हा स्मरुनि विचारी पापविमुख व्हाया झटती ॥ ध्रु.॥
॥ चाल ॥ परि हें विसरुनि मि गेलें ।
अमुनिहि डोळे ते मिटिले ।
पातक घोर मि आचरिलें ।
कुठुनि टळे मग मज पापिणिची मेल्यावरची नरकगती ॥ १ ॥

माझा मार्ग अनेक मोहांनीं भरलेला होता, हें खरं. पण देवानं दिलेल्या बुद्धीचा उपयोग करून त्यावर जर मी जय मिळविला असता, तरच देवानं मला मनुष्यजन्म दिल्याचं सार्थक झालं असतं. पण त्या बुद्धीचा उपयोग न करतां, मी आपल्या अधोगतीचा मार्ग आपल्याच हातांनीं तयार केला. तेव्हां त्याबद्दल मला शासन घडावं, हें योग्यच आहे. आणि तो न्यायी परमेश्वर तें केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं.

रामदासी—झालेल्या गोष्टींत तुझा अगदींच अपराध नाहीं, असं मी ह्मणत नाहीं, व त्याबद्दल देव तुला अल्पस्वल्प शासन करील, हें तुझं ह्मणणं जरी खरं असलं, तथापि त्याच्या न्यायी राज्यांत खरा व मुख्य अपराधी मीच ठरेन, यांत संशय नाहीं. इतकंच नव्हे, तर निवळ

स्वार्थसाधुपणामुळं ह्मणा, अथवा खोट्याच धर्मकल्पनांनीं ग्रस्त झाल्यामुळं ह्मणा, पण पाउणशें वर्षांच्या थेरड्यालाही पुनर्विवाहाची मोकळीक ठेवून, आठ दहा वर्षांच्या बालविधवेसही जन्माची संन्यासी करून टाकण्यांत जो भयंकर जुलूम होत आहे, तो दूर करण्यास धैर्यानं पुढं न येतां, तिचं वाकड्या मार्गांत पाऊल पाडण्यास अप्रत्यक्ष कारण होणारा हा सारा पुरुषसमाज, व अपराध घडूं न देण्यास अवश्य ते उपाय योजण्याचं आपलं मुख्य कर्तव्य विसरून जाऊन, तुजसारख्या दीन गाईस शिक्षा देण्याचा आपला अधिकार गाजवण्यांतच आपली इतिकर्तव्यता मानणारे हे न्यायाधीश, या सर्वांसही, त्यांच्या त्यांच्या आगळिकीप्रमाणं, अल्यावरच नव्हे, तर या लोकींही योग्य शासन केल्याशिवाय तो न्यायी भगवान् कधींही रहाणार नाहीं. असो, पण आतां या सर्व गोष्टींचा विचार केवळ अस्थानीं आहे. शिवाय माझी मुदतही बहुतेक भरत आली. करितां जी गोष्ट तुला मुख्यतः कळविण्यासाठीं मी आतां मुद्दाम तुझी गांठ घेतली, ती कळवून मी तुझा शेवटचा निरोप घेतों! तुझ्या जागीं मी फाशीं जाणं शक्य असतं, तर तुझ्या हत्येचं तरी पाप आणखी माझ्या माथीं बसलं नसतं. पण त्याबद्दल आतां बोलून काय फळ? तथापि तुझ्या पापाबद्दलचं अल्पस्वल्प प्रायश्चित्त तुला देवाच्या घरीं होत असतां मी इथं असा स्वस्थ बसून रहाणं हें अत्यंत अधमपणाचं होणार आहे. करतां तुझ्याबरोबर आपल्या पापाचा मुख्य वाटा उचलण्यास तुझ्या मागोमाग येण्याचा मीं निश्चय केला आहे, हें तुला कळवावं, येवढ्याकरतांच मी यावेळीं तुझी गांठ घेतली.

त्रिवेणी–छे! छे! हा तुमचा निश्चय किती तरी वेडेपणाचा आहे! अहो!:–

पद–('दृष्टिभरे जलभारे०' या चालीवर)

न करा अविचारातें। हातें। शरिरातें। वधितां तें।
मनुजातें नरकीं नेतें। ध्रु०॥
विफल नका करुं या नरजन्मा, दीर्घप्रयासें प्राणी लाहे त्यातें१
सत्कारणीं त्या जरि लावियलें, तरि नर पावे अजरामर कीर्तीतें२

माझ्या दुःखाबद्दल तुमचं आतडं कळवळतं, हें जर खरं आहे, तर माझ्या या शेवटच्या विनंतीला मान देऊन, तुह्मी हा वेडा निश्चय आधीं सोडून द्या, आणि हा सोन्यासारखा मनुष्यदेह जेणेंकरून सत्कार्यीं लागेल, असं कांहीं हातून झालं तर पहा. माझ्या मनांतून तुह्माला एक गोष्ट सुचवावी असं आहे, व ती जर तुम्हांला मान्य होईल, तर मला जीवदान देण्यापेक्षांही तुमचे मजवर अधिक उपकार झाले, असं मी समजेन.

रामदासी– तुझ्या मनांतून मला काय सुचवायचं आहे, तें तर मला आधीं कळूंदे.

त्रिवेणी– माझी चवकशी सुरू होण्यापूर्वीं, मी तुरुंगांत आपल्या एकंदर आयुष्यक्रमाचा विचार करीत बसलें असतां, जरी मला जीवदान मिळेल अशी आशा नव्हती, तरी मी आपल्या मनोराज्यांत गर्क होऊन, एकदां मनांत असा निश्चय केला होता, कीं यदाकदाचित् आपल्याला जीवदान मिळालं, तर मजसारख्या अनाथस्त्रियांची सध्याच्या दुःस्थितींतून मुक्तता करण्याच्या प्रयत्नांत मी आपलं राहिलेलं आयुष्य खर्च करीन. मी आपल्या देशबंधूंपुढें उभी राहून, पदर पसरून त्यांना ह्मणेन कीं, “तुह्मी मज पापिणीचा करतां येईल तितका तिरस्कार करा, परंतु माझ्या अनाथ बालभगिनींची तरी माझ्यासारखीच अशी पुढं विटंबना होऊं नये, म्हणून कांहीं तरी उपायांची योजना करा. दुसरं कांहीं तुमच्या हातून होत नसलं, तर निदान सती जाण्याची पूर्वींची चाल फिरून सुरू करून, मजसारख्या अनाथ बालविधवांना, त्यांच्या नवऱ्याच्या चितेवर जिवंत जाळण्याचं पुण्य तरी गांठीं बांधा ! ह्मणजे एका घावासरसा आमच्या सर्व यातनांचा शेवट होऊन, आमची ही अशी इहलोकींही छीः थूः होणार नाहीं, व पुढचाही आमचा नरकवास टळेल. ही विनंती मजसारख्या निंद्य पापिणीच्या मुखावाटे होत आहे, एवढ्याचकरितां तिचा अव्हेर करूं नका. वास्तविक ही प्रार्थना मी करीत नसून, स्त्रीजातीला लज्जेनं खालीं मान घालण्यास लावणारी ही माझी विटंबना पाहून, घाबरून जाऊन, आपल्या लेकी, आपल्या सुना, आपल्या बहिणी, आपल्या भावजयी,

या सर्व आपल्या पायांवर लोटांगण घालून 'बाप हो! या नरककुंडांत आह्मांस पडूं देऊं नका! धावा हो धावा! आणि कसंही करून यापासून आमचं रक्षण करा!' ह्मणून दीनवदनानं धाय मोकलून आपणापुढं काकुळती येत आहेत, असें समजा. महाराज! मज पापिणीचा तुम्ही वाटेल तितका धिःकार करा, पण या निष्पाप, निष्कलंक निरपराधी, शुद्ध अर्भकांच्या पवित्र विनंतीला पराङ्मुख होऊं नका. तुमच्याशिवाय त्यांना कोणी त्राता नाहीं! तुम्हीच त्यांचे वाली! करितां त्यांना झिडकारून देऊं नका! त्यांची हीन दीन स्थिती पाहून तुमच्या अंतःकरणास कळवळा येऊं द्या व त्यांना आश्वासन देऊन, तुम्ही त्यांना वर उचलून पोटाशीं धरा, इतकी माझी आपणास हात जोडून विनंती आहे." अशा रीतीनं माझ्या देशबांधवांची करुणा भाकण्याचा जो हेतु मी मनांत योजला होता, तो आतां अर्थात् जागच्या जागींच रहाणार! करतां तो शेवटास नेण्याची ईश्वर जर आपणास सुबुद्धी देईल, तर आपले मजवर अनंत उपकार होतील.

रामदासी—त्रिवेणी! आपल्या दीन अनाथ भगिनींच्या अत्यंत कष्टमय स्थितीचं हें जें तूं हृदयद्रावक वर्णन केलंस, तें ऐकून पाषाणालाही पाझर फुटल्यावांचून राहणार नाहीं! असं असून, माझ्या देशबांधवांना या दीन गायींची करुणा येत नाहीं, ही खरोखर फार खेदाची गोष्ट होय. तथापि ते स्वभावतः निर्दय नाहींत, त्यांच्यापुढं त्यांच्या या सर्वतोपरी गांजलेल्या विपन्न भगिनींची करुणास्पद स्थिती फिरून फिरून मांडण्याचा यत्न केला, तर त्यांचीं सदय हृदयं द्रवल्याशिवाय खचित रहाणार नाहींत, असा मला पूर्ण भरंवसा आहे. करतां मी प्रथम मनांत योजल्याप्रमाणं प्राणत्याग करून, माझ्या मनाला सध्या जी कृतकर्माची टोंचणी लागून राहिली आहे, त्यांतून आपली मुक्तता करून घेण्यापेक्षां, प्रसंगीं लोकांचा छळ सोसावा लागला तरी तो सोसून, माझ्या अनाथ बालभगिनींची त्यांच्या सांप्रतच्या दुःस्थितींतून मुक्तता करण्यासाठीं, माझ्या देशबांधवांचं मन वळवण्याच्या कामीं आपलं राहिलेलं आयुष्य खर्च करणं,

हेंच योग्य होय, असं मलाही विचाराअंतीं वाटतं; व शिवाय तुझी तशी इच्छा आहे, या दृष्टीनं तर तें माझं अवश्य कर्तव्य होय, असं मी समजतों. करतां आपण योजलेला हेतु मनांतल्या मनांतच राहिला, या दुःखद विचारानं आधींच दुःखमय असणारा आपला अंतकाल तूं अधिक उद्वेगकारी होऊं देऊं नकोस. तुझी इच्छा शेवटास नेण्याचा मी अवश्य यत्न करीन याबद्दल तूं आतां अगदीं निर्धास्त ऐस. पाहिजे तरः–

पद–('राग बिभास, ताल त्रिताल.')

घेइ त्रिवेणी मम वचनाला ।

पहा साक्षि हा उगवे दिनमणि उदयगिरीवरि या समयाला ॥ध्रु.॥
वर्णुनि स्थिति ही हृदयविदारी ! द्रववित राहिन जनहृदयाला ॥१
विलया न्याया या अन्याया वाहुनि घेइन मी अपणाला ॥२॥

त्रिवेणी– आपल्या या आश्वासनानं आपण खरोखर माझ्या सर्व दुःखांचा मला विसर पाडला. ईश्वर या कार्यांत आपणांस यश देवो !

शिपाई– बोवा, तुम्हाला दिलेली मुदत भरून गेली; करतां आतां माझ्याबरोबर बाहेर चला. बाई, तुम्हीही आतां कराच निघण्याची तयारी.

त्रिवेणी– मला कसली करायची आहे तयारी ! ही मी तयारच आहें !

रामदासी– त्रिवेणी ! हाय ! हाय ! हें तुझं शेवटचं दर्शन ना ?

पद–(' कांते फार तुला मजसाठीं०' या चालीवर.)

खातें फार मना माझ्या तें जें हातें घडलें ।

दोषि खरा मी असुनी तुजला चांडाळें ग्यां फांशीं दिधलें॥ध्रु.
लौकिकभीतीवरि जय मिळवुनि । भगव्यावेषा फेकुनि देउनि ।
केली असती तुजला गृहिणी । कां असतें मग हें ओढवलें॥१॥

शिपाई– हं, चला ह्मणतोंना. (शिपाई रामदाशास ओढून नेतो.)

(पडदा पडतो.)

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

(खिन्न झालेला हरभट प्रवेश करतो.)

हरभट– श्लोक (शार्दूलविक्रीडित)

जो माया अटवी, विवेक हटवी, तृप्ती न ज्याची कदा ।
जो पापा घडवी, यशासि मळवी, छीः थूः करी सर्वदा ॥
त्या लोभासि गणूनि दैवत जणूं मी त्यासि आराधिलें ।
झालें तें मजला प्रसन्न, फल हें त्याचें मला लाभलें! ॥१॥

'लोभ मूलानि पापानि' ह्मणतात, त्याचा आतां मला जसा पडताळा येऊन चुकला, तसा पूर्वीच येता, तर या नीच लोभाचा गुलाम बनून मी बिचाऱ्या **त्रिवेणी**ची व तिच्या बरोबर आपलीही अशी कां छीः थूः करून घेतली असती? पण खरं ह्मटलं तर, **पुरुषोत्तमा**नं मला वेळींच बजावलं नव्हतं का? आणि तेवढ्यानं शहाणा होऊन, मी जर तेव्हांच **त्रिवेणी**चं फिरून लग्न करून टाकलं असतं, तर त्यानं भाकीत केल्याप्रमाणं मला हा असा पस्ताव्यांत पडण्याचा प्रसंग कां आला असता? आणि शिवाय **सुशीले**चीही तीच गत होण्याची मी तयारी करून ठेवली आहे ती वेगळीच! पण काय करावं! **पुरुषोत्तमा**चा तर आतां फिरून लग्न न करण्याचा निश्चय झालेला, आणि **सुशीला** तर त्याच्याशिवाय कुणाशींही लग्न करायला तयार नाहीं! नाहीं तर, लौकिकाचीही फिकीर न करतां मी तिचं स्वतः फिरून कन्यादान केलं असतं. शिवाय माझा मार्गही सध्या थोडा-फार सुलभ झालेला आहे. कारण **रामशास्त्र्यां**च्या खटपटीनं बहुतेक शास्त्रीपंडित पुनर्विवाहास अनुकूल झाले असून त्याला **श्रीशंकराचार्यां**ची संमती मिळवण्याच्या कामीं **बिंदुमाधवशास्त्र्यां**सारख्यांनीं पुढाकार घेतला आहे. पण उपयोग काय? तरी पण बायको ह्मणते त्याप्रमाणं **गोपाळरावां**ची गांठ घेऊन, त्यांच्याकडून **पुरुषोत्तमा**चं मन वळवण्याची एकदां खटपट तर करून पहावी. प्रयत्नांती परमेश्वर. लागावंच तर आतां त्या प्रयत्नाला. (जाता.)

प्रवेश २ रा.

(गोपाळराव व बिंदुमाधवशास्त्री बोलत बसले आहेत.)

बिंदुमाधवशास्त्री–आतां हा जो तुम्ही **सुशिलेच्या** लग्नाचा प्रथमपासूनचा इतिहास सांगितला, त्यावरून माझा तर असा तर्क व्हातो कीं, **सुशीला** जी फिरून लग्न करीत नाहीं, ती लौकिकाच्या भीतीमुळं, अशीच **पुरुषोत्तम**पंतांची समजूत झाली असली पाहिजे. ती आपल्याकरितांच दुःखीकष्टी आहे, हें जर त्यांना कळतं, तर त्यांचा ह्या आमरण विधुर रहाण्याचा निश्चय झालाच नसता.

गोपाळ०–आपला तर्क खरा असण्याचा मलाही पुष्कळ संभव वाटतो; पण याचा उलगडा कसा व्हावा, याच विवंचनेंत मी आहें.

बिंदुमाधव०–त्याची विवंचना कशाला ! मीच आज सभेला जाण्यापूर्वी त्यांची गांठ घेऊन याचा युक्तिप्रयुक्तीनं उलगडा करून घेतों. आणि तो करण्यांत माझा एक विशेष उद्देशही आहे. तो काय, हें या कामांत मला सिद्धी मिळाली, ह्मणजे सांगेन तुह्मला.

गोपाळ०–ईश्वर करो, आणि आपला तर्क खरा ठरो. असो, आजच्या सभेच्या सुरवातीचे वेळीं मी तुह्मांला दाखवलेलं तें पद ह्मणायला माझी ना नाहीं, असं काल आईकडं जातांना **सुशिलेनं** मला सांगून ठेवलं आहे, पण तिच्या हातून सभेच्या कामाला आरंभ होऊं द्यायला कुणाची हरकत असली, तर मात्र माझा आग्रह नाहीं.

बिंदुमाधव०–त्याला कुणाची हरकतही नाहीं, आणि तो कार्यक्रम ठरूनही चुकला आहे. अहो आमचे सुधारक मित्र माझं ऐकून आज जसे तडजोडीला तयार झाले आहेत, तसेच ते नेहमीं होत गेले, तर आमची पुराणाभिमानी मंडळीही थोडं थोडं पुढं पाऊल टाकायला तयार होतील, अशी मला खात्री आहे. शिवाय **रामशास्त्र्यांनीं** आज अनेक महिने परिश्रम करून आजच्या सभेचा जो हा योग जुळवून आणला, त्याला मूळ कारण ही **सुशीलाच** आहे, तेव्हां तिच्याकडून आजच्या सभेचा उपक्रम होणं हें वास्तविक स्थानींच होणार आहे. **हरभटाचं** घर माझ्या वाटेवरच आहे, तेव्हां संध्याकाळीं येतांना मीच तिला घेऊन येतों, ह्मणजे झालं. पण

तुमच्या सगुणाताईंनीं विधवामुलींकडून सभेला विनंती करण्याची काढलेली कल्पना मात्र अवश्य अमलांत आली पाहिजे.

गोपाळ०–त्याची तुह्मांला अगदीं काळजी नको. **सगुणेनं** त्याची आधींच व्यवस्था केलेली आहे.

बिंदुमाधव०–घेतों तर मी आतां निरोप.

गोपाळ०–चला, मलाही जायचंच आहे बाहेर. (दोघे जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–रामशास्त्र्यांचे घराची माडी.

रामशास्त्री– आपण येण्यापूर्वी **पुरुषोत्तमा**जवळ मी हेंच ह्मणत होतों कीं, **बिंदुमाधव**शास्त्र्यांसारख्या करारी गृहस्थांनीं जें काम एकदां मनावर घेतलं, त्यांत सिद्धी ही मिळालीच पाहिजे.

बिंदुमाधव०– हा तुह्मी माझा उगीच गौरव करतां झालं. असो, आजच्या सभेचा प्रश्न आतां केवळ औपचारिकच आहे. आपण **श्रीशंकराचार्यांकडं** आज जो विज्ञप्तीअर्ज पाठविणार आहों, त्याच आशयाचा अर्ज, **श्रीं**ची स्वारी साताऱ्यास असतां तेथील कांहीं सद्गृहस्थांनीं **स्वामीं**ना केला होता, त्यावेळीं, ' बहुजनसमाजाकडून आमच्याकडं अशी विनंती होण्याचीच आह्मी वाट पहात आहों, ' असे **स्वामींनीं** उद्गार काढले होते, हें आपल्या कानीं आलंच असेल. शिवाय दुसऱ्या ज्या कित्येक गोष्टी मी तुह्मांला कळविल्या आहेत, त्या विचारांत घेतां, **श्री**कडून या गोष्टीला अनुमती मिळवणं कांहीं कठीण नाहीं. खरी अडचण आहे ती वेगळीच आहे.

पुरुषोत्तम– ती माझ्याही लक्षांत आलेली आहे. कारण **श्रीं**ची संमती मिळाली, तथापि ज्या विचारांत बालविधवा लहानाच्या मोठ्या झाल्या आहेत, ते मनांत आणतां त्या संमतीचा उपयोग करून घेण्याचं त्यांना धैर्य यायला बराच काल लोटावा लागेल.

बिंदुमाधव०–छे छे ! प्रश्न आहे तो त्यांच्यासंबंधानं नव्हे. त्या बोलून चालून अजाण मुली. त्यांचे पालक तयार झाले, कीं त्या तयारच आहेत असं समजा. आणि **श्रीं**ची संमती मिळून सध्याची

बहिष्काराची भीती दूर झाली, म्हणजे त्यांना तशाच वैधव्यदुःखांत झुरूं देणारे पालकही सहसा सांपडायचे नाहींत. भीती काय ती या बालविधवांना आपली गृहिणी म्हणायला कोण पुढं येणार हीच आहे.

पुरुषोत्तम– ही आपली भीती मला वाटतं अगदीं अस्थानीं आहे.

बिंदुमाधव०–अस्थानीं कशी ? अहो सुधारक म्हणविणारेही त्या बाबतींत जर कचरतात, तर इतरांची कथा काय ?

पुरुषोत्तम–तें खरं; पण हा बहिष्काराचा बागुलबोवा दूर झाला, म्हणजे मग कचरण्याचं मुळीं कारणच उरलं नाहीं.

बिंदुमाधव०–पण श्रींच्या आज्ञापत्रानं पुनर्विवाह धर्मसंग्राह्य ठरला व बहिष्कारही बंद झाला, तथापि त्याच्या नवीनत्वामुळं तो बरेच दिवस लोकांना एकंदरींत गौणच वाटणार व ते त्याला नाकं हीं मुरडीत रहाणारच. तेव्हां अशा स्थितींतः—

साकी.

जिला एकदां अन्य पतीनें म्हणविलि अपुली भार्या ।
बालकुमारीसम ती असली तरिही तिजसि वराया ।
होतिल कोण पुढें । मोठें मजला हें कोडें ॥ १ ॥

फार लांब कशाला ? तुम्ही आपल्यावरूनच पहाना ! पुनर्विवाहावर लांब लांब व्याख्यानं झोडून, आपल्यावर प्रसंग पडतांच एखाद्या खेड्यापाड्यांत जाऊन, वयातीत विधुरही जसे गपचीप एखाद्या अल्लड पोरीला आपली सहधर्मचारिणी करतात, तसं तुम्ही तरुण असूनही केलं नाहींत, हें त्यांतल्या त्यांत अभिनंदनीय आहे खरं; पण आमरण विधुर रहाणंच आतां तुम्हाला अधिक इष्ट कां वाटलं ? यावरूनच माझ्या म्हणण्याला बळकटी येत नाहीं का ?

पुरुषोत्तम–एकूण विधवेशीं लग्न करायला माझं मन कचरतं, म्हणूनच मी तो निश्चय केला असं तुमचं म्हणणं ?

बिंदुमाधव०–मग काय वडलांची संमती नव्हती, म्हणून तुम्ही तो निश्चय केलात ? पण तसं म्हणावं, तर आतां त्याचं कारण उरलं नाहीं. कारण शास्त्रीबुवांची तर त्याला पूर्ण संमती आहे.

पुरुषोत्तम–वडलांची संमती नाहीं, एवढ्यामुळंच माझा तो

निश्चय झाला असता, तर यापुढं त्याचं कारण नाहीं हें खरं; पण केवळ वडलांच्या हरकतीमुळं या कामीं मागं घेणारा मी नाहीं. वडलांचे मुलावर जे अगणित उपकार असतात, ते स्मरून, मुलानं होतां होईतों त्यांचं मन न दुखवण्याविषयीं दक्ष असावं, हें त्याचं कर्तव्य होय; तें न बजावणं म्हणजे कृतघ्न होण्यासारखं आहे, हें मला कबूल आहे. पण त्याबरोबर हेंही लक्षांत ठेवलं पाहिजे कीं:—

पद–(' थांब थांब करिसि असा० ' या चालीवर)

वंद्य जरी जनकाज्ञा सर्वथा असे ॥
सार्थकता जन्माची त्यांत परि नसे ॥ ध्रु० ॥
कर्तव्यें असति नरा विविध योजिलीं ।
कांहिं श्रेष्ठ कांहिं गौण त्यांत गणियलीं ।
बघुनि बलाबल ज्ञाता निवड करितसे ॥१॥वंद्य जरी०

आणि या दृष्टीनं पहातां, केवळ समाजाच्या जुलमामुळं ज्यांना आपलं जीवन अत्यंत कष्टमय होऊन गेलं आहे, अशा विधवांना दुःखमुक्त करण्याच्या कामीं आईबापांना पारखं व्हावं लागत असलं, तर तेंही प्रसंगीं पतकरणं अवश्य होय, असं मी समजतों. ' **पांडुरंगीं** घडे जेणें अंतराय। हो का बाप माय त्यजावी ते ' । हा **तुकाराम** बोवांचा उपदेश अविचाराचा आहे, असं कोण ह्मणेल ? आणि न्याय, नीती, दया इत्यादि सद्गुणांना पराङ्मुख होणं, ह्मणजेच **पांडुरंगाला** अंतरणं होय. तेव्हां अशा बाबतींत जे आईबापांची हरकत पुढं आणीत असतात, ते वास्तविक आपलं आईबापावरील प्रेम व्यक्त करीत नाहींत, तर खऱ्या कर्तव्यप्रेमाचा आपल्या ठिकाणीं असणारा अभावच व्यक्त करतात, याबद्दल मला अगदीं शंका नाहीं.

बिंदुमाधव०–मग तुमचा हा निश्चय ह्मणजे एक गूढ कोडंच आहे ह्मणायचं !

रामशास्त्री–त्यांत कांहीं गूढही नाहीं, आणि त्याचा दोषही **पुरुषोत्तमाकडं** नाहीं. त्याचा सारा दोष माझ्याच सर्वथा माथीं आहे. **नानासाहेबांशीं** आपलं लग्न लागूं नये, ह्मणून **सुशीला** जी ऐन लग्नाचे वेळीं नाहींशी झाली होती, ती **पुरुषोत्तमाच्याच**

प्रयत्नामुळं; हें आपल्याला बहुधा माहीत नसेल. पण तिला वैधव्य येऊं नये, ह्मणून त्यानं इतका खटाटोप केला तरी, मी शेवटीं सिंहस्थांत मुहूर्त काढून तिला वैधव्यदान करायचं तें केलंच. आणि जिला आपण वैधव्यमुक्त करण्याचा चंग बांधला होता, ती दुःख भोगीत असतां, आपण विवाहसुखाचा अनुभव घेत राहणं अश्लाघ्य होय, या विचारानंच त्याचा तो निश्चय झालेला आहे.

बिंदुमाधव०—असं जर आहे, तर यांनीं तिलाच आपली गृहिणी करायला काय हरकत आहे ?

रामशास्त्री—पण त्याला ती स्वतां तयार असली पाहिजे ना ?

बिंदुमाधव०—ती तयार नाहीं हें तुह्मीं कशावरून ठरवलंत ?

पुरुषोत्तम—तें तर मला खुद्द **गोपाळरावांच्या** तोंडूनच समजलं.

बिंदुमाधव०—पण ती कां तयार नाहीं, याचा तुम्ही कधीं शोध केलात का ?

पुरुषोत्तम—त्यांत शोध तो काय करायचा ?

बिंदुमाधव०—तिथंच तर सारं चुकलं ! बरं तें असो. पण आतां जर कुणी तुह्माला येऊन सांगितलं कीः—

पद–('नाहिं झाले षण्मास मला'० या चालीवर)

लभ्य न ती ह्मणुनि तुह्मी स्वस्थ बैसलां ।
परि तुमचा ध्यास मनीं तिजसि लागला । ध्रु०॥
(चाल) नित्य विधुरचि मी राहिन हा हट्ट सोडुनी ।
काय हृदयरमण वरिल मला सदय होउनी ।
भाग्य अथवा तें कुठुनि मला मी अभागिनी ।
म्हणुनि होत विव्हला ॥ १ ॥ लभ्य० ॥

तर तुह्मी काय कराल ?

पुरुषोत्तम—शास्त्रीबोवा, उगाच अशी थट्टा करून माझ्या दुःखावर अशी डागणी कां देतां ? न करत्याचा वार शनवार ह्मणतात, त्याप्रमाणं उगीच कांहीं तरी सबब शोधून काढून तिच्याशीं लग्न करण्यास लागणारं धैर्य माझ्या अंगीं नाहीं, ह्मणून मी ही कांहीं तरी

बतावणी मांडली आहे, अशी का अजून तुमची समजूत आहे ? ऐका तर मी काय करीन तें :—

पद–('सफलेच्छा ती करिन सुरांची'० या चालीवर)

प्रियतम ऐशा त्या बालेला । देतां येइल सौभाग्याला ।
तरि न दिसे जागें साहस मजला । मी न जया अचरीं । धैर्यें ।
देइन विपदा आल्या किति तरि । लोटुनिया दूरी । धैर्यें ॥१॥
जनतेनें कितिही छल केला । स्नेही कोणी जरि मज नुरला ।
सत्य कराया मम वचनाला । तिजसी धरुनि करीं । धैर्यें ।
सोडुनि पाणी इतर सुखावरि । करिन तिला नवरी । धैर्यें ॥२॥

बिंदुमाधव०–शाबास ! **पुरुषोत्तम**पंत शाबास ! मी मनांत योजले॰ल्या हेतूला 'श्रीगणेशायनमः' दाखल तुमच्यासारखा निर्धारी पुरुष मिळणं, हें उद्दिष्ट कार्याच्या सिद्धीचं सूचकच समजलं पाहिजे. असो. आतां जें मी तुह्माला सांगितलं, ती थट्टा नव्हे, तर केवळ वस्तुस्थितीकथनच आहे, याबद्दल आतां शंका बाळगूं नका. हें सर्व जर काल **हरभटजी**कडून **गोपाळरावां**ना, व त्यांच्याकडून आज सकाळीं मला समजलं नसतं, तर तुह्मां उभयतांत विलक्षण रीतीनं घडून आलेला हा समजुतीचा घोटाळा कदाचित् शेवटपर्यंत असाच राहिला असता. असो, ज्याचा शेवट गोड तें सारं गोडच समजलं पाहिजे. **सुशीले**ची अट काय ती **पुरुषोत्तम**पंत आपला स्वीकार करतील, तरच फिरून संसारांत पडायचं इतकीच होती, व तुह्मी तिचं मोठ्या आनंदानं पाणिग्रहण कराल, हा माझा तर्क चुकला नव्हता, हें तुह्मीं आतां सिद्ध करून दाखवलंच आहे. पण मी जी ही तुह्माला आनंदाची वार्ता सांगितली, त्याचा मोबदला ह्मणून, तुह्मी मात्र माझी एक अट आतां मान्य केली पाहिजे.

पुरुषोत्तम–ती योग्य असली तर मी अवश्य मान्य करीन.

बिंदुमाधव०–मी ती अट कां घालतों, हें तुह्मांला समजलं, ह्मणजे मला वाटतं ती तुम्हाला योग्य वाटेल. मला सकाळीं जेव्हां **सुशीले**चा हा इतिहास समजला, तेव्हां एकाएकीं माझ्या अशी एक कल्पना मनांत आली कीं, सर्व ब्रह्मवृंदाच्या विनंतीला मान देऊन श्रीशंकरा-

चार्यांनीं बालापुनर्विवाह संग्राह्य ठरवला, कीं पहिल्याच सुमुहूर्तावर त्या आज्ञापत्राची अंमलबजावणी करतां येईल, तर तें दुधांत साखर पडल्याप्रमाणं होणार आहे. आणि म्हणूनच मी ही मध्यस्थी पतकरली. तेव्हां आतां माझी अट ह्मणून इतकीच आहे कीं:–

साकी.

श्रीची आज्ञा मिळे तोंवरी तुह्मिं आतां थांबावें ।
ती मिळतां सुमुहूर्ता साधुनि मग सुशिलेसि वरावें ।
होइल संमत तें । सहजी सर्व समाजातें ॥ १ ॥

पुरुषोत्तम–पण आपल्या अर्जाला श्रीची अनुमती मिळाली नाहीं तर ?

बिंदुमाधव०–पण तुह्मी अशी शंका आधीं घेतां कां ? रामशास्त्र्यासारखे या कामांत मन घालतील, व त्यांना माझ्यासारख्याची अशी सहानुभूती मिळेल, असं पंचवीस वर्षांपूर्वी कुणाला स्वप्न तरी पडलं असतं का ? पण तें जर आज शक्य झालं आहे, तर या कामीं श्रीची संमती मिळायला तरी अडचण कां पडावी ? बरं मी म्हणतों पडली अडचण; ह्मणून काय झालं ? राजकीय बाबतींत तुह्मीं लोकांना काय सांगत असतां ? हेंचना कीं:—

दिंडी.

जरी कितिदांही यत्न विफल झाला ।
तरिहि अवसर द्यावा न निराशेला ॥
फिरुनि लागावें त्याच प्रयत्नाला ।
मार्ग अन्य न कृतकार्य व्हावयाला ॥ १ ॥

मग तोच न्याय तुह्मी याही गोष्टींत कां लागू करूं नये ? तुमचं सुधारकांचं चुकतं तें हेंच. अहो, हजारों वर्षांची रूढी मोडायची म्हणजे दमादमानंच घेतलं पाहिजे. तुह्मा उतावळ्या सुधारकांमुळं तर आजपर्यंत सुधारणा मागं पडली.

पुरुषोत्तम–शास्त्रीबोवा, या वेळीं आपल्याशीं वाद घालीत बसण्याची माझी इच्छा नाहीं. तेव्हां थोडक्यांत इतकंच सांगतों कीं, हे उतावळे-धिमे, गरम-थंडे, किंवा ज्यांना हल्लीं जहाल-

मवाळ ह्मणतात, ते दोनही वास्तविक आडनांवीं सुधारक आहेत. राजकीय गोष्टींत काय, अथवा सामाजिक गोष्टींत काय, अन्यायाची खरी खरी चीड येऊन, मनाला पीळ पडून, कायावाचामनानं त्याच्या प्रतिकारार्थ झटणारे, या दोनही पक्षांत किती सांपडतील, हें शोधण्याच्या भरीस न पडणं हेंच शहाणपण आहे. यांनीं त्यांना नांवं ठेवावीं, व त्यांनीं यांनां ठेवावीं, यापलीकडं या पक्षद्वयांत कांहीं राम आहे, असं मला वाटत नाहीं. दगडाखालीं सांपडलेला हात युक्तिप्रयुक्तीनंच काढला पाहिजे; नाहीं तर तो तुटून जायचा; ही गोष्ट राजकीय आणि सामाजिक या दोनही बाबींना सारखीच लागू आहे हें खरं; परंतु अगदीं आस्ते आस्ते पुढं पाऊल टाकणारांनांही जसे कांहीं सरकारी अधिकारी जहाल ह्मणत रहायचेच, तसे धिम्या समाजसुधारणेलाही उतावळी ह्मणणारे कित्येक रूढीचे भक्त हे सांपडायचेच. तेव्हां कोण काय ह्मणतो याकडं अगदीं लक्ष न देतां, कर्तव्याच्या खऱ्या खऱ्या आस्थेनं जो तो मनःपुरःसर झटेल, तर हे दोनही पक्ष वास्तविक परस्परसाह्यकारीच आहेत, असं परिणामीं दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं. मुख्य उणीव आहे ती खऱ्या कळकळीची. असो, मी ह्मणजे वैवाहिक सुखाला अगदीं आतुर होऊन गेलों आहें, असा मुळींच भाग नाहीं; व निदान आपल्या या अर्जाचा निकाल होईपर्यंत तरी थांबण्याला माझी स्वतांची मुळींच ना नाहीं. परंतु माझ्या गैरसमजामुळं **सुशीले**ला इतके दिवस दुःखांत काढावे लागले असून, आतांही आणखी तिला वाट पहावी लागावी, हें मला बरं दिसत नाहीं.

बिंदुमाधव०—पण **सुशीले**ची या कामीं हरकत नसली, म्हणजे झालं कीं नाहीं ? आणि त्याला विलंबही नको. आज जो मी इथं आलों, तो या लग्नाचा वाग्निश्चय करण्याच्या हेतूनंच आलों होतों; व तो आपल्याला करतां येईल, अशी मला खात्री असल्यामुळं, सभेच्या निमित्तानं **सुशीले**ला व **हरभटजीं**ना मी बरोबर घेऊनच इथं आलों होतों. तथापि माझा तर्क खरा ठरेपर्यंत त्यांना माडीवर आणणं इष्ट नाहीं, असं जाणून मी त्यांना खालींच थांबायला सांगितलं होतं. तेव्हां त्यांनाच आतां वर हाक मारतों म्हणजे झालं. (उठून) **हर-**

भटजी आतां **सुशीले**बद्दलची काळजी ठेवा खालीं, आणि तिला घेऊन या वर.

रामशास्त्री–शास्त्रीबोवा आपले मजवर आज किती उपकार झाले आहेत, हें मला शब्दांनीं बोलून दाखवतां येणं शक्य नाहीं!

बिंदुमाधव०– पण यांत मी असं विशेष तें काय केलं, हें मला समजत नाहीं. (हरभट व सुशिला येतात त्यांस) या **हरभटजी** बसा, **सुशीले** तूंही बैस (हरभट बसतात. **सुशीला** उभीच राहते.) माझी अटकळ चुकायची नाहीं ह्मणन मीं तुह्माला सांगितलं होतंच आणि तेंच खरं ठरलं. हा सर्व समजुतीच्या घोटाळ्याचा खेळ झाला. **सुशीला** आपल्याशीं लग्न करायला तयार आहे, हें **पुरुषोत्तम**पंतांना आधींच कळतं, तर त्यांना विधुर राहण्याचा निश्चय करण्याचं मुळीं प्रयोजनच पडलं नसतं. असो, **पुरुषोत्तम**पंत **सुशीले**ला आपली सहधर्मचारिणी करायला मोठ्या आनदानं तयार आहेत. आतां काय तो तिथिनिश्चय करायचा राहिला आहे. त्यासंबंधानं माझं इतकंच ह्मणणं आहे कीं, आपण आज **श्रीकडं** जो अर्ज पाठविणार आहों, त्याचा निकाल होईपर्यंत आपण थांबावं, व तो झाला म्हणजे **श्री**च्या आज्ञापत्राची सांगता म्हणून पहिल्याच सुमुहूर्तावर मोठ्या थाटानं व सर्व ब्रह्मवृंदाच्या संमतीनं हें कार्य साजरं करावं. या गोष्टीला **पुरुषोत्तम**पंतांची ना नाहीं. पण त्यांनीं आपलं मत **सुशीले**च्या विचारावर ठेवलेलं आहे. तेव्हां तो कळला ह्मणजे बरं.

हरभट–आपला विचार मला फारच पसंत दिसतो व **सुशीले**लाही तो आवडेल यांत संशय नाहीं. कां **सुशीले** असंच ना?

सुशीला– ज्या गुरुजनांच्या प्रसादानं हा सोन्याचा दिवस मला उगवला, त्यांच्या इच्छेबाहेर मी नाहीं. आणि शिवाय दुसरं असं कीं:–

पद–(' मूर्तिमंत भीति उभी०.' या चालीवर)

प्रीतिपात्र दासि जरी प्रियकरासि वाटली ।
वासना अतां मनास नाहिं कांहिं राहिली ॥ ध्रु० ॥
लग्नकाल जाइ दुरी तरि न काळजी मुळीं ।
ध्यात मी बसेन मूर्ति जी सदेव ध्यायिली ॥ १ ॥प्रीति०

बिंदुमाधव०–शाबास, सुशिले शाबास ! पुरुषोत्तमपंतांना तूं सर्वथा अनुरूप गृहिणी शोभशील यांत संशय नाहीं. असो, मी ज्या कार्याकरतां मुद्दाम इथं आलों होतों, तें तर माझ्या मनोदयानुरूप होऊन चुकलं आहे. तेव्हां आतां आपण सर्वजण मिळून सभास्थानींच जावं हें बरं. (सर्व उठतात.)

पुरुषोत्तम०– चला. पण आपण मला आज अगदीं विस्मित करून टाकलंत यांत संशय नाहीं. यावेळची माझ्या मनाची स्थिती तुम्हाला काय सांगू ? :–

पद– (' प्रिये पहा रात्रीचा० ' या चालीवर)

गमे मला । अचिंतिता चिंतामणि आज मजसि लाधला॥ध्रु०॥
सुखि होइल कशि सुशिला । या मम हृद्रोगाला
मात्रा जणुं यायाला । धन्वंतरि पातला ॥ १ ॥ गमे० ॥
वचनांतुनि उद्धरुनी । चिंता मनिची हरुनी ।
ठेवियलें मज करुनी । नित्य ऋणी आपुला ॥२॥गमे०॥

बिंदुमाधव–तुमच्यासारखे असेच अनंत पुरुषोत्तम या भरतभूमींत निपजोत, आणि माझ्यासारख्या मध्यस्थांना ते असेच ऋणी करोत, म्हणजे झालं. (सर्व जातात.)

प्रवेश ४ था.

स्थळ– शंकराचें देवालय. ब्रह्मवृंदाची सभा भरली आहे. बिंदुमाधवशास्त्री अध्यक्षस्थानीं बसले आहेत.

सुशीला–(देवालयाच्या गाभाऱ्यांतून बाहेर येऊन):–

पद–(' चंद्रकांत राजाची० ' या चालीवर)

हाय ! काय त्या आर्यजननिची दीन दशा झाली ।
वैभवशाली जी गतकालीं शोभलि अवनितलीं ॥ १ ॥
सुपुत्र निपजुनि जिची एकदां कीर्ती दुमदुमली ।
नकळे कैशी तीच करंटी अशि होउनि गेली ॥ २ ॥
अथवा नवल न कर्में अमुचीं परिपाका आलीं ।
कुपुत्र आह्मी ह्मणुनी कुदशा ही तिजला जडली ॥ ३ ॥

ज्या स्थलिं नारी दुःखी तेथें ऋद्धि न कधिं रमली ।
मनुस्मृतीची ही उक्ती आह्मि लाथाळुनि दिधली ॥ ४ ॥
विकलेंद्रियही विधुरास्तव जीं हृदयें हळहळलीं ।
विधवाबालादुःखानें तीं कधींहि न कळवळलीं ॥ ५ ॥
नरनारीसम शास्त्र ह्मणे परि बळि तो कान पिळी ।
या न्यायें आह्मि स्त्रीवर्गावरि सत्ता गाजविली ॥ ६ ॥
यापरि अजवरि ज्या राष्ट्रांनीं अबलेला छळिली ।
तीं न कधीं इतिहासीं दिसलीं उन्नतिला चढलीं ॥ ७ ॥
स्त्रिया सुखी तरि राष्ट्र सुखी हें जाणुनि कृति घडली ।
तरिच आर्यभू होइल आरुढ पुनरपि सुखशैलीं ॥ ८ ॥

(पद ह्मणून झाल्यावर सुशीला फिरून देवालयाच्या गाभाऱ्यांत जाते.)

बिंदुमाधव०-आजच्या सभेचा उद्देश सर्व ब्रह्मवृंदाला विदितच आहे. आपणांमध्यें विधुरांनीं केव्हां लग्न करावं आणि केव्हां करूं नये, याचा मुळींच निर्बंध राहिला नाहीं. तसंच या प्लेगादि आपत्तींमुळं अत्यंत अल्पवयांतही ज्या बालिकांवर वैधव्याचा दारुण प्रसंग ओढवतो, त्यांची संख्या बेसुमार वाढत असून, यांचं आतां पुढं काय होणार, ही चिंता त्यांच्या आप्तेष्टांच्या चित्ताला कशी पोळीत आहे, याचाही अनुभव प्रत्यक्ष वा पर्यायानं बहुतेक सर्वांनाच येत आहे. तेव्हां योग्यायोग्याचा विचार होऊन व कालदेशवर्तमानाकडं नजर देऊन विधुरांनाही लग्नाच्या बाबतींत कांहीं निर्बंध व्हावा, व वैवाहिक सुखाचा अल्पही अनुभव घडण्यापूर्वींच ज्यांच्यावर ही वैधव्याची कुऱ्हाड येऊन पडते, अशा बालविधवांना फिरून लग्न करण्याची सवलत असावी, अशा आशयाचा विज्ञप्तीअर्ज **श्रीशंकराचार्यां**कडं पाठवावा, या उद्देशानं आज हा ब्रह्मवृंद येथें जमला आहे. यासंबंधानं यापूर्वींच वाटाघाट होऊन बहुतेक सर्वांची या बाबतींत एकवाक्यता झालीच आहे, व ती जाहीर रीतीनं श्रीचरणारविंदीं सादर करण्याचंच काम कायतें आतां करायचं आहे. तथापि कुणाला कांहीं बोलायचं असेल, तर तेंही सर्वांनीं शांत चित्तानं ऐकून घ्यावं, अशी माझी सभेला विनंती आहे.

चिंतामणराव–यांत वास्तविक बोलण्यासारखं कांहीं आहे, असं मला वाटत नाहीं. आजकाल समाज जो पुनर्विवाहाच्या विरुद्ध आहे, त्याचं कारण त्याला बालविधवांची स्थिती अनुकंप्य वाटत नाहीं, असं नाहीं. तसंच आजपर्यंत या प्रांतीं जे पन्नास साठ पुनर्विवाह झाले आहेत, ते बालविधवांचेच झाले आहेत, हेंही खोटं नाहीं. सुधारकांची या कामीं चूक झाली, ती हीच कीं, त्यांनीं धर्मगुरूंची संमती मिळवल्याशिवायच या कामांत पुढं पाऊल टाकलं.

पुरुषोत्तम–सुधारकांवर असा वृथा आरोप करणं योग्य नाहीं. पंचवीस तीस वर्षांपूर्वी या **पुणेंशहरांतच** श्रीच्यापुढं जी पुनर्विवाहाची चर्चा झाली, ती सुधारकांनींच करविली होती. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां नाइलाजास्तव धर्मगुरूंच्या संमतीची अपेक्षा न करतां, त्यांना पुढं पाऊल टाकावं लागलं. शिवाय त्यांनीं सुखेच्छेनं प्रेरित होऊन तसं केलं, असंही कुणाला ह्मणतां येणार नाहीं. पुनर्विवाह करणारांचा मार्ग आजही म्हणजे अगदीं सुलभ आहे, अशांतला प्रकार नाहीं. पण आद्यसुधारकांना जो छल सोसावा लागला, त्याच्या तो पासंगासही पुरणार नाहीं. आणि सध्या समाजांत या प्रश्नासंबंधानं जी थोडीफार जागृती झाली आहे, ती बऱ्याच अंशानं त्या धीरोदात्त धुरीणांनीं आपल्या कर्तव्याला जागून, संकटाला तोंड देण्यांत जी प्रशंसनीय तत्परता दाखविली, तिचंच फळ होय, यांत संशय नाहीं.

चिंतामण०–अहो, तें मी नाकबूल करीत नाहीं. पण त्यांना जो छल सोसावा लागला, तो त्यांच्या उतावीळपणाचंच प्रायश्चित्त समजलं पाहिजे. कसं म्हणाल, तर मी एक उदाहरण देतों. सरकारी नोकरांनीं राजकीय चळवळीशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवतां उपयोगी नाहीं, असा हल्लीं जो निर्बंध करण्यांत आला आहे, तो जरी सर्वथा योग्य ह्मणतां येणार नाहीं, तथापि तो मोडणारांना सरकार शासन केल्याशिवाय राहील का? आतां कित्येक त्यांत चोरून छपून पडतात, व त्यावांचून गत्यंतरही नाहीं हें मला कबूल आहे; पण त्याला राजमार्ग ह्मटला, ह्मणजे तो निर्बंध बदलण्याची खटपट करणं हाच होय.

पुरुषोत्तम–पण तसा निर्बंध असूनही कित्येकांना राजकीय चळवळींत पडावं लागतं हें जर खरं आहे, तर तुम्ही सुधारकांनाच तेवढा दोष कां द्यावा ? आणि शिवाय पुनर्विवाह चोरून छपून कसा करायचा हें मला समजत नाहीं !

गोपाळराव–मी सांगतों तुह्माला त्यांच्या म्हणण्याचा आशय. तो चोरून छपून करायचा ह्मणजे त्याला लग्नाचं स्वरूप द्यायचं नाहीं इतकंच ! हल्लीं जीं पुनर्विवाहित दंपत्यं आहेत, त्यांनीं या लग्नाच्या भानगडींत न पडतां खुशाल नवराबायकोप्रमाणं व्यवहार केला असता, तर त्याला कुणाची ना नसती ! आमच्यांत ब्राह्मणेतर स्त्रीलाही राजरोसपणें घरांत ठेवून तिच्याशीं बायकोप्रमाणं व्यवहार करणारे थोडे का आहेत ? पण त्यांना कुणी कधीं बहिष्कृत केलं आहे का ? किंवा त्यांना तिच्यापासून झालेलीं मुलं खेळवायला कुणी हरकत घेतली आहे का ? नाहीं.

चिंतामण०–छे छे ! माझ्या ह्मणण्याचा असा विपरीत अर्थ करणं बरोबर नाहीं. हा तर धडधडित अधर्म ! यापेक्षां पुनर्विवाह करणं लक्षपटीनं चांगलं हें मला कबूल आहे.

बचंभट–तुह्माला असेल कदाचित् तें कबूल. पण आम्हाला तें कदापि कबूल होणार नाहीं. परवां असेच एक शहाणे आह्माला भेटले होते. ते लागले आम्हाला विचारायला, कीं "महार ख्रिस्ती झाल्यावर तो जर तुमच्या लोडाला टेकून बसलेला तुह्माला चालतो, तर हिंदु म्हणवणाऱ्या महाराचा तुह्मी विटाळ कां धरावा ? परदेशीयांनीं तयार केलेलं बर्फ, सोडावाटर, यांच्यावर जर भटभिक्षुकही निःशंक ताव मारतात, तर शूद्राच्या हातच्या पाण्याला तुमची हरकत कां असावी ? पांढऱ्या वस्त्राला जर शूद्राचा स्पर्श खपतो, तर रंगीत वस्त्रानंच तेवढं काय पाप केलं आहे ? आणि त्यांतही तें रंगीत वस्त्र विलायती चीट असलं, तर त्यांत तो विटाळ शिरत नाहीं, पण गांवठी लुगड्यांत मात्र तो लगोलग शिरतो हें काय गौडबंगाल आहे ?" पण मी त्यांना एकाच उत्तरानं निरुत्तर करून टाकलं कीं, 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' ! आमच्या या रूढ हिंदुधर्माला त्या तुमच्या विचाराच्या कातरींत

घालून त्याचीं शकलं होऊं देण्याइतके आह्मी मूर्ख नाहीं. शिवाय परवांच नुकतं कुठल्याशा एका वकिलानं पुनर्विवाह केल्याबद्दल त्याला वाळींत टाकलं होतं; तेव्हां झालेलं लग्न विधिपूर्वक झालं नव्हतं, असा त्या वकिलानं पुरावा आणल्यावरून **श्रीशंकराचार्यांनीं** त्याला पंक्तिपावन करून घेतल्याचं नव्हतं का आलं छापून? त्यावरून तरी काय निष्पन्न होतं ? हेंच, कीं लग्नाशिवाय एखाद्या स्त्रीशीं बायकोप्रमाणं व्यवहार केल्यास त्याला बहिष्कार नाहीं. पण पुनर्विवाहिताला तो आहे.

गोपाळ०–कां आलं मी ह्मणत होतों तें प्रत्ययाला ?

बिंदुमाधव०–मला वाटतं, हें सारं विषयांतर होत आहे. आपण आज ज्या कार्यासाठीं इथं जमलों आहों, त्या संबंधानं जर कोणाचा मतभेद नाहीं, तर या वादाचं प्रयोजन काय? सुधारकांच्या कदाचित् कांहीं चुका झाल्या असतील, जुने ह्मणवणारांचे सर्वच धर्मव्यवहार निर्दोष आहेत, असंही ह्मणतां येणार नाहीं. सुधारकांनीं **श्रीशंकराचार्यांकडून** पुनर्विवाहाच्या बाबतींत अनुकूल निर्णय करून घेण्याचा प्रयत्न केला होता हेंही खोटं नाहीं, आणि **श्रीशंकराचार्यांना** तो करतां येईना, हेंही तत्कालीन वस्तुस्थितीला अनुसरूनच झालं, असं ह्मटलं पाहिजे. कायदा करायचा तो लोकमत अनुकूल असेल, तरच करून उपयोग. नाहींतर तो दप्तरांत धूळ खात पडायचा! सध्याची गोष्ट तशी नाहीं. बालविधवांच्या पुनर्लग्नाला आतां लोकमत अनुकूलच आहे, असं ह्मणण्याला हरकत नाहीं; आणि ह्मणून त्याला श्रीकडूनही संमती मिळेल, असा मला पूर्ण भरंसा आहे.

वामनराव–हें आपलं ह्मणणं युक्तीला धरूनच आहे, यांत संशय नाहीं. पण मला अजूनही असं वाटतं कीं, अशा रीतीनं विवाहबंधनाची पवित्रता कमी होऊं देणं एकंदरींत श्रेयस्कर नाहीं. आहे ती रूढी प्रसंगोपात्त थोडी निष्ठुर भासण्याचा संभव आहे, हें खरं. पण सुपरिणामकारी औषध हें कडू असायचंच. आतां कोणी ह्मणेल कीं, स्त्रियांनीं फिरून लग्न केल्यानं जर विवाहबंधनाची पवित्रता कमी

होते, तर पुरुषांच्या पुनर्लग्नानंही ती कमी झाली पाहिजे. मी ह्मणतों, हो, त्यानंही ती कमी होत नाहीं असं नाहीं. आणि हा अन्याय आहे, हेंही मला कबूल आहे. पण त्याचं परिमार्जन विधवांना लग्न करूं देऊन करण्यापेक्षां, पुरुषांना असलेली परवानगी बंद करून करणंच अधिक श्रेयस्कर होणार आहे.

गोपाळ०—हा मांजराच्या गळ्यांत घाट बांधायची युक्ती दिसायला खाशी दिसते यांत संशय नाहीं. प्रश्न काय तो ती बांधणार कोण व कशी इतकाच आहे. तथापि ही सूचना सर्वांना मान्य असेल, तर माझी तिला अशी उपसूचना आहे, कीं आपल्याला जर पक्षपात दोषापासून खरोखरच मुक्त व्हायचं असेल, तर लोकप्रसिद्ध केसरीपत्रांत मागं एकदां सुचवल्याप्रमाणं, पुरुषाची बायको मरतांच त्याचं वयोमान, इच्छा-अनिच्छा, वगैरे कांहीं एक विचारांत न घेतां, त्याला फिरून लग्न करण्याची मनाई असावी. इतकंच नाहीं, तर विधवांप्रमाणं त्याचं मस्तक मुंडून व त्याच्या मिशा बोडून, त्याला भगव्या छाट्या परिधान करायला लावावं; त्यानं एकभुक्त असावं; असतील नसतील तितके उपास करणं त्याला भाग पाडावं; त्याला मंगलकार्यांत बंदी असावी; त्याचं मुखावलोकन झालं असतां अपशकून मानावा; आणि अशी व्यवस्था सक्तीनं अमलांत आली असतां, विधवांना जो उपदेश होत असतो, कीं 'देवानं त्यांना आयतं संसारमुक्त केलं असून त्यांनीं फिरून त्यांत पडण्याचा हव्यास धरण्यांत काय अर्थ आहे ! यापेक्षां त्यांनीं आपलं आयुष्य देशसेवेला वाहिलं, तर चांगलं नाहींका' ? तो उपदेश कृतीनं करून दाखवण्याचीही पुरुषांना आयती संधी मिळेल.

चिंतामण०—गोपाळरावांचा हा सर्व पुरुषवर्गावर टोला आहे, आणि तो वाजवीही आहे. पण एकावर होत असलेल्या जुलमाचा प्रतिकार दुसऱ्यावर जुलूम करून करण्याची ही मुलखानिराळी तऱ्हा कुणालाच पसंत पडायची नाहीं, तेव्हां त्याचा अधिक विचार करण्याचं मला मुळीं प्रयोजनच दिसत नाहीं.

बचंभट—पण पुरुषांनीं फिरून लग्न केल्यानं त्याची पवित्रता कमी होते, हेंच मुळीं आह्मांला मान्य नाहीं. तसं असतं तर शास्त्र-

कारांनींच त्याला आपली संमती दिली नसती. स्त्रियांची गोष्ट तशी नाहीं. त्यांनीं फिरून लग्न करणं ह्मणजे मात्र केवळ अधर्म होय. पण हें बोलावं कोणी ? चिंदुमाधवशास्त्र्यासारख्यांनीं या कामांत पुढाकार घेतलेला; त्यांच्या वजनामुळं शास्त्रीपंडीत, भटभिक्षुक, हेही त्यांच्या गोटांत सामील झालेले; तेव्हां आमच्यासारख्याला इथं विचारणार कोण ? बरं, आपण तेवढं या गोष्टीपासून अलिप्त रहावं ह्मटलं, तर चरितार्थ चालावा कसा ? ह्मणून झालों आहों अर्जावर सही करायला तयार, झालं ! बाकी हा अधर्म होणार, यांत संशय नाहीं !

गंगाधरपंत–आमच्या **बचंभटांना** बालविधवांच्या पुनर्लग्नांत मात्र अधर्म दिसतो, पण पुरुषांच्या पुनर्लग्नांत त्यांना त्याची नुसती छायाही दिसत नाहीं. उघडच आहे ' परोपदेशवेलायां शिष्टाःसर्वे भवन्ति वै । विस्मरंति हि शिष्टत्वं स्वकार्ये समुपस्थिते ॥ ' मी कांहीं शास्त्र पढलेलं नाहीं. पण ' दया धरमका मूल है ' हें तुळशीदासांचं वचन, म्हणजे मी साऱ्या शास्त्रांचं सार समजतों. तेव्हां माझं सर्वांना हेंच विचारणं आहे, कीं आठ आठ आणि दहा दहा वर्षांच्या दुर्दैवी पोरींचं पांढरं फटफटीत कपाळ पाहून तुमच्या हृदयांत चर्र् होऊन जातं कीं नाहीं ? आणि तें होतं हें जर खरं आहे, तर मी ह्मणतों कीं, त्यांच्या दुःखाचा परिहार करणं हा नुसता धर्मच नव्हे, तर अत्यंत श्रेष्ठ धर्म असला पाहिजे.

(इतक्यांत **रामदासी** देवालयाच्या गाभाऱ्यांतून बाहेर येतो.)

रामदासी–महाराज, आपण सांगतां हाच अत्यंत श्रेष्ठ धर्म होय यांत संशय नाहीं; व माझीही या सभेला हीच विनंती आहे कीं:–

पद– (' पंचतुंड नररुंडमालधर० ' या चालीवर.)

दिसे विसंगत जरि माझें हें भाषण माझ्या वेषाला ।
तरिहि सदयहो ! बधिर न व्हावें आर्त जनांच्या हाकेला ॥ तरि ०१
उकलुनि रुढिच्या मगरमिठीला विगणुनि बावा वचनाला ।
अनाथकाजा ह्मणवा अपुलें जिंकुनि लौकिकभीतीला॥अनाथ०२
अजवरि केवळ अन्यायानें छळिल्या ज्या अगणित अबला ।
अनाथवाली नाहिं कुणीका ह्मणुनि भाकिती करुणेला ॥ अना०३

आर्तस्वर तो भरित दशदिशा घरे पाडितो हृदयाला ।
धावा! धावा! उठा बापहो ! धावा ! त्यांच्या साह्याला॥ धावा०४

(सगुणा व सुशीला कित्येक बालविधवांसह गाभाऱ्यांतून बाहेर येतात.)

सगुणा– पद–(' मज नाहिं गडे सौख्य घरीं० ' या चालीवर.)

घाबरतां कांग अशा जाउंया चला ।
काय तुह्मा अविनय तो यांत वाटला ॥ ध्रु० ॥ घाब० ॥
मौन धरी तत्संकट कोणगे हरी ।
बाळ रडे तरिच तया माय धरि उरीं ।
नत चरणीं होउनियां विनवुं याजला ॥ १ ॥ घाब० ॥

दुसऱ्या विधवा मुली–

पद–(' परदेशि बांगडी घाली० ' या चालीवर.)

पतिहीन दीन अह्मि बाला। कुणि नसे वालि आह्माला। वालि०ध्रु.
सासुसासरे जावादिर हे असले तरि नांवाला ।
कोठुनि त्यांना तिचा कळवळा नाथ जियेचा गेला॥१॥ पति० ॥
पतिवियुता जी तिजला जगिं या त्राता कोणी नुरला ।
फार काय वदुं! तातमायही पारखि होती तिजला ॥२॥ पति० ॥
ह्मणुनि पोरक्या बाला आह्मी आलों शरण तुह्माला ।
शरण ये तया लोटुनि द्याया कधिंहि न कोणी सजला॥३॥पति०
चरणिं लीन अह्मि पदर पसरितों अनाथ विधवाबाला ।
मायबापहो ! न्याय याचितों त्याची भिक्षा घाला ॥४॥ पति०॥

बिंदुमाधव०–या अनाथ बालिकांच्या या हृदयद्रावक प्रार्थनेनंतर आपल्या कर्तव्याविषयीं कुणाला शंका राहिली असेल, असं मला वाटत नाहीं. करतां श्रीकडं जो अर्ज पाठवावयाचा आहे, त्याला सर्व ब्रह्मवृंदाकडून जाहीर रीतीनं संमती मिळेल, अशी मला आशा आहे.

चिंतामणराव व इतर सभासद–आमची त्याला पूर्ण अनुमती आहे. (असें ह्मणून सर्व टाळ्यांचा गजर करतात.)

बिंदुमाधव०–आतां कांहीं कार्यभाग उरला नाहीं. तथापि सभा विसर्जन करण्यापूर्वी मला एका गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ दोन शब्द बोलावयाचे आहेत. रा. वामनराव यांच्या सूचनेचा अनुवाद करणारा

एकही इसम या सभेंत दिसला नाहीं, एवढ्यावरून विवाहबंधनाच्य पवित्रतेची आह्माला महती वाटत नाहीं, असं मात्र त्यांनीं समजूं नये. पण इष्ट वेगळं, आणि शक्य वेगळं. सर्वांनीं प्रामाणिकपणानं वागावं, खतं–पत्रं, सह्या–साक्षी, न्यायकचेऱ्या, यांची अवश्यकता वाटूं नये, हें जरी इष्ट असलं, तरी तें शक्य नाहीं. त्याप्रमाणंच स्त्रियांकडून काय अथवा पुरुषांकडून काय, विवाहाची पुनरुक्ती न होईल तर बरी, हें तत्त्व सर्वांना सारखंच मान्य आहे. परंतु सर्व दंपत्यं, निर्भेद्य, परिच्छेदातीत, अनिंद्रियाधीन अशा प्रेमरज्जूंनीं निगडित होण्यास मानवजातीची आतांपेक्षां पुष्कळच उन्नती होणं अवश्य आहे; ती होऊन, विवाहबंधनाला दृढतम अशा प्रेमबंधनाचं साह्य मिळेपर्यंत, आपण आपला मार्ग क्रमाक्रमानं व पायरीपायरीनंच आक्रमिला पाहिजे. ज्यांनीं आपल्या प्रियपत्नीसमवेत अनेक वर्षं सुखानं संसार केलेला, ज्यांना मुलंबाळं झालेलीं, अशाही विधुरांना, कालगतीनं आपल्या पूर्वप्रेमाचा विसर पडून, ते फिरून संसारसुखाला आतुर होऊन जातात, असा जर आपल्याला प्रत्यहीं अनुभव येत आहे, तर पतिप्रेम ह्मणजे काय, याची जिला नुसती कल्पनाही नाहीं, अशा अजाण बालेलाही आपण जुलमानं सन्यास देण्यास प्रवृत्त होणं, ह्मणजे जाणूनबुजून अनिष्ट परिणामांची तयारी करण्यासारखं आहे. मनाला स्वार्थत्यागाचं वळण लागलं, तर तें चांगलं हें खरं; पण तें या मारून मुटकून दिलेल्या संन्यासानं लागणं नाहीं. तें लागायला गृहस्थाश्रमासारखी शाळा नाहीं. आपल्या अपत्यांच्या, आपल्या नातलगांच्या, आपल्या इष्टमित्रांच्या सुखासाठीं स्वसुखाचा विचार एका बाजूस सारून, मनोभावानं झटण्याचे प्रसंग जसे गृहस्थ व गृहिणी यांना येतात, तसे ते ब्रह्मचारी अथवा सन्यस्त स्थितींत राहणाऱ्या स्त्रीपुरुषांना सहसा येत नाहींत. आणि या दृष्टींनं पाहतां सामान्यतः वैवाहिक स्थितीच व्यक्तीच्या व पर्यायानं राष्ट्राच्याही उन्नतीला कारण झाल्याशिवाय रहात नाहीं. आणि या सर्व गोष्टींचा विचार करूनच सरसकट सर्व विधुरांना विधवांप्रमाणं संन्यासी बनविण्याचा सर्वथा अहितकारी मार्ग न स्वीकारतां, विधुरांनाही कांहीं निर्बंध असावा व बालविधवां-

पुरती तरी कांहीं सवलत मिळावी, अशा आशयाचा अर्ज श्रीचरणारविंदीं सादर करण्याचं सर्व ब्रह्मवृंदानं एकमतानं ठरवलं आहे. असो, मुलींनो, तुमची दुःस्थिती पाहून आमचीं अंतःकरणं विव्हल होत नाहींत, असं समजूं नका. ती दूर करण्याच्याच प्रयत्नांत आह्मी आहों; व श्रीच्या कृपाप्रसादानं तुमच्या दुःखाचा लवकरच परिहार होईल, अशी आह्माला उमेद आहे.

विधवा मुली—महाराज! आह्मा हतभागी बालांविषयीं आपण जी दयार्द्रबुद्धी दाखवीत अहां, त्याबद्दल आह्मी आपल्या अत्यंत ऋणी आहोंत, व आमची त्या दयाघन परमेश्वराजवळ इतकीच प्रार्थना आहे कीं:—

पद (' भल्या माणसा दसलाखाची० ' या चालीवर.)

सदयसभाजनसम सुविचारी। दीनबालिकाकैवारी। दीन०।
निपजुत भारतभूच्या उदरीं। निप०। होउत विजयी रूढिवरी॥ध्रु.
(चाल) नाहीं गतपतिद्विजबालापरि कुणि हतभागी जगिं नारी।
थकेल वाटे विधिचिहि वैखरि वदतां तद्दुःखें सारीं।
भोगिति त्या जरि क्लेश परोपरि अश्रुहि गाळाया चोरी।
मूक बापुड्या विव्हल अंतरिं। मूक०।नाहिं तयांतें गति दुसरी॥१॥

बिंदुमाधव०— तथास्तु! (पडदा पडतो.)

कर्तृप्रार्थना.

पद—(' आरती भुवनसुंदराची० ' या चालीवर.)

जनीं सुविचारविजय गाजो। तन्मनीं नीतिधैर्य उपजो॥ ध्रु०॥
रुढिचें बंड लया जावो। न्यायनीतीचा जय होवो।
अनाथदुःखें हृदय द्रवो। तत्राणा जनता धावो।
आर्यभू आर्यपदा पावो। आर्यभू०।
जनमति स्वतंत्र होउनि। समताभजनीं। राहो रंगुनि।
सर्व दिशांनीं। प्रगतितत्व गरजो। जनांमधिं। प्रगति०॥१॥जनीं०

समाप्त.